# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ०७ डिसेंबर, २०१५ / अग्रहायण १६, १९३७ ( शके )**

**(१) वित्त आणि नियोजन, वने मंत्री**
**(२) ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल कल्याण मंत्री**
**(३) जलसंपदा मंत्री**
**(४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १३१**

---

**रायगड जिल्हयातील बाळगंगा सिंचन प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेपासून ठेकेदारांची बिले मंजूर करण्यादरम्यान झालेली अनियमितता**

**(१) * २८८३१ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण पाटबंधारे महामंडळांतर्गत येणाऱ्या रायगड जिल्हयातील बाळगंगा सिंचन प्रकल्पाच्या घोटाळ्यातील कंत्राटदार एफ.ए.कन्स्ट्रक्शन या कंपनीला रु.२५ कोटी वा त्यापेक्षा अधिक किंमतीची कामे मिळण्यासाठी संशयास्पद दिलेल्या 'अ' वर्ग दर्जाची नस्ती हेतूपुरस्सर गहाळ करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बनावट कागदपत्रे व चुकीच्या पध्दतीने सदर कंपनीस 'अ' वर्ग बहाल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणासह ९२.६३ कोटी रुपयांच्या घोटाळ्यात तत्कालीन कार्यकारी अभियंता तसेच अन्य किती व कोणकोणत्या व्यक्ती दोषी आहेत.

(४) असल्यास, सदर दोषींवर काय कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांना बाळगंगा प्रकल्पाच्या निवीदा प्रक्रीयेपासुन ठेकेदारांची बिले मंजुर करण्यादरम्यान झालेल्या अनियमिततेमध्ये खालील व्यक्ती दोषी आढळल्या आहेत.

(१) गिरीष गोपाळराव बाबर, तत्कालीन कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विभाग,ठाणे (सेवानिवृत्त)

(२) बाळासाहेब भाऊसाहेब पाटील, तत्कालीन मुख्य अभियंता, कोकण प्रदेश मुंबई (सेवानिवृत्त)

(३) रामचंद्र दगडु शिंदे, तत्कालीन अधिक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ, ठाणे.

(४) आनंदा पांडुरंग काळुखे, तत्कालीन कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग-१, कोलाड, जि.रायगड (सेवानिवृत्त)

(५) राजेश चंद्रकांत रिठे, तत्कालीन उप अभियंता, पाटबंधारे विभाग, माणगांव,जि.रायगड

(६) विजय रघुनाथ कासट, तत्कालीन शाखा अभियंता, पाटबंधारे विभाग, माणगांव, जि.रायगड.

(७) फतेह मोहमंद अब्दुल्ला खत्री, ठेकेदार कंपनीचे भागीदार.

(८) निसार फतेह मोहमंद खत्री, ठेकेदार कंपनीचे भागीदार

(९) श्रीमती जैतुन फतेह मोहमंद खत्री ठेकेदार कंपनीचे भागीदार

(१०) अबीद फतेह मोहमंद खत्री, ठेकेदार कंपनीचे भागीदार

(११) जाहीद फतेह मोहमंद खत्री, ठेकेदार कंपनीचे भागीदार

(४) वरील दोषी व्यक्तींविरुध्द पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,ठाणे यांनी दिनांक २५.८.२०१५ रोजी कोपरी पोलीस ठाण्यात (ठाणे शहर पोलीस आयुक्तालय) गुन्हा नोंद क्र.१२३/२०१५, भारतीय दंड विधान संहिता कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब), १०९ सह लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम १३ (१) (सी) (डी) सह १३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(१) सदर गुन्हयातील आरोपी क्र.५ राजेश चंद्रकांत रिठे, तत्कालीन उप अभियंता, पाटबंधारे विभाग, माणगांव जिल्हा-रायगड यांना दि.२५.८.२०१५ रोजी २३:२५ वाजता अटक करण्यात येऊन त्यांची दिनांक ३.९.२०१५ पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजूर होती.

(२) सदर गुन्हयातील आरोपी क्र.८ निसार फतेह मोहमंद खत्री, ठेकेदार कंपनीचे भागीदार यांना दि.२५.८.२०१५ रोजी २३:२० वाजता अटक करण्यात येऊन त्यांची दिनांक १.९.२०१५ पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजूर होती.

(३) सदर गुन्हयातील आरोपी क्र.६ विजय रघुनाथ कासट, तत्कालीन शाखा अभियंता, पाटबंधारे विभाग, माणगांव, जि.रायगड, आरोपी क्र.१० अबीद फतेह मोहमंद खत्री, ठेकेदार कंपनीचे भागीदार, आरोपी क्र.११ जाहिद फतेह मोहमंद खत्री, ठेकेदार कंपनीचे भागीदार यांना दि.३.९.२०१५ रोजी १५:०५ वाजता अटक करण्यात येऊन आरोपी क्र.६ यांची दिनांक ९.९.२०१५ पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजूर व आरोपी क्र.१० व ११ यांची दिनांक ८.९.२०१५ पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजूर होती.

वर नमूद अटक करण्यात आलेले सर्व आरोपी सद्या न्यायालयीन कोठडीत असून सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात वाटप करण्यात आलेल्या मायक्रोन्युट्रीएन्ट व राजगिरा चिक्कीचा पुरवठा करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत**

**(२) * २९६३९ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालकल्याण विभागामार्फत राज्यात विशेषत: अहमदनगर, जळगाव, अमरावती आणि नंदुरबार या चार जिल्हयांच्या आदिवासी विभागातील शाळांमध्ये वितरीत केलेली चिक्की खाण्यालायक नव्हती अशी कबुली राज्य शासनाने मुंबई उच्च न्यायालयाकडे दिली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निष्कृष्ट चिक्कीचा पुरवठा करणाऱ्या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कारवाई केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) राज्यात वाटप करण्यात आलेल्या मायक्रोन्युट्रीएन्ट चिक्की व राजगिरा चिक्की बाबत अहमदनगर, जळगाव, अमरावती आणि नंदुरबार या चार जिल्ह्यात प्राप्त तक्रारीनुसार संबंधित उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून चौकशी अहवाल मागविणे, संबंधित संस्थेला कारणे दाखवा नोटीस देणे, वेळोवेळी तक्रार प्राप्त चिक्की नमुने घेऊन शासकीय प्रयोगशाळा, NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळा यांचेकडे तपासणीसाठी पाठविणे व संबंधित तपासणी अहवाल प्राप्त करणे इत्यादी बाबतची कार्यवाही वेळोवेळी करण्यात आलेली आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील प्रकल्प कार्यालयातून F.D.A. ने राजगिरा चिक्कीचे नमुने घेवून राज्य प्रयोगशाळा पुणे यांचेकडे तपासणीसाठी पाठविले होते. त्यांचेकडून चिक्की खाण्यास योग्य नसल्याचा अहवाल प्राप्त झाला होता. त्यानुषंगाने संबंधित पुरवठाधारक संस्थेस कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. सदर संस्थेने F.D.A. कडे रेफरल लॅब मार्फत पुन्हा नमुने तपासणीसाठी अपील केले होते. संस्थेच्या अपील अर्जानुसार F.D.A. ने राजगिरा चिक्कीचे नमुने गाजियाबाद येथे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्याचा अहवाल प्राप्त झाला असून सदर अहवालानुसार तीन नमुन्यापैकी दोन नमूने अन्न सुरक्षा मानके (पॅकेजिंग व लेबलिंग) नियमन-२०११ चे उल्लघंन झाल्यामुळे मिथ्थाछाप (Misbranded) घोषित केले आहे व एक नमूना प्रमाणित घोषित केला आहे. तसेच दि.१०/७/२०१५ च्या पत्रान्वये आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी राजगिरा चिक्कीचा यापुढील पुरवठा आजपासून तात्काळ थांबविण्यात यावा, असे पुरवठदार संस्थेस कळवून तशा सूचना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)/बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना दिलेल्या आहेत.

-----------------

**परभणी येथे वृक्षरोप खरेदीसाठी ग्रामपंचायतींकडून
घेतलेल्या निधीचा गैरवापर केल्याबाबत**

**(३) * ३४३३९ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाकडून नवीन वृक्षारोपण करण्यासाठी ग्रामपंचायतकडून तेराव्या वित्त आयोगाच्या निधीपैकी ५० टक्के वृक्षरोप खरेदीसाठी गटविकास अधिकारी व जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी ग्रामसेवकांमार्फत दमदाटी करून परभणी तालुक्यात ७८ ग्रामपंचायतीकडून १८ लाख ४९ हजार ८२० रुपयांचे विविध बँकेचे धनादेश घेतले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी तालुक्यातील ७८ ग्रामपंचायतीकडून घेतलेली रक्कम वृक्षाची रोपे उपलब्ध नसलेल्या दोन नर्सरीना दिल्याचा धक्कादायक प्रकार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) ग्रामपंचायतींनी शतकोटी वृक्ष लागवडी करणेकरिता लोकसंख्येएवढे वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी परभणी तालुक्यात एकूण ७८ ग्रामपंचायतींनी वृक्षरोप खरेदीसाठी रु.१८,४९,८२०/- इतक्या रक्कमेचे धनादेश दिलेले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रस्तुत प्रकरणामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या आदेशानुसार संयुक्तिक चौकशी समिती नेमली असून या प्रकरणी चौकशी सुरु आहे.

-----------------

**जिल्हा नियोजन समिती सोलापूर अंतर्गत सौरदिवे खरेदीत झालेला गैरव्यवहार**

**(४) * २८९३१ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा नियोजन समिती सोलापूर अंतर्गत सौरदिवे खरेदीसाठी निधी मंजूर केला असतानाही कित्येक ग्रामपंचायतींना सौरदिवे मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, तसेच काही ग्रामपंचायतींना मिळालेले सौरदिवे निकृष्ट दर्जाचे असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खरेदी प्रकरणात गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करून संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही, तथापि सन २०१५-१६ या वर्षात जिल्हा नियोजन समिती सोलापूर यांच्याकडून रु. ५०.०० लाख निधी मंजूर करण्यात आला आहे डायरेक्टर जनरल, ऑफ सप्लाईज ॲन्ड डिस्पोजल्स, भारत सरकार, नवी दिल्ली, यांचेकडील दर पत्रकानुसार खरेदीची कार्यवाही सुरु आहे, अद्याप पुरवठा आदेश दिलेला नाही, त्यामुळे सौर पथ दिवे मिळाले नसल्याचे व निकृष्ट दर्जाचे आहे असे म्हणणे खरे नाही,

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वन विभाग माध्यमातुन दक्षिण उमरेड (जि.नागपूर) वनपरिक्षेत्रात मौजा चानोडा येथे लागवड करण्यात आलेल्या रोपवनात झालेला गैरव्यवहार**

**(५) * ३२२९७ डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वन विभाग माध्यमातुन दक्षिण उमरेड (जि.नागपूर) वनपरिक्षेत्रातील मौजा चानोडा येथे लागवड करण्यात आलेल्या रोपवनात मोठा गैरव्यवहार झाल्याची तक्रार वन कामगार संघटनेने मुख्य वन संरक्षक यांचेकडे दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रारीनुसार दक्षिण उमरेड वनपरिक्षेत्रातील चानोडा येथे १७२ हेक्टर क्षेत्रात करण्यात आलेल्या रोपवनाच्या कामात स्थानिक मजूरांऐवजी बाहेरील राज्यातुन मजूर आणुन त्याना कमी दराने मजूरी देवून मोठा गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी काय कारवाई करण्यात आली आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय

(२) दक्षिण उमरेड वन परिक्षेत्रातील चानोडा येथे १७२ हे. क्षेत्रात करण्यात आलेल्या रोपवनाच्या कामात स्थानिक मजूरांची संख्या कमी असल्याने व काम पूर्ण होणे गरजेचे असल्याने बाहेरील मजूरांकडूनही कामे करून घेण्यात आली. कामावर असलेल्या मजूरांना मंजूर रोजंदारी दरापेक्षा कमी दराने मजूरी अदा केल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी विभागीय वन अधिकारी (दक्षता) यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमून प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली. चौकशी समितीच्या अहवालाच्या आधारे सकृतदर्शनी जबाबदार असलेल्या ८ अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याचे विचाराधीन आहे. सद्यस्थितीत ४ अधिकारी/कर्मचारी यांना निलंबित करण्यात आले आहे.

-----------------

## पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या धर्तीवर राज्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना राबविण्याबाबत

**(६) * २८३४८ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अजित पवार (बारामती), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान ग्रामसडक योजनेच्या धर्तीवर राज्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना राबविण्याचा निर्णय माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये राज्य शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेमध्ये पहिल्या टप्प्यात किती किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची कामे करण्यात येणार आहेत, व कोणकोणत्या जिल्हयात ही योजना राबविण्यात येणार आहे,

(३) असल्यास, या कामासाठी किती खर्च येणार असून योजनेचे काम केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२), (३) व (४) या योजनेंतर्गत नवीन जोडणी ७३० कि.मी. व रस्ता दर्जोन्नतीसाठी ३०,००० कि.मी. लांबीवर काम करण्यात येणार आहे. नवीन जोडणी अंतर्गत दरवर्षी १४६ कि.मी.तर दर्जोन्नती अंतर्गत पहिल्या टप्प्यात २००० किलोमीटर लांबीवर काम करण्याचे नियोजन आहे. पुढील ४ वर्षात उर्वरित लांबीवर टप्प्याटप्प्यात काम करण्यात येईल. ही योजना अन्य कोणत्याही योजनेमध्ये समावेश नसलेल्या रस्त्यांच्या बाबतीत राज्यातील सर्व जिल्हयातील ग्रामीण भागात राबविण्यात येणार आहे. यासाठी साधारणत: रुपये ३२१६ कोटी इतका निधी दरवर्षी आवश्यक आहे. ही योजना कार्यान्वीत करण्यासाठी जिल्हा स्तरावर पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच आवश्यकतेनुसार पद निर्मितीची व इतर कार्यवाही सुरु आहे. सदर कार्यवाही पूर्ण होताच योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## जालना जिल्हयात कोल्हापूरी बंधाऱ्यावर बसविण्यात आलेले लोखंडी दरवाजे चोरीस गेल्याबाबत

**(७) * ३३५८० श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयात कोल्हापूरी बंधाऱ्यावर बसविण्यात आलेले सुमारे दोन कोटी रुपये किंमतीची तीन हजार लोखंडी दरवाजे बेपत्ता असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी स्थानिक पोलिस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी आतापर्यंत किती जणांवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

जालना लघुसिंचन (जलसंधारण) विभागामार्फत पूर्ण करण्यात आलेल्या एकूण ८७ कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यापैकी ३९ कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांना एकूण १४८१ दरवाजे उपलब्ध नसल्याचे प्राथमिक पहाणीत निदर्शनास आलेले आहे. जालना लघु पाटबंधारे (जिल्हा परिषद) विभागामार्फत पूर्ण करण्यात आलेल्या १८९ कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यापैकी १२८ बंधाऱ्यांचे ३६१७ लोखंडी दरवाजे उपलब्ध नाहीत.

लघुसिंचन (जलसंधारण) व जिल्हा परिषद पाटंबधारे विभाग जालनाचे एकूण ५०९८ दरवाजे उपलब्ध नाहीत.

(२) एकूण उपलब्ध नसलेल्या ५०९८ दरवाज्यापैकी २२५ दरवाजे चोरीस गेल्याबाबत स्थानिक पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १७ कोल्हापूरी बंधाऱ्यांचे ७१८ दरवाजे गहाळ झालेबाबत पोलिस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यात आली आहे. गुन्हा अद्याप दाखल नाही. एकूण ४११ दरवाजे दिनांक १७ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या पुरात वाहून गेलेले आहेत. उर्वरित उपलब्ध नसलेल्या ३७४४ दरवाज्यांचा शोध घेण्यासाठी विभागीय कार्यालयीन स्तरावर प्रयत्न सुरु असुन अंतीम निष्कर्षा नंतर गुन्हे नोंदविण्याची कार्यवाही संबंधित विभागामार्फत करण्यात येणार आहे.

(३) चोरी गेलेल्या दरवाज्याबाबत संबंधीत पोलिस स्टेशनकडून कार्यवाही सुरु आहे. गहाळ व वाहून गेलेल्या दरवाज्याबाबत शोध व चौकशी प्रक्रिया संबंधित विभागामार्फत चालू आहे.

(४) कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

-----------------

**राज्यातील २९ लाख अपंग व्यक्तींकडे अपंगत्वाचे प्रमाणपत्र नसल्याबाबत**

**(८) * २९६५९ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे २९ लाख अपंग व्यक्ती असून त्यांच्याकडे अपंगत्वाचे प्रमाणपत्र नसल्याने त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळत नसल्याचे दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक आरोग्य विभागाने सदरहू बाब लक्षात घेवून आगामी दोन वर्षात १० लाख अपंगाना अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्याची योजना हाती घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अपंगत्वामध्ये कोणकोणत्या आजारांचा समावेश करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, सदर योजनेची सुरुवात शासनाने केली आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) नाही, अशा आशयाची तक्रार अथवा निवेदन दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास प्राप्त झालेले नाही. राज्यात दिनांक ३.१२.२०१२ पासून संगणकीय प्रमाणपत्र देण्यास सुरुवात केली असून आतापर्यंत ३,१०,०३० व्यक्तींनी अपंगत्व प्रमाणपत्रासाठी नोंदणी केली असून त्यापैकी २,३०,०३० व्यक्तींना अपंगत्व प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले आहे.

जुन्या प्रमाणपत्रांची वैधता संपेपर्यंत नवीन संगणकीय प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नाही. तथापि वैधता संपल्यानंतर नूतनीकरण करतांना संगणकीय प्रामणपत्र देण्यात येते.

(२) राज्यात सद्यस्थितीत ४३ रुग्णालयांमधून संगणकीय अपंगत्वाचे प्रमाणापत्र देण्यात येत असून प्रत्येक जिल्ह्यात आणखी १ ते २ रुग्णालयांमध्ये सदर सुविधा उपलब्ध करुन देण्याची बाब विचाराधीन आहे.

(३) यामध्ये शारिरिक विकलांगता, श्रवणदोष, मानसिक आजार, मतीमंद व अंधत्व या प्रकारच्या अपंगत्वांचा समोवश आहे.

(४) नाही, याबाबतचा प्रस्ताव सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास सादर करण्यात आला आहे. त्या विभागाने मंजुरी दिल्यानंतर कार्यान्वित होईल.

-----------------

## राजीव गांधी जीवनदायी योनजेतंर्गत किडनी विकारग्रस्त रुग्णांसाठी करण्यात येणाऱ्या डायलेसिस या उपचाराचा समावेश करण्याबाबत

**(९) * ३२१३४ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव गांधी जीवनदायी योनजेतंर्गत किडनी विकारग्रस्त रुग्णांसाठी करण्यात येणाऱ्या डायलेसिस या उपचाराचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, १० हजार रुपये निवृत्ती वेतन घेणाऱ्या ज्येष्ठ नागरीक तसेच सामान्य नागरीकास महिना २० हजार रुपये डायलेसिस उपचारासाठी भरणे आर्थिकदृष्ट्या त्याच्या आवाक्याबाहेर असल्याने त्यांना दिलासा देण्यासाठी डायलेसिसचा सदरहू योजनेत समावेश करण्याच्या दृष्टीने अद्याप शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदरहू योजनेत डायलेसिसचा समावेश करण्याकरीता किती कालावधी अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, उक्त प्रकरणी होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) डायलेसिस ही उपचार पध्दती राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या ९७१ उपचार पध्दतीत अंतर्भूत असुन आतापर्यंत १७४२२ रुग्णांनी डायलेसिस वरील उपचार घेतले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बोरी-सलगरा (ता.जि.लातूर) येथे दोन सिमेंट बंधाऱ्यांना गळती लागून बंधारा वाहून गेल्याबाबत**

**(१०) * २९६४५ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरी-सलगरा (ता.जि.लातूर) येथे जलसिंचन विभागाकडून सन २०१५ मध्ये २० लाख रुपये खर्चुन दोन सिमेंट बंधारे बांधण्यात आले, उक्त बंधाऱ्यांना गळती लागल्याचे वृत्त प्रसिध्द होताच त्याची डागडुजीही करण्यात आली, परंतु तद्नंतर झालेल्या पावसात हा बंधारा वाहून गेल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही. हे खरे नाही.

तथापि, टप्पा-३ कार्यक्रमांतर्गत बोरी सलगरा ता.लातूर येथील दोन सिमेंट नाला बांध पैकी सिमेंट नाला बांध क्रमांक २ च्या बाजूच्या तीराचा भूस्तर हा मऊ मातीचा असल्याने दि.२३.९.२०१५ रोजी पाण्याचा निसर्ग जास्तीचा झाल्याने सिमेंट बंधाऱ्यांच्या बाहेरील सदर भूस्तर सस्खलनासह (Out Flanking) वाहून गेलेला होता.

(२) व (३) होय.

उप विभागीय अधिकारी, लातूर व कार्यकारी अभियंता, लातूर, पाटबंधारे विभाग क्रमांक २ लातूर यांची समिती नेमून तपासणी करण्यात आली आहे.

या तपासणीत सिमेंट नाला बंध क्रमांक २ च्या बाजूच्या तीराचा भूस्तर हा नैसर्गिकरित्या मऊ मातीचा असल्याने व दि.२३.९.२०१५ रोजी या भागात अतिवृष्टी झाल्याने पाण्याच्या निसर्गामुळे बांधाच्या बाहेरिल बाजूने करण्यात आलेले भरावकाम असलेला मऊ भूस्तर सस्खलनासह (Out Flanking) वाहून गेला असल्याचा निष्कर्ष काढण्यात आलेला आहे.

वाहून गेलेला भराव हा माती कामाचा भाग कंत्राटदाराकडून स्वखर्चाने पूर्ववत करुन घेण्यात आलेला असून सिमेंट बंधारा आजमितीस सुस्थितीत असून संकल्पनानुसार पाणीसाठा करण्यास सक्षम आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जलसंपदा विभागात वापरल्या जाणाऱ्या गाड्यांच्या**
**पेट्रोल-डिझेलमध्ये होत असलेला गैरव्यवहार**

**(११) * ३२०६६ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा व पाटबंधारे विभागाच्या वाहनांवर असणारे चालक, त्यामध्ये भरण्यात येणारे डिझेल व पेट्रोल कंत्राटावर घेण्यात आलेल्या गाड्या याचा तपशील तातडीने सादर करण्याचे आदेश माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मा. मंत्री महोदय यांनी देऊनही सहा महिने होऊन गेल्यानंतर माहिती न मिळाल्याने मा. मंत्री महोदयांनी सर्व अधिकाऱ्यांना पुन:श्च माहिती सादर करण्याचे आदेश दिनांक १२ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंत्री महोदयांनी वारंवार सांगूनही अधिकारी माहिती देत नसल्याचे निदर्शनास येऊनही संबंधीत अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) सदर माहिती सादर करण्याचे आदेश कोणत्या अधिकाऱ्यांना यापूर्वी किती वेळा दिले होते व त्यांनी माहिती सादर करण्यास झालेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे आहे, दिनांक ५ फेब्रुवारी, २०१५ रोजी यांत्रिकी विभागाकडील वाहानाबाबतची आढावा बैठक मा. मंत्री (जलसंपदा) यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केली होती, बैठकीचे इतिवृत्तानुसार अनुपालन अहवाल मे व जून २०१५ तध्ये सादर करण्यात आला होता, यानंतर दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी मा. मंत्री (जलसंपदा) यांचेकडून अधिक तपशील मागविण्यात आला,
(२) संबंधित अधिक्षक अभियंता यांनी बैठकी दरम्यान अपूर्ण माहिती सादर केल्याने तसेच माहिती देण्यास विलंब केल्याने त्यांना मुख्य अभियंता (यांत्रिकी) यांचे दिनांक ३१ मार्च, २०१५ च्या गोपनीय पत्रान्वये समज देण्यात आली आहे,
(३) शासन पत्र दिनांक १० मार्च, २०१५ अन्वये बैठकीच्या इतिवृत्ताचा अनुपालन अहवाल मागविण्यात आला होता, त्याबाबतची माहिती मुख्य अभियंता (यां) नाशिक यांनी त्यांच्या दिनांक १९ मार्च, २०१५ व दिनांक १० मार्च, २०१५ च्या पत्रान्वये माहिती शासनास सादर केली आहे,
तसेच शासन पत्र दिनांक १६ सप्टेंबर, २०१५ अन्वये मागविण्यात आलेली अधिकची माहिती मुख्य अभियंता (यां) नाशिक यांच्या दिनांक १३ ऑक्टोबर, २०१५ च्या पत्रान्वये शासनास सादर केली आहे, परंतु सदर माहितीमध्ये आवश्यक बाबींचा उहापोह होणेच्या दृष्टीने शा.पत्र दिनांक २३ ऑक्टोबर, २०१५ अन्वये माहिती पुन्हा मागविण्यात आली आहे, सदर माहिती अद्याप अप्राप्त आहे.

----------------

**बिबट्यांचे मानवी वस्त्यांवर होणारे हल्ले नियंत्रीत करण्यासाठी निफाड तालुक्यातील तीन विभागात विभागलेले वनक्षेत्र एकाच विभागाकडे वर्ग करणेबाबत**

**(१२) * २८५०६ श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निफाड तालुक्यातील (जि.नाशिक) बिबटयांचा मानवी वस्त्यांवर होणा-या हल्ल्यात लाक्षणीक वाढ होऊन अनुक्रमे दिनांक ९ व ११ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास दोन बालकांचा मृत्यु झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हल्ले नियंत्रित करण्यासाठी निफाड तालुक्यातील तीन विभागात विभागलेले वनक्षेत्र वन्यजीव विभागाकडे वर्ग करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.वने मंत्री यांना दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील मौजे चापडगांव येथे दिनांक ०८.०८.२०१५ रोजी कु. विकी शांताराम पिठे वय वर्ष १० या मुलाचा व मौजे शिंगवे येथे दिनांक ११.०८.२०१५ रोजी कु. दिपाली बाळकृष्ण कोठे वय वर्ष ६ या मुलीचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे.

(२) बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी निफाड येथे स्वतंत्र वनपरिक्षेत्र कार्यालय करावे अशा आशयाचे निवेदन स्थानिकांनी दिनांक ०१.०९.२०१५ रोजी मा. मंत्री (वने) यांना दिले आहे.

(३) निफाड तालुक्याचे अल्प वनक्षेत्र पहाता निफाड येथे स्वतंत्र कार्यालय सुरु करणे योग्य होणार नाही तथापि निफाड तालुक्याचे संपूर्ण क्षेत्र एकाच वन विभागाकडे वर्ग करण्याबाबत विचाराधीन आहे.

-----------------

## पुणे येथे करण्यात आलेल्या शासकीय सर्वेक्षणात सुमारे ९२ हजार घरांमध्ये वैयक्तिक स्वच्छतागृह व ६९ झोपडपट्ट्यांमध्ये शौचालये नसल्याबाबत

**(१३) * ३६८१७ श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे करण्यात आलेल्या शासकीय सर्वेक्षणात सुमारे ९२ हजार घरांमध्ये वैयक्तिक स्वच्छतागृह नसल्याची बाब समोर आली आहे तर अद्यापही शहरातील ६९ झोपडपट्यांमध्ये २२० ठिकाणी नागरीक उघड्यावरच शौचास जात असून धनकवाडी क्षेत्रिय कार्यालयाच्या क्षेत्रात ही संख्या सर्वाधिक असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे वैयक्तिक स्वच्छता गृह उभारण्याबाबत, नागरीकांना सूचना देण्याबरोबरच येथील झोपडपट्यांमध्ये शौचालये उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अदयाप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) शहरांमधील ज्या कुटुंबाकडे शौचालयांची सुविधा उपलब्ध नसल्याने उघडयावर शौचास जात आहेत. अशा कुटुंबांना वैयक्तीक अथवा सामुदायीक शौचालयांची सुविधा स्वच्छ महाराष्ट्र अभियांनातर्गत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**उमरखेड (जि.यवतमाळ) वनपरिक्षेत्रांतर्गत कृष्णापूर वनवर्तुळातील पिरंजी बीटमध्ये झालेली सागवान वृक्षांची तोड**

**(१४) * ३०३३४ श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरुपसिंग नाईक (नवापूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) वनपरिक्षेत्रांतर्गत कृष्णापूर वनवर्तुळातील पिरंजी बीटमध्ये सुमारे २० लाखांच्या सागवानाची तोड झाली असून ही वृक्षतोड वनअधिकारी व तस्करांच्या संगनमताने झाली असल्याचे दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरेआहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी ५०० पेक्षा अधिक परिपक्व झाडांची तोड करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संगनमत करणाऱ्या वन अधिकारी व कर्मचारी यांचेवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) यवतमाळ जिल्हयातील पुसद वनविभागात येणाऱ्या उमरखेड परिक्षेत्रातंर्गत पिरंजी नियतक्षेत्राची माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये तपासणी केली असता एकूण २७५ सागवान थूट, नुकसानी रु.३,६८,७१९/- आढळून आले आहे. याप्रकरणी वन अधिकारी व कर्मचारी यांनी संगनमत केल्याचे आढळून आलेले नाही.

(२) २७५ झाडांची तोड केल्याचे आढळून आले आहे.

(३) चौकशी करण्यात आली आहे.

(४) व (५) चौकशीमध्ये सदरची वृक्षतोड स्थानिक व्यक्तींनी केले असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर प्रकरणी एकूण ११ आरोपींना अटक करण्यात आली. त्यांच्याविरुध्द न्यायालयात प्रकरण दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. याप्रकरणी रु.३,४३,९०८/- किंमतीचे सागवान लाकूड जप्त करण्यात आले आहे. तसेच घराला लागून असलेल्या मालाची नुकसान भरपाई स्वरुपात रु.१२,७८७/- इतके आरोपींकडून वसूल करण्यात आले आहेत.

वनसंरक्षणाच्या कामात निष्काळजीपणा व दुर्लक्ष केल्याबद्दल संबंधित वनरक्षक, पिरंजी, क्षेत्र सहायक कृष्णापूर वर्तुळ व वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.), उमरखेड यांना निलंबीत करण्यात आले आहे.

-----------------

**महाड तालुक्यातील (जि.रायगड) खर्डी गावांमधील एकात्मिक पाणलोटच्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(१५) * ३१०९९ श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड तालुक्यातील (जि.रायगड) खर्डी गावांमध्ये एकात्मिक पाणलोटच्या कामामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला असल्याने सदर कार्यक्रम बंद करण्यात यावा या मागणीसाठी गावकऱ्यांनी ग्रामपंचायतीसमोर दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास आमरण उपोषण सुरु केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व याप्रकरणी संबंधितांविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) अद्याप चौकशी वा कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशतः खरे आहे. सदरचे उपोषण ग्रामपंचायती समोर नसुन तहसिल कार्यालय महाड यांचे समोर करण्यात आले आहे.

(२), (३) व (४) तक्रारदार यांच्या दिनांक २०.८.२०१५ चा तक्रार अर्जातील मुद्यांच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी करण्याच्या सूचना आयुक्त (कृषी) यांना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**सांगली जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषद आरोग्य विभागामार्फत**
**केलेल्या पिण्याच्या पाण्याच्या सर्वेक्षणाबाबत**

**(१६) * ३५९३७ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषद आरोग्य विभागामार्फत माहे जुलै, २०१५ मध्ये केलेल्या पिण्याच्या पाण्याच्या सर्वेक्षणात ७७ गावातील १७७ ठिकाणचे पाणी नमुने दुषित आढळल्याने लोकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१), (२) व (३) होय, चौकशीत माहे जुलै २०१५ मध्ये एकूण १८०६ पाणी नमुन्याची जैविक तपासणी जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा व उपविभागीय प्रयोगशाळेकडे केली असता, ७७ गावातील ११७ ठिकाणचे पाणी नमुने दुषित आढळून आले असे ऑगस्ट २०१५ मध्ये प्राप्त झालेल्या तपासणी अहवालावरून दिसून आले. याबाबत योग्य त्या उपाययोजना जिल्हा प्रशासना कडून करण्यात आल्या आहेत.

-----------------

**सुप्रिम कोर्टाच्या निर्णयानुसार स्थानिक महिला बचतगटांना**
**आहार पुरविण्याचे काम देण्याबाबत**

**(१७) * ३२८१९ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिला व बालविकास प्रकल्पाअंतर्गत अंगणवाड्यातील ६ महिने ते ६ वर्षाची बालके, गरोदर महिला व स्तनदामाता यांना आहार पुरविला जातो. हा आहार मायक्रोन्युट्रीशियनयुक्त असून त्यास (टेक होम अराशन) असे संबोधतात, याकरीता केंद्र व राज्य शासन मिळून निधी उपलब्ध करते, सदर आहार पुरविण्याकरीता असलेल्या कमिटीचे मा. मुख्यमंत्री हे सभासद असून या कमिटीची बैठक दिनांक २५ एप्रिल, २०१३ रोजी झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुप्रिम कोर्टाच्या निर्णयानुसार स्थानिक महिला बचतगटांना आहार पुरविण्याचे काम देण्याचे अर्ज माहे सप्टेंबर, २०१३ मध्ये प्रकल्पनिहाय काढले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या महिला बचत गटांना प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून अभिव्यक्ती स्वारस्य अर्जात स्पष्ट व किंमतीसह उल्लेख असलेल्या सुमारे २० लाख किमतीच्या रोस्टर बेस्ड मशिनरी लावण्याचे आदेश दिले गेले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कर्ज उभारुन मशिनरी उभ्या केलेल्या या बचत गटांना काम देण्याची प्रक्रिया अद्याप पुर्ण न झाल्याने त्या आर्थिक संकटात आहेत त्यांना न्याय मिळावा अशी मागणी महिला बचत गटांनी मा. मुख्यमंत्री यांना दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ व त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास सदर प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) होय.

(५) कार्यवाही सुरु आहे.

----------------

**अकोला जिल्ह्यात अचानक झालेल्या पावसामुळे व वातावरण बदलामुळे दूषित पाणी व अस्वच्छता निर्माण झाल्याने व्हायरल फिवरची साथ पसरल्याबाबत**

**(१८) * ३५१२४ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात व शहरात अचानक झालेल्या पावसामुळे व वातावरण बदलामुळे दूषित पाणी व अस्वच्छता निर्माण झाल्याने व्हायरल फिवरची साथ पसरली असून डायरिया, मलेरिया व तापाने रुग्ण बेजार होऊन या रुग्णांच्या संख्येत वाढच होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्दी, खोकला, कावीळ, डायरिया सह अतिसार, त्वचारोग यासारख्या आजारात वाढ झाली असून आरोग्य विभागाचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, साथीच्या तापावर व अन्य आजारांवर तातडीने आळा घालण्याच्या दृष्टीने शासन काय कार्यवाही व उपाययोजना करणार आहे वा करीत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

अकोला जिल्हयात माहे सप्टेंबर २०१५ मध्ये जलजन्य तसेच किटकजन्य आजाराचा उद्रेक झालेला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) साथरोग प्रतिबंध व नियंत्रणासाठी अकोला जिल्हयात खालील उपाययोजना नियमितपणे करण्यात येतात.

- साथरोग रुग्णांचे नियमित सर्वेक्षण.
- किटकजन्य आजारांसाठी किटकशास्त्रीय सर्वेक्षण.
- फ्ल्यू सदृश्य रुग्णांची तपासणी व उपचार.
- पेयजल तसेच टी.सी.एल. गुणवत्ता संनियंत्रण
- साथरोगासाठी पुरेशा प्रमाणात औषधसाठा.
- किटकजन्य रोगांसाठी किटकनाशक फवारणी तसेच अळीनाशक औषधांचा वापर.
- पाणी स्त्रोतांचे वर्षातून दोन वेळा सर्वेक्षण.
- साथरोग प्रतिबंध व नियंत्रणासाठी विविध माध्यमातून जनतेचे आरोग्य शिक्षण.

-----------------

## मौ. रवरवली ते निगडे (ता.महाड) च्या रस्त्याची झालेली दुरवस्था

**(१९) * २९२८९ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.रवरवली ते निगडे (ता.महाड) च्या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे दळणवळणाची समस्या गंभीर झाली असून सदरच्या रस्त्यावर जिल्हा परिषदेच्या विभागामार्फत २०९.७ लाख रुपये खर्च देखभाल व दुरुस्तीवर करण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या अखेरीस निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामात कोट्यवधी रुपयाचा गैरव्यवहार झाला असून गैरव्यवहाराची चौकशी करण्यात यावी असे मौ.निगडे पंचक्रोशीतील रहीवाशांनी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे दिनांक २३ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे व चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.
(२) असे निवेदन या विभागास पाठविलेले आढळत नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे हरीपूर पासून ते आमणापूर पर्यंत (जि.सांगली) कृष्णा नदीपात्रात असलेल्या मगरींचा बंदोबस्त करण्याबाबत**

**(२०) * ३५२३६ श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे हरीपूर पासून ते आमणापूर पर्यंत (जि. सांगली) कृष्णा नदीपात्रात शेकडो मगरी वास्तव्य करीत असल्याबाबतची माहिती माहे जुलै, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मगरींनी अनेक शेतकरी, शालेय विद्यार्थी, मच्छिमार यांच्यावरती हल्ले चढवून त्यांचे प्राण घेतले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या मगरींचा बंदोबस्त करण्यासाठी काय उपाययोजना केल्या आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) दिनांक ०९.०६.२०१५ रोजी कृष्णा नदी पात्रात वनकर्मचारी, प्राणीमित्र व स्थानिक नागरीक यांच्या मदतीने हरीपूर ते चोपडेवाडी पर्यत करण्यात आलेल्या सर्व्हेक्षणामध्ये नदीपात्रात १९ मोठ्या मगरी व ३६ पिल्ले असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) सन २०१५ मध्ये आजअखेर कृष्णा नदीतील मगरीने हल्ला केल्याने २ व्यक्तिंचा मृत्यू झाला असून ५ व्यक्तिंना जखमी केल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) कृष्णा नदीतील मगरींचा बंदोबस्त करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

- हरीपूर ते आमणापूर ह्या पट्ट्यात असलेल्या १० संवेदनशील पाणवठ्यावर प्रत्येकी २ प्रमाणे २० वनकर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे.
- मगरींपासून नागरीक व जनावरांवर हल्ला होऊ नये या दृष्टीने जनमानसात प्रबोधन होण्याच्या दृष्टीने खबरदारी घेण्याबाबत नदी किनारी माहिती दर्शक फलक लावण्यात आले आहेत.

• प्रबोधनात्मक घडीपत्रिका व माहिती पुस्तिका वाटून तसेच ग्रामसभा घेऊन, आकाशवाणीवर नागरीकांशी थेट संवाद साधून प्रबोधन करण्यात आलेले आहे.

• जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीकडील बोट व खलाशी यांचे मदतीने नदी पात्रात गस्त घालण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यातील खिंडसी जलाशयाचे पाणी रामटेक तालुक्यातील कोरडवाहू शेतीला मिळण्याबाबत

**(२१) * ३५६६४ श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील खिंडसी जलाशयाचे पाणी रामटेक तालुक्यातील कोरडवाहू शेतीला मिळणेबाबत दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनास निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या कोरडवाहू शेतीला पाणी न मिळाल्यामुळे यावर्षी सुद्धा नापीकी झाल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) नाही.

याबाबत शेतकऱ्यांकडून अथवा महसूल खात्याकडून अशाप्रकारचे निवेदन क्षेत्रीय कार्यालयाकडे प्राप्त झालेले नाही.

(३) खिंडसी पुरक कालव्याद्वारे पेंच प्रकल्पातील अतिरीक्त पाणी खिंडसी तलावात सोडून अधिक पाणीसाठा निर्माण करण्याचे नियोजन आहे.

या अतिरीक्त पाणीसाठयापासून खिंडसी उच्च पातळी कालव्याद्वारे २४९३ हे. लाभक्षेत्रास सिंचनाचा लाभ अपेक्षित आहे. यात रामटेक तालुक्यातील १२ व मोहाडी तालुक्यातील ५ गावांचा समावेश आहे. सद्यस्थितीत खिंडसी पुरक कालव्याचे काम प्रगतीपथावर आहे.

खिंडसी तलावातून खिंडसी उच्च पातळी कालवा काढण्याचे प्रस्तावीत असून सदर कालव्याचा संरेखा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात साथीच्या रोगांचा झालेला प्रादुर्भाव

**(२२) * २८४३२ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.संदीप नाईक (ऐरोली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.के. पाडवी (अक्कलकुवा), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.राहूल आहेर (चांदवड), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबई, नवी मुंबई ठाणे, पुणे, रायगड, नाशिक, सोलापूर, सिंधुदुर्ग, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर, अकोला, भंडारा इत्यादी ठिकाणी माहे जुलै, २०१५ ते ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत स्वाईन फ्ल्यू व डेंग्यूच्या साथीचा प्रादुर्भाव होऊन शेकडो नागरिकांचा मृत्यू झाला असून हजारो नागरिकांना सदर साथीची लागण झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर साथीचा प्रादुर्भाव झालेल्या रुग्णांना तातडीने वैद्यकीय सेवा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) भविष्यात उक्त साथीचे रोग पसरु नयेत म्हणून शासनाने कोणती विशेष उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे,

राज्यात माहे जुलै २०१५ ते ऑक्टोबर २०१५ या कालावधीत स्वाईन फ्ल्यूचे ३१९७ रुग्ण आढळून आले असून ३२४ मृत्यू झालेले आहेत. याच कालावधीत डेंग्यूचे ३००३ रुग्ण आढळून आले असून १७ मृत्यू झालेले आहेत.

(२) होय.

(३) सदर साथीच्या प्रादुर्भाव झालेल्या रुग्णांना तातडीने वैद्यकिय सेवा पुरविण्याबाबत शासनाच्या सर्व आरोग्य संस्थांमध्ये औषधोपचार व इतर अनुषंगिक सोयी उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

संशयित व बाधित स्वाईन फ्ल्यू रुग्णांनसाठी राज्यात पुरेशा प्रमाणात स्क्रिनिंग सेंटर्स तसेच विलगीकरण कक्ष कार्यरत आहेत.

खाजगी रुग्णालयात जीवनावश्यक प्रणालीवर उपचार घेण्याऱ्या गरीब संवर्गातील रुग्णांच्या खर्चाची वैद्यकीय प्रतिपूर्ती करण्यात येत आहे.

ऑसेलटॅमीवीरचा पुरेसा साठा उपलब्ध करुन देण्यात आला असून उपजिल्हा रुग्णालयात तसेच वैद्यकीय महाविद्यालयांच्या रुग्णालयात विलगीकरण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

(४) राज्यात साथीचे रोग पसरु नये याकरीता शासनाने खालीलप्रमाणे उपयायोजना केल्या आहेत.

- फ्ल्यूचा प्रसार रोखण्यासाठी लोक सहभाग टेलिव्हिजन, रेडिओ, प्रिंटमिडिया अशा विविध माध्यमातून फ्ल्यू पासून बचाव करण्यासाठी काय काळजी घ्यावी याबाबत लोकांचे प्रबोधन करण्यात येते.
- फ्ल्यू सदृश्य रुग्णांचे नियमित सर्वेक्षण.
- राज्यातील ४ शासकीय प्रयोगशाळा मार्फत मोफत निदान सुविधा.
- नियमित ताप रुग्ण सर्वेक्षण.
- अळीनाशकांची फवारणी.
- रक्तजलनमुन्यांचे विषाणू परिषण.

- किटकशास्त्रीय सर्वेक्षण.
- किटकनाशकाची धुरुवारणी केली जाते.
- शालेय डेंग्यू जागृती महिना साजरा करण्यात आल.

डेंग्यू आजाराच्या निदानासाठी राज्यात ३७ सेंन्टीनल सेंटर्स कार्यरत असून राज्यातील डॉक्टरांचे डेंग्यू उपचारासंदर्भात प्रशिक्षण घेण्यात आले आहे.

-----------------

**राज्यात रोजगार हमी योजनांमधील लाचखोर अधिकारी/कर्मचारी यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंध विभागाने केलेल्या कारवाईबाबत**

**(२३) * २८६०६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वसामान्य जनतेच्या विकासासाठी सुरु केलेल्या रोजगार हमी योजना मध्ये गेल्या दीड वर्षात लाचलुचपत प्रतिबंध विभागाने सर्वाधिक लाचखोराना अटक केली असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४ मध्ये रोजगार हमी योजना मध्ये १४ अधिकारी व कर्मचारी यांना लाच घेताना पकडले तर यावर्षी ऑगस्ट पर्यंत लाच घेणा-या १३ अधिकारी व कर्मचारी यांना अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी करून या लाचखोर अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) राज्यात रोहयो अंतर्गत जानेवारी, २०१४ पासून २९ अधिकारी/कर्मचारी यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंध विभागाने कारवाई केली आहे. सन २०१४ मध्ये ५ अधिकारी/कर्मचारी यांना लाच घेताना पकडण्यात आले. तर यावर्षी ऑक्टोबर २०१५ अखेर २४ अधिकारी/कर्मचारी यांचेवर लाचलुचपत प्रतिबंध विभागाने कारवाई केली आहे.

(३) संबंधित अपचारींमध्ये ११ अधिकारी ६ स्थायी कर्मचारी व १२ कंत्राटी कर्मचारी आहेत. स्थायी अधिकारी/कर्मचारी यांना निलंबीत करण्यात आले असून, त्याची खातेनिहाय चौकशी करण्यात येत आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या असून त्यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंध विभागामार्फत फौजदारी कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर जिल्हयातील पारशिवणी, रामटेक, मौदा व इतर तालुक्यातील पुरूष व स्त्री आरोग्य कर्मचारी यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(२४) * ३४५३९ श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील पारशिवणी, रामटेक, मौदा व इतर तालुक्यातील पुरूष आरोग्य कर्मचारी (एम.पी.डब्ल्यु) व स्त्री आरोग्य कर्मचारी (ए.एन.एम.) यांची ५० टक्के पदे रिक्त असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले हे खरे काय,

(२) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रामध्ये लोकसंख्या अधिक प्रमाणात वाढलेली आहे अशा आरोग्य संस्थामध्ये अतिरिक्त मनुष्यबळ पुरविणेसाठी शासन निर्णय दिनांक १७ जानेवारी २०१३ ला मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने काही आकृतीबंध कार्यक्रम हाती घेतला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व ही पदे कधीपर्यंत भरण्यात येणार व त्याचे थोडक्यात स्वरूप काय ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

पारशिवनी, रामटेक व मौदा तालुक्यात ५० टक्के पदे रिक्त नसून स्त्री आरोग्य कर्मचाऱ्यांची ९२ पैकी १०, पुरुष आरोग्य कर्मचारी (जिल्हास्तर) ची ४४ पैकी ३ व पुरुष आरोग्य कर्मचारी (राज्यस्तर) ची २८ पैकी ३ अशी एकूण १६ पदे रिक्त आहेत.

(२) होय.

सन २००१ ची लोकसंख्या, सध्याचे आरोग्य संस्थांमधील अंतर, जमीनीचा उंचसखलपणा हे निकष विचारात घेऊन आरोग्य संस्था स्थापनेच्या बृहतआराखड्यास दिनांक १७/१/२०१३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.

(३) व (४) रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

----------------

## दमणगंगा पिंजाळ प्रकल्पांतर्गत गुजरात राज्याला भूगड धरणाऐवजी वाग धरणातून पाणी देण्याबाबत

**(२५) * ३०६७२ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दमणगंगा पिंजाळ प्रकल्पांतर्गत भूगड धरणातील सुमारे ३.५ टीएमसी पाणी गुजरात राज्याला दिले जाते ते पाणी भूगड धरणाऐवजी वाग धरणातून देण्यात यावे व या प्रकल्पातील प्रस्तावित बोगद्यांचे आरेखन २० टीएससी पाण्याची क्षमता विचारात घेऊन करण्यात यावे तसेच पार-तापी-नर्मदा प्रकल्पासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी केंद्र शासनाने राज्य शासनाला २ महिन्याचा अवधी द्यावा अशा मागण्या राज्य शासनाने केंद्र शासनाकडे दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास केंद्रीय जलसंपदा मंत्रालयात आयोजित केलेल्या सहाव्या नदीजोड प्रकल्प बैठकीत केल्यानंतर सदर योजनाना मान्यताही दिली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दोन्ही प्रकल्पांचे काम केंद्र शासनामार्फत करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामे पूर्ण होण्यास किती कालावधी लागणार आहे व त्यात राज्य शासनाचा किती आर्थिक सहभाग राहणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

दमणगंगा-पिजाळ प्रकल्प ७५% विश्वासर्हतेला संकल्पीत करावा, त्यानुसार बोगदयाचे संकल्पन करावे. गुजरातमधील मधुबन धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील भूगड धरणामुळे अडले जाणारे पाणी भूगड धरणा ऐवजी वाघ धरणातून द्यावे, जेणेकरुन भूगड पाणलोट क्षेत्रातून उर्वरित पाणी पुर्वेकडे वळवणे शक्य हाईल असे राज्यांचे मत दि. १५ सप्टेंबर २०१५ रोजी दिल्ली येथील बैठकीत राज्याच्या वतीने मांडण्यात आले.त्यावर राष्ट्रीय जल अभिकरण (महाराष्ट्राने सुचविलेले) लहान सहान बदल करुन प्रकल्प अधिक आकर्षक करणेचे बाबतची तयारी केंद्र शासनामार्फत स्पष्ट करण्यात आली.

(२) हे दोन्ही प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित करण्याची राज्यशासनाची मागणी आहे.

(३) प्रकल्प अहवालातील नियोजनानुसार सदरहू प्रकल्पास बांधकामासाठी अंदाजे ७ वर्षे इतका कालावधी लागेल. तत्पुर्वी ७५% पाणी वाटप , खर्चाची विभागणी इ. बाबत महाराष्ट्र आणि गुजरात मध्ये सामंजस्य करार होणे आवश्यक असल्याने सद्या प्रकल्प पुर्ण होणेचा निश्चित कालावधी सांगता येणार नाही.तसेच राज्याचा आर्थिक सहभागाची व्याप्तीसुध्दा अद्यापी निश्चित नाही.

-----------------

## सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारीत राज्यात आरोग्य संस्था स्थापनेच्या बृहतआराखडयाबाबत

**(२६) * ३२४९९ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागाने सन २००१ च्या लोकसंख्येच्या आधारावर आरोग्य संस्था स्थापनेचा बृहत आराखडा माहे जानेवारी २०१३ च्या दुस-या आठवड्यात वा त्या सुमारास तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा आराखडा तयार करताना सन २०११ ची लोकसंख्या गृहीत धरली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गाव तेथे आरोग्य केंद्र ही संकल्पना राबविण्याची गरज असतांनाही ती राबविली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या आराखड्यास सुधारणा करुन त्याची अंमबजावणी शासनाने केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय हे खरे आहे. सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारीत राज्यात आरोग्य संस्था स्थापनेच्या बृहतआराखड्यास शासन निर्णय दि. १७/०१/२०१३ व दि. ०९/०६/२०१४ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रत्येक डोंगराळ किंवा आदीवासी भागातील २०००० लोकसंख्येत एक आणि प्रत्येक बिगर आदीवासी भागातील ३०००० लोकसंख्येस एक या प्रमाणात आरोग्य केंद्राची स्थापन करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात ग्रामविकास विभागामार्फत "स्मार्ट ग्राम" योजना राबविण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(२७) * २८७४९ श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.विजय भांबळे (जिंतूर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.वैभव पिचड (अकोले), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने राज्यातील ग्रामपंचायतीत सुप्रशासन आणि मुलभूत सुविधा, विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी, अपारंपारिक ऊर्जा, पाणी, स्वच्छता आणि आरोग्य यावर भर देण्याचा निर्णय ऑगस्ट, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यासाठी ग्रामविकास विभागामार्फत "स्मार्ट ग्राम" योजनेच्या आराखडा तयार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची अंमबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, यावर किती खर्च अपेक्षित आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) प्रस्ताव विचाराधीन आहे,
(२) योजनेचा प्रारुप आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे,
(३) व (४) मंत्री मंडळापुढे प्रस्ताव सादर करण्यात येईल.

-----------------

**चंद्रपूर ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफरझोन क्षेत्रातील गावक-यांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने चरख्यांचे वाटप करण्यात आल्याबाबत**

**(२८) * ३५०३४ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफरझोन क्षेत्रातील गावक-यांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने १० महिन्यापूर्वी साडेसात लाखांचे ५० चरखे विकत घेण्यात आले यापैकी फक्त १० चरख्यांचे वाटप करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या लाभार्थ्यांना कुठलेही प्रशिक्षण न देता चरखे दिल्याने ते चरखे बिनकामाचे झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित चरख्यांचे वाटप न केल्याने चरख्यांची दुरवस्था होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) ताडोबा -अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफरझोन क्षेत्रातील गावक-यांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने खरेदी केलेल्या सर्व ५० चरख्यांचे लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही, ४५ लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून उर्वरीत ५ लाभार्थ्यांना दि. १५.१२.२०१५ पासून प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**उल्हासनगर येथील मध्यवर्ती रुग्णालयातील डॉक्टरांना झालेली मारहाण**

**(२९) * ३२२८३ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ठिकठिकाणी डॉक्टरांना मारहाण केल्याच्या घटनांमध्ये वाढ होत असून उल्हासनगर येथील मध्यवर्ती रुग्णालयातील डॉक्टरांना रुग्णांच्या नातेवाईकांनी लाथा बुक्यांनी मारहाण केल्याने डॉक्टरांनी काम बंद आंदोलने केल्याचे दिनांक २१ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मारहाण करणाऱ्या जमावांमध्ये गुंड प्रवृत्तीचे लोकांनी शिरकाव करुन संपूर्ण रुग्णालयातील रुग्णांना वेठीस धरले व त्यांची गैरसोय केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या घटनेची शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) डॉक्टरांना करण्यात आलेल्या मारहाणीबाबत संबंधित व्यक्तींच्या विरोधात मध्यवर्ती पोलीस स्टेशन उल्हासनगर-३ येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यातील तीन आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास पोलीसांमार्फत सुरु आहे.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, कल्याण व मुरबाड तालुक्यातील सुमारे ९ लघुपाटबंधारे योजना निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(३०) * ३०४७९ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, कल्याण व मुरबाड तालुक्यातील सुमारे ९ लघुपाटबंधारे योजनांना प्रशासकीय मंजुरी देवूनही निधी अभावी सदर योजनांची कामे प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने काय चौकशी केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, चौकशीअंती सदर योजना कार्यान्वित होवून शेतक-यांना पिण्याचे व सिंचनाचे पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून या ९ ल.पा.योजनांना कधीपर्यंत निधी उपलबध करुन देण्यात येणार आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

अंबरनाथ, कल्याण व मुरबाड तालुक्यातील सुमारे ८ लघु पाटबंधारे योजनांची कामे वनजमीन प्रस्ताव मंजुरी अभावी प्रलंबित आहेत.

भुवन लघुपाटंबधारे योजना तालुका मुरबाड जिल्हा ठाणे योजनेच्या वनजमीन संपादनासाठी आवश्यक निधी अभावी या योजनेचे काम प्रलंबित आहे.

(२) शासन निर्णय क्र. मजम-२०१५/प्र.क्र.६६/ जल-३ दिनांक ८ मे, २०१५ अन्वये महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचे मार्फत दिनांक १ एप्रिल, २०१४ नंतर तसेच दिनांक १ एप्रिल, २०१४ पूर्वी (विदर्भ वगळून) प्रशासकीय मान्यता दिलेल्या परंतु प्रत्यक्ष क्षेत्रिय कामे सुरु झालेली नाहीत अशा सर्व योजनांची तांत्रिक व्यवहार्यता तपासण्यासाठी ३ मुख्य अभियंतांची समिती स्थापन करण्यात आलेली आहे. या समितीचा अहवाल मंडळास सादर केला आहे. अहवालाचे निर्णयाबाबत महामंडळ स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(३) महामंडळ स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) तालुक्यातील गावतलाव कोरडे पडल्याबाबत

**(३१) * ३२५४२ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) तालुक्यातील गावतलाव कोरडे पडल्याचे माहे जुलै, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनमार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार तालुक्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

गडहिंग्लज तालुक्यामध्ये एकूण ८९ गावे आहेत. त्यापैकी ३४ गावामध्ये एकूण ३५ गाव तलाव अस्तीत्वात आहेत. त्यापैकी माहे जुलै, २०१५ च्या मध्यास ४ गावतलावामध्ये ५०% पेक्षा अधिक पाणीसाठा होता, १८ गावतलावामध्ये ५०% पेक्षा कमी पाणी साठा होता व १३ गावतलावामध्ये अत्यल्प पाणी साठा होता.

(२) व (३) चालु वर्षात पर्जन्यमान सरासरी पेक्षा मोठ्या प्रमाणावर कमी झालेने नजीकच्या उन्हाळ्यात काही गावे व वाड्या वस्त्यावर पाण्याची टंचाई भासण्याची

शक्यता आहे. त्या दृष्टीने तालुक्यातील सर्व गावांचे पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताचे सर्वेक्षण ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे कडून करण्यात आले असून संभाव्य पाणी टंचाई निवारणार्थ कृती आराखडे तयार करण्यात आलेले आहेत व त्यास सक्षम प्राधिकरणाची मंजूरी घेणेची कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अहमदनगर जिल्हा परिषदेमध्ये राबविण्यात येणाऱ्या रोजगार हमी योजनेत येणाऱ्या तक्रारीची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(३२) * ३१०४६ श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या रोजगार हमी योजनेत वर्षभरात १३९ तक्रारी आल्या आहेत, यातून ९४ तक्रारी निकाली काढण्यात आल्या असून ४५ कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे त्यात सर्वाधिक २२ ग्रामसेवकांचा समावेश असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त उर्वरित प्रकरणे निकाली काढून शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, अंशत: खरे आहे. अहमदनगर जिल्हा परिषदेमध्ये रोजगार हमी योजनेत एकूण १३९ तक्रारी असून त्यातून ९८ तक्रारी चौकशीअंती निकाली काढण्यात आल्या आहेत. उर्वरित ४१ प्रकरणी संबंधितांवर शिस्तभंगाची कार्यवाही चालू आहे. त्यामध्ये २० ग्रामसेवकांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित आहे.
(२) ४१ प्रकरणात ५१ अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील प्रत्येक जिल्हयातील एका गावाचा स्मार्ट दलित गाव म्हणून विकास करण्याच्या निर्णयाबाबत**

**(३३) * २९५६६ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक जिल्हयातील एका गावाचा स्मार्ट दलित गाव म्हणून विकास करण्याचा निर्णय शासनाने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर योजना केव्हा अंमलात आणण्यात येईल,

(४) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गोंदिया जिल्हयात बालकांच्या लसीकरणाच्या कार्यक्रमांत चेंगराचेंगरी होऊन एका बालकाचा मृत्यु झाल्याबाबत**

**(३४) * २९५०४ श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयात बालकांच्या लसीकरणाच्या कार्यक्रमांत चेंगराचेंगरी होऊन एका बालकाचा मृत्यु झाला त्यावेळी संतप्त लोकांनी आरोग्य सेविका, आरोग्य सेवक व कंत्राटी आरोग्य सेविका यांच्यावर खूनी हल्ला केला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातून काम करत असताना समाजकंटकाकडून त्यांच्यावर हल्ला होण्याचे मनोधैर्य वाढीस लागले असल्याने सदरील घटनेचा निषेध म्हणून

राज्यभरातील आरोग्य कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र गंभीर पडसाद उमटले असून याप्रकरणी जिल्हा परिषद अध्यक्ष यांना निवेदनही देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन गावागावातून काम करणाऱ्या आरोग्य कर्मचारी यांचा सुरक्षेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अदयाप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) गोंदिया जिल्ह्यात दि.०८.०७.२०१५ रोजी मौजा चंगेरा, उपकेंद्र रजेगांव, प्राथमिक आरोग्य केंद्र काटी येथे लसीकरणाच्या सत्रादरम्यान चेंगरा चेंगरी होऊन कोणत्याही बालकाचा मृत्यू झालेला नाही. लसीकरण सत्रात लस घेतलेल्या एका बालकाचा घरी गेल्यानंतर मृत्यू झाला आहे. लसीकरण केलेल्या इतर कोणत्याही बालकाला लसीचे दुष्परिणाम झाल्याचे आढळून आलेले नाही. सदर लसीकरण सत्रादरम्यान वापरण्यात आलेलया लसींच्या नमुन्याची केंद्र शासनाच्या केंद्रीय औषधी प्रयोगशाळा, कसौली यांच्याकडून चाचणी करुन घेण्यात आली असून सदर लस प्रमाणित गुणवत्तेची असल्याचे सदर अहवालात नमुद करण्यात आलेले आहे.

मात्र सदर बालकाचा मृत्यू लसीकरणामुळे झाल्याच्या गैरसमजातून संतत्प लोकांनी आरोग्य सेविका, आरोग्य सेवक व कंत्राटी आरोग्य सेविका यांच्यावर हल्ला केला होता. सदर मृत बालकाचे शवविच्छेदन करण्यात आले असून अवयव (व्हिसेरा) पुढील तपासणीकरिता प्रयोगशाळा पाठविण्यात आले आहे. सदर परिक्षणाचा अहवाल अद्याप अप्राप्त असून तपासणी अहवाल आल्यानंतर मृत्यूचे निश्चित निदान करणे शक्य होईल.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी जिल्हा आरोग्य अधिकारी, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी, तालुका अधिकारी तसेच पोलीस अधिक्षक गोंदिया यांनी चौकशी केली आहे.

महाराष्ट्र राज्यातील वैद्यकीय सेवा तसेच सेवेंतर्गत कार्यरत व्यक्तिबाबत घडणाऱ्या हिंसक कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी आणि वैद्यकीय सेवा संस्थांच्या मालमत्तेची हानी किंवा नुकसान होण्यास प्रतिबंध करण्यासाठी तसेच तत्संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्रात सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्र.११, दि.२८ एप्रिल, २०१० संमत करण्यात आले आहे. या अंतर्गत अपराध्यास तीन वर्षे कारावास आणि पन्नास हजार रुपये दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत तालुक्यातील सालोख ग्रामपंचायत हद्दीतील नारलेवाडी येथे रक्तचंदनाचा साठा जप्त करण्यात आल्याबाबत**

**(३५) * ३०३७० श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत तालुक्यातील सालोख ग्रामपंचायत हद्दीतील नारलेवाडी येथे एका फार्महाऊसमध्ये सुमारे ३ कोटी रुपये किंमतीचा १० टन रक्तचंदनाचा साठा कर्जत वनविभाग व नेरळ पोलीस यांच्या संयुक्त कारवाईमध्ये पकडण्यात आला असल्याचे माहे जुलै, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन दुर्मिळ रक्तचंदनाची तस्करी करणा-यावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कारवाई केली नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी नेरळ पोलीस यांनी पो.कॉ.गुन्हा र.नं.८९/२०१५ भा.द.वि.सं. कलम ३७९, ३४ व भारतीय वन अधिनियम, १९२७ तसेच महाराष्ट्र वननियमावली, २०१४ मधील तरतुदीनुसार गुन्हा दिनांक २५.७.२०१५ रोजी दाखल करण्यात आला आहे. प्रकरणी एकूण ७ संशयीत आरोपीपैकी ४ आरोपींना पोलीसांनी अटक केली.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अनेक योजनांची कपात करण्यात येणार असल्याबाबत**

**(३६) * ३५३१६ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने केलेली टोलमाफी, दुष्काळ, एलबीटी आणि जीवनदायी योजनांसाठीच्या तरतुदीमुळे सरकारी तिजोरीला ६५०० कोटीचा अतिरिक्त भार येणार असल्याने राज्यातील अनेक योजनांची कपात करण्यात येणार असल्याची माहिती माहे सप्टेंबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने राज्यातील महत्वाकांक्षी योजनांची कपात न करता येणा-या काळात राज्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी तसेच अनावश्यक खरेदी बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) राज्य शासनाने परिस्थितीनुसार वेळोवेळी घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने नियोजित खर्चाच्या बाबीच्या प्राथम्यक्रमामध्ये बदल होत असतो. अनावश्यक खर्च कमी करण्याच्या दृष्टीने नवीन पद निर्मिती वर बंदी घालण्यात आलेली आहे, उद्योगासाठी वीजेवरील अनुदान कमी केले आहे व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाशी सुसंगत अशी कार्यवाही करुन सर्व व्यक्तीगत लाभार्थी योजना आधारशी जोडून लाभाची रक्कम लाभार्थ्यांच्या बँकेतील खात्यात परस्पर जमा करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

**दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील जिल्हापरिषदेच्या**
**रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३७) * ३४७८५ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील जिल्हापरिषदेचे रस्ते अत्यंत खराब व वाहतूकीस अयोग्य झालेले असून सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडून गेल्या तीन वर्षात पूरेशा निधीची तरतूद करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, सदर रस्त्यांसाठी आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत व रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. इतकी असून सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते. त्यानुसार रत्नागिरी जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ८०८५.३५ कि.मी. इतकी आहे. रस्ते व पूल, दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमा अंतर्गत सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेस एकूण रु.३७३३.८२ लक्ष, तेराव्या वित्त आयोगामध्ये सन २०१२-२०१३, २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये एकूण रु. ७६३.५८ लक्ष तर पूरहानी कार्यक्रमासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेला रु.१७००.६३ लक्ष असा एकूण रु.६१९८.०३ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

-----------------

**राज्यातील खासगी रुग्णालयात सर्पदंश औषधांचा तुटवडा असल्याबाबत**

**(३८) * ३३९७१ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खासगी रुग्णालयात सर्पदंश औषधांचा तुटवडा असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात प्रतिविष निर्मिती, संशोधन केंद्र स्थापन करण्याची गरज आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त संशोधन केंद्र स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्‌याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग दि. २७ ऑगस्ट, २००९ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील सर्व आरोग्य संस्थांमधून सर्पदंश व श्वानदंश या दोन्ही लसी सर्व रुग्णांना मोफत उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला आहे या दोन्ही लसींचा पुरेसा साठा शासकीय रुग्णालयात उपलब्ध आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**साकोली, लाखनी व लाखांदूर (जि.भंडारा) तालुक्यातील घरकुल वाटपाची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(३९) * ३६०९९ श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयात सन २०१४-१५ व २०१५-१६ या आर्थिक वर्षात साकोली, लाखनी व लाखांदूर तालुक्यात किती लाभार्थ्यांना घरकुल वाटप करण्यात आले, किती लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झाले आणि किती लाभार्थी घरकुल वाटपापासून वंचित राहीले,

(२) असल्यास, मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना किती कालावधीत घरकुलाचा लाभ देण्यात येणार आहे,

(३) तसेच दारिद्र्य रेषेखाली नसलेल्या परंतु कमी उत्पन्न असलेल्या लाभार्थ्यांना घरकुल वाटप करण्यासंबंधी शासनाचे निकष काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) भंडारा जिल्ह्यात सन २०१४-१५ व २०१५-१६ या आर्थिक वर्षात साकोली, लाखनी व लाखांदूर तालुक्यात एकूण २८३५ घरकुल मंजूर करुन वाटप करण्यात आले. तसेच २९६३ लाभार्थी घरकुलापासून वंचित आहेत.

(२) इंदिरा आवास योजना व रमाई आवास याजनेंतर्गत शासनाकडून उद्दिष्ट प्राप्त झाल्यानंतरच प्राप्त उद्दिष्ट व निधीच्या अनुषंगाने लाभार्थींना घरकुलाचा लाभ देण्यात येईल.

(३) इंदिरा आवास योजना ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. योजनेची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार करण्यात येते. या योजनेच्या लाभासाठी लाभार्थी हा दारिद्र्य रेषेखाली असणे आवश्यक आहे. तसेच लाभार्थ्याकडे स्वत:ची जागा असणेदेखील आवश्यक आहे. रमाई आवास योजना ही इंदिरा आवास योजनेच्याच धर्तीवर राबवली जाते.

-----------------

**राज्यात टीबीचे १ लाख ३६ हजार रुग्ण आढळून आल्याबाबत**

**(४०) * ३००४१ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोटरी क्लबने "टीबी भगाओ" या महत्त्वाकांक्षी मोहीमे अंतर्गत दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी रोटरी फाऊंडेशनच्या क्षयरोग तज्ञांच्या उपस्थितीत भरविण्यात आलेल्या शिबीरामध्ये राज्यात १ लाख ३६ हजार क्षयरोगाचे रुग्ण आढळून आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीत क्षयरोगाच्या इतक्या मोठ्या प्रमाणावर लागण होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत. सदर रोगावर नियंत्रण मिळविण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) रोटरी क्लब, मुंबई शाखेने दिनांक १३ सप्टेंबर, २०१५ रोजी मुंबई, नवी मुंबई व ठाणे येथे क्षयरोग निदानासाठी शिबीर आयोजित केले होते.

या शिबिरात आढळून आलेल्या क्षयरुग्णांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| **क्र.** | **शिबीराची ठिकाणे** | **तपासलेले संशयित क्षयरुग्ण** | **तपासणीत आढळून आलेले क्षयरुग्ण** |
|---|---|---|---|
| १ | मुंबई | १०० | निरंक |
| २ | नवी मुंबई | १२७१ | ४७ |
| ३ | ठाणे | २५०४ | ०७ |
| | **एकुण** | **३८७५** | **५४** |

तथापि राज्य शासनाच्या सर्वेक्षणात जानेवारी, २०१५ ते ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत १,१०,०७८ क्षयरुग्ण आढळून आले आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) राज्यात दरवर्षी साधारणपणे १,३८,००० पर्यंत क्षयरुग्ण आढळून येतात. निरोगी व्यक्ती फुफ्फुसाच्या क्षयरुग्णाच्या संपर्कात आल्यास त्या व्यक्तीस क्षयरोग होऊ शकतो तसेच या रोगाचा प्रसार दुषित हवेमार्फत होतो. या रोगावर नियंत्रण करण्याकरिता राज्य शासनाने खालील उपाययोजना केल्या आहेत.

(१) संशयित क्षयरुग्णांना थुंकी नमुना तपासणीसाठी राज्यात १४५२ मान्यता प्राप्त सूक्ष्मदर्शीकेंद्रे स्थापन करण्यात आलेली आहेत.

(२) तपासणीत आढळून आलेल्या क्षयरुग्णांना प्रत्यक्ष देखरेखीखाली औषधोपचार करण्यासाठी ३६६६७ डॉट प्रोव्हायडर्स उपलब्ध करण्यात आलेले आहेत.

(३) नियमित औषधोपचार जे रुग्ण दाद देत नाहीत अशा संशयित एम.डी.आर./एक्स.डी.आर. क्षयरुग्णांची प्रयोगशाळा तपासणी करण्यासाठी राज्यात १० कल्चर अ‍ॅण्ड डी.एस.टी. प्रयोगशाळा केंद्रशासनाने मंजूर केल्या आहेत.

(४) क्षयरोगाचे लवकर निदान होण्यासाठी राज्यात २२ ठिकाणी CBNAAT यंत्रे उपलब्ध केली आहेत.

(५) तपासणीत आढळलेल्या एम.डी.आर./एक्स.डी.आर. क्षयरुग्णांच्या प्रयोगशाळा चाचण्या करुन पुढील औषधोपचार सुरु करण्यासाठी डॉट्स प्लस वार्डात दाखल करावे लागते. राज्यात १६ डॉट्स प्लस वार्ड उपलब्ध आहेत.

(६) क्षयरोगाचे सनियंत्रण करण्यासाठी राज्यात ३३ जिल्हा क्षयरोग केंद्रे व २३ शहर क्षयरोग केंद्रे स्थापन करण्यात आलेले आहेत.

(७) शासकीय अधिकारी व कर्मचारी व्यतिरिक्त केंद्र शासनाने क्षयरोगावर नियंत्रण करण्यासाठी राज्यात करारतत्वावर एकूण २१९३ अधिकारी व कर्मचारी वर्ग मंजूर केला आहे.

(८) शासनाच्या निधीव्यतिरिक्त क्षयरोगावर नियंत्रण आणण्यासाठी सुधारित राष्ट्रीय क्षयरोगनियंत्रण कार्यक्रमांतर्गत केंद्रशासनाने मागील वर्षी रुपये ४९.७६ कोटी निधी उपलब्ध केलेला आहे. तसेच चालू वर्षी रुपये ७७.८० कोटी निधी केंद्र शासनाने मंजूर केला आहे.

-----------------

**सोलापूर जिल्हयातील उजनी धरणातील पाणी शेतकऱ्यांच्या शेतात ठिबक सिंचनाद्वारे देण्याबाबत**

**(४१) * ३३२३२ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील उजनी धरणातील पाणी भिमा नदीत सोडताना पाणी वाहून जाऊ नये याकरीता मोठे बॅरेजेस बांधून शेतकऱ्यांच्या शेतात ठिबक सिंचनाद्वारे पाणी देण्याबाबत मागणी होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने दुष्काळ परिस्थितीत धरणातील पाणी पिण्यासाठी वापरण्यात यावे यासाठी उद्योग व शेतीसाठी पाण्याची कपात करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उजनी धरणातील पाणी फक्त पिण्याच्या व शेतीच्याच पाण्यात कपात करुन उद्योगांना देण्यात येणाऱ्या पाण्याची कपात करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न १ व प्रश्न ३ बाबत राज्य शासनाने चौकशी करुन मोठे बॅरेजेस बांधून शेतकऱ्यांना ठिंबक सिंचनाद्वारे पाणी देण्यासाठी तसेच उद्योगांना पाण्याची कपात करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) व (३) पिण्याच्या व उद्योगाच्या पाण्यात अद्याप कपात करण्यात आलेली नाही. पाण्याच्या उपलब्धतेनुसार सिंचनाचे नियोजन केलेले नाही.

(४) कृष्णा पाणी तंटा लवादाच्या निर्णयानुसार कृष्णा खोऱ्यात नवीन प्रकल्पासाठी पाण्याची उपलब्धता नाही त्यामुळे वरील मागणीचा विचार करणे शक्य नाही.

उजनी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात मंजूर पिक रचना आठमाही आहे. मात्र तेथे बारमाही पिके घेतली जातात. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या जानेवारी २०१५ च्या अधिसुचनेतील आदेशान्वये उजनी प्रकल्पात जून २०१७ पासून बारमाही पिकांसाठी ठिबक प्रणाली अनिवार्य करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात सिंचनाच्या क्षेत्रात भरीव काम न झाल्याबाबत**

**(४२) * ३६७५१ श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी नदीचे पाणी कृष्णा नदीत वळवून पाण्याच्या क्षेत्रात आंध्रप्रदेश शासनाने मोठी क्रांती केली असली तरी महाराष्ट्रात राजकारण, भ्रष्टाचाराचे आरोप, वनखात्याच्या परवानग्या आदि कारणामुळे सिंचनाच्या क्षेत्रात कोणतेच भरीव काम झालेले नाही हे माहे सप्टेंबर, २०१५ च्या तिस-या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी अडविण्याचे सारे प्रकल्प किंवा योजना वर्षानुवर्षे प्रलंबित राहिल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन : (**१) आंध्रप्रदेश शासनाने सप्टेंबर, २०१५ मध्ये गोदावरी व कृष्णा नदीजोड प्रकल्प राबविण्यास सुरुवात केली. तथापि, महाराष्ट्रात सिंचन क्षेत्रात भरीव काम झाले नाही हे निदर्शनास आले, हे खरे नाही.

(२) महाराष्ट्र राज्यात जून, २००२ ते जून, २०१३ या कालावधीत सुमारे १० लक्ष हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. महाराष्ट्र राज्यात जून, २०१३ अखेर ३९११ राज्यस्तरीय प्रकल्पातून ४८.०३ लक्ष हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. तसेच सन २०१३-१४ या वर्षात ०.६५ लक्ष हेक्टर व सन २०१४-१५ या वर्षात ०.४४ लक्ष हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. सद्य:स्थितीत राज्यात ४०३ प्रकल्प बांधकामाधीन असून, प्रकल्प पूर्ण झाल्यावर ३२ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.

(३) अपूर्ण पाटबंधारे प्रकल्पांचे दायित्व मोठे आहे हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने धोरण निश्चित केले आहे. प्रकल्प पुर्णत्वाच्या कोणत्या टप्प्यावर आहे, याचा विचार करुन प्राधान्यक्रमानुसार आर्थिक गुंतवणूक केली जाईल. ज्या प्रकल्पांपासून ३ वर्षात प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ मिळू शकेल अशा प्रकल्पांना प्राधान्य देण्याचे शासनाने ठरविले आहे. अमरावती प्रदेशातील अनुशेष जिल्हयातील प्रकल्पांना प्रथम प्राधान्य आहे. प्रकल्पांना गती देण्यासाठी सुधारित प्रशासकीय मान्यतेचे अधिकार महामंडळांना प्रदान केले आहेत. प्रकल्पांसाठी आवश्यक जमिनीची थेट खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

-----------------

**कॉन्सिफडन्स पेट्रोलियम इंडिया (ता.खालापूर,जि.रायगड) या कंपनीमार्फत विना परवानगी वनौषधी वृक्षांची तोड केल्याबाबत**

**(४३) * २९७८२ श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर तालुक्यातील माजगाव ग्रामपंचायत हद्दीतील पौदा गावाजवळील कॉन्स्फिडन्स पेट्रोलियम इंडिया लि.कंपनीच्या व्यवस्थापनाने संरक्षण भिंत बांधून कोणतीही परवानगी न घेता शासकीय नियम डावलून साग, खैरा सावर, शेमट, भोकर, बोर, पळस, चेरा, किनई अशा ३१ वेगवेगळया वनौषधी वृक्षांची तोड माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदेशीर वनौषधी वृक्षांची तोड केल्याचे निदर्शनास आल्यानुसार वन विभागाचे अधिकारी तपासणीसाठी गेला असता त्यांना सुरक्षा रक्षकांनी तपासणी करण्यास रोखले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विना परवानगी वनौषधी वृक्षांची तोड व पर्यावरणाचा समतोल बिघडविणाऱ्या कंपनी विरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे.

खालापूर तालुक्यातील माजगाव ग्रामपंचायत हद्दीतील पौदा गावाजवळील कॉन्स्फिडन्स पेट्रोलियम इंडिया लि. कंपनीच्या व्यवस्थापनाने मालकी स.नं.२७ मधील विनापरवानगीने एकूण ३१ वृक्षांची तोड केली असुन यापैकी ५ वृक्ष (अनुसूचित वृक्षामधील साग व खैर वृक्ष संख्या-५) व २६ वृक्ष आडजात (बिगर अनुसूचित) आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) सदरहू कंपनीने महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम, १९६४ चा भंग केला असल्याने त्यांचेकडून कलम ४ नुसार प्रति झाड रु.५००/- प्रमाणे अनुसूचित ५ झाडांसाठी एकूण रु.२५००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. सदर झाडांच्या बुंध्यावरील माल जप्त करुन विक्री आगार, साजगाव येथे ठेवण्यात आला आहे.

उर्वरीत २६ बिगर अनुसूचित झाडे तोडल्याबाबत महाराष्ट्र महसूल अधिनियम, १९६६ आणि महाराष्ट्र जमीन महसूल झाडे अधिनियम १९६७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत तहसीलदार, खालापूर यांना दिनांक २३.११.२०१५ रोजी कळविण्यात आले आहे.

-----------------

**रोहा तालुक्यातील (जि.रायगड) चणेराजवळ शिकारीसाठी लावण्यात आलेल्या फासात अडकून एका बिबट्याचा झालेला मृत्यू**

**(४४) * ३४३०९ श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा तालुक्यातील (जि.रायगड) चणेरा जवळ शिकारी साठी लावण्यात आलेल्या फासात अडकून दिनांक १३ ऑक्टोबर, २०१५ रोजी एका बिबट्याचा मृत्यू झाल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंदाजे ६० किलो वजन असलेल्या या मृतावस्थेतील बिबट्याचे उजव्या बाजूचे दोन्ही पायाचे पंजे कापून नेण्यात आल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या घटनेची रोहा उपवन विभागाने गंभीर दखल घेऊन या प्रकरणी वन्यजीव संरक्षण अधिनियमांच्या कलम १५ व १६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) रोहा तालुक्यातील (जि.रायगड) चणेराजवळ शिकारीसाठी लावण्यात आलेल्या फासात अडकून बिबट्याचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक १२.१०.२०१५ रोजी निदर्शनास आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी वन्यजीव (संरक्षण), अधिनियम, १९७२ चे कलम ९, ३९, ४४, ४८ व ४८ अ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून ३ इसमास अटक करण्यात आली आहे. त्यापैकी श्री. हरी नागू वाडकर कोकबन, ता. रोहा यांच्याकडून बिबट्याच्या मागील उजव्या पायाचा एक पंजा सर्व नखांसह हस्तगत करण्यात आलेला आहे. तसेच पंजा तोडण्यासाठी वापरण्यात आलेला विळादेखील हस्तगत करण्यात आला आहे. उर्वरित एक पंजा व फासकी लावणाऱ्या इसमांबाबत तपास सुरु आहे.

-----------------

**मध्य चांदा (जि.चंद्रपूर) वनविभागाच्या धाबा वनपरिक्षेत्रात व उपक्षेत्रातील वेडगाव, डोंगरगाव नियतक्षेत्रातील कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(४५) * ३२४७५ श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्य चांदा (जि.चंद्रपूर) वनविभागाच्या धाबा वनपरिक्षेत्रात व उपक्षेत्रातील वेडगाव, डोंगरगाव नियत क्षेत्रात जवळपास २० लाख रुपयांची तसेच तोहोगाव उपक्षेत्रातील वामनपल्ली, गोंडपिंपरी उपक्षेत्रातील खराळपेठ व गोंडपिंपरी नियतक्षेत्रात जवळपास ३७ लाखांची असे एकूण ५७ लाखांची कामे पूर्ण झाल्याचे कागदोपत्री दाखवून निधीची उचल करण्यात आली, परंतू ही कामे अजूनही अपूर्ण अवस्थेत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने उक्त उपक्षेत्रातील कामे अपुर्ण अवस्थेत असतांना कामे पुर्ण केल्याचे दाखवून निधीची उचल करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) जिल्हा योजनेअंतर्गत आदिवासी उपयोजना आणि बिगर आदिवासी उपयोजना तसेच केंद्रपुरस्कृत डावी कडवी विचारसरणी या योजनेअंतर्गत येणारी गॅबियन बंधारे, सिमेंट बंधारे, रोपवनाभोवती चेनलिंक फेन्सिंग, तपासणी नाका व निवासस्थान दुरुस्ती इत्यादी कामे सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात पुर्ण करावयाची होती. परंतु, प्रत्यक्षात माहे सप्टेंबर, २०१५ अखेरपर्यंत ही कामे पुर्ण झालेली नसल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे. तथापि सद्य:स्थितीत ही सर्व कामे पुर्ण झाली आहेत. निधीचा गैरवापर झालेला नाही असे चौकशीत निष्पन्न झाले आहे.

(२), (३) व (४) सदर कामांकरीता रु.५६.९६ लक्ष अनुदान वितरीत करण्यात आलेले होते. या कामांची चौकशी करण्याकरीता सहायक वनसंरक्षक (वनीकरण व वन्यजीव) तसेच सहायक वनसंरक्षक (संरक्षण व अतिक्रमण निर्मुलन-१) यांची नेमणूक करुन संयुक्त चौकशी करण्यात आली होती. या चौकशीमध्ये सदर कामे विहीत वेळेत पुर्ण न झाल्याचे निदर्शनास आले. त्या अनुषंगाने संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची  कारवाई सुरु करण्यात आली आहे.

-----------------

## धुळे जिल्हयातील साक्री तालुक्यातील जामखेडी धरणाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४६) * २९२५७ श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्हयातील साक्री तालुक्यातील जामखेडी धरणाचे २० कि.मी लांबीचे काम ७ वर्षापूर्वी मंजूर झाले असून आता पर्यंत केवळ ३ कि.मी. चे काम पूर्ण झाले आहे उर्वरित १७ कि.मी.चे काम अपूर्ण असल्याचे माहे सप्टेबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साक्री तालुक्यातील धाडणे, शेवापूर, मालापूर,कावठे या गावातील शेती सिचंनापासून वंचित असल्याने स्थानिक शेतकऱ्यांनी या कालव्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत वारंवार शासनाकडे मागणी करुनही शासन दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील जामखेड धरणाचे उर्वरित १७ कि.मी. कालव्याचे काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन सदरील काम किती कालावधी पर्यंत पूर्ण होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

जामखेडी प्रकल्पांतर्गत धरणाचे काम २००१ मध्ये पूर्ण झालेले असून, १८ किमी लांबीच्या डावा कालव्याचे काम पूर्ण झाले आहे. वितरण व्यवस्थेपैकी ३० टक्के काम पूर्ण झालेली असून, सन २००८ नंतर २९.९७ किमी लांबीच्या वितरण व्यवस्थेच्या कामांच्या निविदा निश्चित करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी २३.९४ किमी लांबीचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) नाही.

(३) या प्रकल्पास सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी अनुक्रमे तरतूद रु. ४.१२५ व रु.१.५० कोटीची अर्थसंकल्पिय तरतूद मंजूर आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार वितरण व्यवस्थेची उर्वरीत कामे मार्च, २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**किनी (ता.भोकर, जि.नांदेड) येथील तलावातील गाळ काढण्याबाबत**

**(४७) * ३४६९१ श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील भोकर तालुक्यातील सात लघु तलावांचे मजबुतीकरण होऊन कॅनॉल दुरुस्ती व्हावे व साचलेला गाळ काढण्यासाठी केंद्रीय सहाय दुरुस्ती नुतनीकरण व पुनर्स्थापना अंतर्गत ३,८१,०४,०००/- रुपये इतका खर्च झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी किनी येथील लघु तलावांवर ७२,४६,०००/- रुपये खर्च करण्यात आले तथापि या तलावातील गाळ काढण्यात न आल्याने तलावात पाणी साचले नसल्याने सदर खर्च झालेला निधी वाया गेल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकाराची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधितावर कोणती कारवाई केली आहे काय ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

भोकर तालुक्यातील एकूण ७ प्रकल्पावर केंद्रीय सहाय्य्य दुरुस्ती नुतनीकरण व पुनर्स्थापना अंतर्गत एकूण रु.४.१८ कोटी एवढा खर्च झाला आहे.

(२) हे खरे नाही.

या कामावर एकूण रु. ८३.०० लक्ष एवढा खर्च झाला असून, या पैकी गाळ काढण्याच्या कामावर यांत्रिकी संघटने मार्फत रु.७.७५ लक्ष एवढा खर्च झाला आहे. यातून २९१९२ घ.मी. एवढा गाळ काढण्यात आला आहे. तथापि कमी पर्जन्यमानामुळे या वर्षी तलावात पाणी साठा होऊ शकला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्ह्यातील नांदगाव व मालेगाव (ग्रामीण) येथील अंगणवाडी केंद्रांच्या एकात्मिक बाल विकास योजनेंतर्गत इमारतीच्या बांधकामाबाबत**

**(४८) * ३५४७३ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील नांदगाव विधानसभा मतदार संघातील एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प नांदगाव व मालेगाव (ग्रामीण) या प्रकल्पाअंतर्गत नांदगाव व मालेगाव तालुक्यातील अनेक अंगणवाड्या ओट्यांवर, उघड्यावर, झाडाखाली, भाड्याच्या खाजगी घरांमध्ये भरत असल्यामुळे अंगणवाडी केंद्रांमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना अध्ययनात तसेच पोषण आहार व आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करून देण्यास अडचणी निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास नांदगाव मतदार संघातील एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प नांदगाव व मालेगाव (ग्रामीण) या प्रकल्पाअंतर्गत अंगणवाडी केंद्रांना स्वतंत्र इमारतीच्या कामांना विशेषबाब म्हणून मंजुरी देऊन निधीची तरतूद करणेबाबतची मागणी माननीय महिला व बाल कल्याण मंत्री यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ जुलै, २०१५ च्या लेखी पत्राद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे** : (१) हे खरे नाही.

मालेगांव (ग्रामीण) प्रकल्प व नांदगांव प्रकल्पातील स्वत:ची इमारत असलेल्या, समाजमंदिर, प्राथमिक शाळा, ग्रामपंचायत, भाडयाची जागा, खाजगी घराच्या ओटयावर व प्राथमिक शाळेच्या ओटयावर भरणाऱ्या अंगणवाडी केंद्राची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | प्रकल्पाचे नांव | स्वत:ची इमारत असलेल्या अंगणवाडी केंद्रांची संख्या | समाजमंदिर, प्राथमिक शाळा, ग्रामपंचायत, भाड्याची जागा, या ठिकाण भरणांऱ्या अंगणवाडी केंद्रांची संख्या | खाजगी घराच्या ओट्यावर, मराठी शाळेच्या ओट्यावर भरणाऱ्या अंगणवाडी केंद्रांची संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | मालेगाव (ग्रामीण) | २१६ | १६८ | ८२ | ४६६ |
| २ | नांदगांव | १०७ | ७३ | २२ | २०२ |

तथापि अंगणवाडीतील विद्यार्थी व अंगणवाडी सेविका यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे अशी परिस्थिती नाही.
(२) व (३) हे खरे नाही.

प्राथामिक शाळा, समाजमंदिर, ग्रामपंचायत, वाचनालय, खाजगी जागेच्या व मराठी शाळेच्या ओटयावर भरणाऱ्या अंगणवाडी केंद्राचे बांधकाम करण्याबाबत केलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहे.

| प्रकल्पाचे नांव | वर्ष | बांधकामास मान्यता दिलेल्या अंगणवाडी केंद्रांची संख्या |
|---|---|---|
| मालेगांव | २०१३-१४ | ५६ |
| | २०१५-१६ | २० |
| | एकूण | ७६ |
| नांदगांव | २०१३-१४ | ३३ |
| | २०१५-१६ | ०५ |
| | एकूण | ३८ |

तसेच नांदगांव मतदार संघातील एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प नांदगांव करीता-९ व मालेगांव (ग्रामीण) करिता-२२ अतिरिक्त अंगणवाडी केंद्रांच्या स्वतंत्र इमारतींच्या कामांना विशेष बाब म्हणून सन २०१५-१६ मध्ये निधी उपलब्ध करण्याबाबत जिल्हा नियोजन समिती नाशिक यांचेकडे जिल्हा परिषद, नाशिक यांनी प्रस्ताव सादर केला आहे.

----------------

## एकबुर्जी धरणाची ऊंची कमी असल्याने वाशीम शहराला आवश्यक व मुबलक पाणीपुरवठा होत नसल्याबाबत

**(४९) * ३६१५२ श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशीम शहराला एकबुर्जी धरणातून पाणी पुरवठा केला आहे तथापि एकबुर्जी धरणाची ऊंची कमी असल्याने शहराला आवश्यक व मुबलक पाणीपुरवठा होत नाही

म्हणून धरणाची ऊंची वाढवण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक २० नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनामार्फत धरणाची ऊंची वाढविण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) नाही.
(३) सकृतदर्शनी पिण्याच्या पाण्यासाठी १०० टक्के व सिंचनासाठी ७५ टक्के सफलता साध्य होईल इतकी जलसंपदा प्रकल्पास्थळी उपलब्ध नाही. प्रकल्पस्थळी ७५ टक्के विश्र्वासार्हतेने उपलब्ध असलेल्या ५४.१० द.ल.घ.मी. जलसंपदेच्या तुलनेत प्रकल्पाचा मूळ नियोजित पाणीवापर ८२६.१३ द.ल.घ.मी. आहे.

-----------------

## दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यात ८२६ बालके कुपोषित व दुर्धर आजाराने ग्रस्त असल्याबाबत

**(५०) * ३६०४७ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील दापोली पालगड, पिसई, गिम्हवणे,हर्णे, आंजर्णे आणि केळशी अशा सहा बीट मधील १९० अंगणवाड्यांमधील १ ते ५ वयोगटातील ५३९७ बालकांचे व दाभोळ आणि ओणनवसे या बीट मधील १९० अंगणवाड्यांच्या कार्यक्षेत्रामधील १ ते ५ वयोगटातील ४४१३ बालकांचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये महिला आणि बाल कल्याण विभागामार्फत करण्यात आलेल्या सर्वक्षणात ८२६ बालके कुपोषित व दुर्धर आजाराने ग्रस्त असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, कुपोषित बालकांना व मातांना सकस आहार पुरविण्याबाबत तसेच दुर्धर आजार ग्रस्त बालकांवर औषधोपचार करण्यासाठी शासनाने आतापर्यंत कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली आहे वा सद्य:स्थिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

दापोली तालुक्यात दापोली व दाभोळ असे दोन प्रकल्प असून दापोली प्रकल्पामध्ये ४३ बालके व दाभोळ प्रकल्पामध्ये ४० बालके अशी एकुण ८३ बालके तीव्र कमी वजनाच्या श्रेणीत असून ४ बालके दुर्धर आजाराची आहेत.

(२) सदर बालके तीव्र कमी वजनाची व दुर्धर असण्याची प्रमुख कारणे अनुवंशीकता, जुळी बालके, दुर्गमभाग, अपुऱ्या दिवसांची बालके व जन्मत: कमी वजन इत्यादी आहेत.

(३) तीव्र कमी वजनाची बालकांचे श्रेणीवर्धन करण्यासाठी अंगणवाडी सेविका व पर्यवेक्षिका यांच्या प्रत्यक्ष गृहभेटीद्वारे आहारसंहितेबाबत व बालकांच्या स्वच्छतेबाबत त्यांना माहिती दिली जाते व प्राथमिक आरोग्य केंद्र/ राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम (RBSK) यांच्यामार्फत आरोग्य तपासणी करुन त्यांना संदर्भ सेवा व औषधोपचार देण्यात येतात.

तसेच दरमहा अंगणवाडीमध्ये माता बैठका घेऊन मातांना आहाराचे प्रात्यक्षिक दाखवून सकस आहाराबाबत माहिती देण्यात येते. तसेच ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालके व तीव्र कमी वजनाची बालके, गरोदर, स्तनदा माता यांना पुरविण्यात येणारा घरपोच आहार (THR) च्या वेगवेगळया पाककृतीचे प्रात्यक्षिक दाखवून त्या पाककृती घरी बनविण्यासाठी समजावून सांगितले जाते.

दाभोळ प्रकल्पातील दुर्धर असणाऱ्या ४ बालकांपैकी ३ बालके हृदय विकाराने आजारी असून त्यापैकी २ बालकांवर खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत व एका बालकाची 2D इको तपासणी केली असून पुन्हा त्याची सहा महिन्याने तपासणी करावयाची आहे. तसेच १ बालकाला अपस्माराचा आजार असून त्याच्यावरही खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहे.

-----------------

## राजूरा (जि.चंद्रपूर) येथे तलाव निर्मिती करिता अधिग्रहण केलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीला अल्प दर दिल्याबाबत

**(५१) * ३६६५१ ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या लघूसिंचन (जलसंधारण) विभागांतर्गत राजूरा तालुक्यातील (जि.चंद्रपूर) साखरवाही शेतशिवारात लघुपाटबंधारे तलावाची निर्मिती करण्यासाठी साखरवाही, बोडखा शिवारातील १८ शेतकऱ्यांच्या २९,१३४ हेक्टर शेतजमिनीचे अधिग्रहण करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाचे अंदाजपत्रक व त्याची प्रशासकीय मान्यता त्याच प्रमाणे निविदा प्रक्रिया पूर्ण करुन दिनांक १२ ऑगस्ट, २०१४ ला कामाची सुरुवात झाल्याचे दर्शविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तलाव निर्मिती करिता शेतकऱ्यांच्या जमिनीचा दर हा २.४० लाख प्रतिहेक्टर ठरविण्यात आलेल्या अल्प दरामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, कोरडवाहू शेतजमिनीला १० लाख तर ओलीत शेतीसाठी १२ लाख रुपये दर मिळाला तर तलावासाठी शेतजमिनी शेतकरी देणार असल्याचे समोर आले आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासन काय उपाययोजना करणार आहे वा करीत आहे,
(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) कार्यारंभ आदेश देण्यात आला असून प्रत्यक्ष कामास सुरुवात झालेली नाही.
(३) व (४) नाही.
(५) भूसंपादन अधिकाऱ्यांकडून संयुक्त मोजणी झाली असून भूमी अभिलेख कार्यालयाकडून "क" प्रत प्राप्त करुन प्रचलित भूसंपादन कायद्यानुसार निश्चित होणारा मोबदला संबंधीत भूधारकास देण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सातारा जिल्ह्यातील क्रांतिसिंह नाना पाटील जिल्हा रुग्णालय व कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स, कऱ्हाड येथे कर्करोग रुग्णांसाठी बाह्यरुग्ण विभाग सुरु करण्याबाबत**

**(५२) * ३०४९३ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यातील क्रांतिसिंह नाना पाटील जिल्हा रुग्णालय व कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स, कऱ्हाड यांच्यातर्फे येथील जिल्हा रुग्णालयात महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या गुरुवारी कर्करोग रुग्णांसाठी बाह्यरुग्ण विभाग सुरु करण्यात येणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा कर्करोग बाह्यरुग्ण विभाग लवकरत लवकर सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सातारा जिल्ह्यातील क्रांतिसिह नाना पाटील जिल्हा रुग्णालय, सातारा येथे कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स, कराड जिल्हा सातारा यांचे मार्फत कर्करोग रुग्णांसाठी बाह्य रुग्ण विभाग दिनांक ०३ सप्टेंबर, २०१५ पासून सुरु करण्यात आलेला आहे. येथे कृष्णा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स, कराड येथील तज्ञ डॉक्टरांमार्फत दर महिन्यांच्या पहिल्या व तिसऱ्या गुरुवारी बाह्य कर्करोग रुग्णांची तपासणी करण्यात येत असून दिनांक ३ सप्टेंबर, २०१५ ते दिनांक १५ नोव्हेंबर, २०१५ या कालावधीत ४४ रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेची ८०० कोटींचे देयके प्रलंबित असल्याबाबत

**(५३) * २९२६२ डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अजित पवार (बारामती), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेची ८०० कोटींचे देयके प्रलंबित असल्याची धक्कादायक माहिती माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेसाठी आणखी अडीच ते तीन हजार कोटींच्या मदतीची गरज आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त योजनेचा निधी केंद्र सरकारकडून मिळविण्याबाबत शासनाने कोणता पाठपुरावा केला आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) केंद्र शासनाकडून अत्यल्प निधी प्राप्त झाल्यामुळे ऑक्टोबर २०१५ अखेर राज्यात प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतील रू.५३० कोटीची देयके प्रलंबित आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) राज्यास आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यासाठी वेळोवेळी केंद्र शासनास राज्यशासन स्तरावरुन पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यासोबतच्या प्रादेशिक आढावा बैठकांमध्येही राज्यास पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आलेली आहे. राज्याची निधीची मागणी मांडण्याकरिता मा. मंत्री (ग्रामविकास) महोदया व मा. राज्यमंत्री (ग्रामविकास) यांनी दिनांक १ जून २०१५ रोजी मा. केंद्रीय वित्त मंत्री व केंद्रीय ग्राम विकास मंत्री यांची नवी दिल्ली येथे भेट घेतली आहे. त्याचप्रमाणे मा.मुख्यमंत्री यांनी त्यांच्या दि.१.८.२०१५ च्या पत्रांन्वये मा.प्रधानमंत्री व मा.केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री यांना निधी वितरीत करणेबाबत विनंती केली आहे.

-----------------

### नंदूरबार जिल्ह्यातील तापी बुराई योजनेंतर्गत ठाणेपाडा प्रकल्प नं.२ एम आय टॅक धरणात पाणी टाकण्याबाबत

**(५४) * ३०३३८ ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदूरबार जिल्ह्यातील तापी बुराई योजनेंतर्गत ठाणेपाडा प्रकल्प नं. २ एम आय टॅक धरणात पाणी टाकणे यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.जलसंपदा मंत्री व संबधित विभागाकडे वारंवार लेखी निवेदने देवूनही अद्यापी याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७ ऑगस्ट, २०१५ रोजी मा.जलसंपदा मंत्री यांना पुन्हा लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली तसेच सदरहू प्रकरणी कार्यवाही करण्यास टाळाटाळ करणाऱ्या संबधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप उपाययोजना केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय,

दिनांक १७ ऑगस्ट, २०१५ चे निवेदन मा. मंत्री (जलसंपदा) यांचे कार्यालयात प्राप्त झालेले आहे,

(२) प्रकाशा बुराई उपसा सिंचन योजनेच्या मंजूर प्रकल्प अहवालातील जलनियोजनात ठाणेपाडा २ लघु पाटबंधारे योजनेत पाणी टाकण्यासाठी अतिरिक्त पाण्याची तरतूद उपलब्ध नाही. त्यामुळे तापी बुराई योजनेअंतर्गत ठाणेपाडा प्रकल्प नं, २ एम. आय. टँकमध्ये पाणी टाकणेबाबतची मागणी पूर्ण करता येणे शक्य नाही,

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात पहिल्या सहा महिन्यात विक्रीकरात वसुलीपेक्षा तब्बल २ हजार कोटी रुपयांची झालेली तुट

**(५५) * ३२३४७ श्री.संजय सावकारे (भुसावळ), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१४ -१५ या आर्थिक वर्षात पहिल्या सहा महिन्यात विक्रीकरात अपेक्षित वसुलीपेक्षा तब्बल २ हजार कोटी रुपयांची तुट निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विक्रीकराच्या माध्यमातून व्यापारांना देण्यात येणारे परतावे रोखण्याचे आदेश शासनाने विक्रीकर विभागास दिले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वसुलीत वाढ होण्याबाबत शासन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) व्यापाऱ्यांना देण्यात येणारे परतावे रोखण्याबाबत शासनाकडून कोणतेही आदेश दिलेले नाहीत.

(३) लागू नाही. ही बाब खरी नसल्यामुळे चौकशी करण्यात आली नाही.

(४) अशी बाब नाही, हे खरे नाही.

(५) लागू नाही.

-----------------

**औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालयाने जलयुक्त शिवाराच्या बंधाऱ्याच्या संचिकांना कार्यादेश असताना निधीअभावी स्थगिती दिली असल्याबाबत**

**(५६) * ३३२१३ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हाधिकारी कार्यालयाने लघुसिंचनांतर्गत येणाऱ्या जलयुक्त शिवाराच्या २५० बंधाऱ्याच्या संचिकांना कार्यादेश असताना निधीअभावी स्थगिती दिली असल्याचे दिनांक २१ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने जलयुक्त शिवार योजनेसाठी ३७ कोटी १९ लाख रुपयांचा निधी मंजूर केला त्यातील २१ कोटी ९९ लाख रुपये लघुसिंचन विभागाला देण्याचे आदेश निर्गमित केले परंतु जिल्हा नियोजन विभागाने हा निधी समितीच्या नियत्वेच्या कामासाठी नियमबाह्य वापरला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १० टक्के जलयुक्त शिवार योजनेसाठी देण्याचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी नियोजन विभागाला दिले परंतू नियोजन विभागाने आजपर्यंत तसा प्रस्ताव सादर केला नसल्याने कंत्राटदारांची देयके व कामे प्रलंबित असल्यामुळे शासनाने यावर काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत औरंगाबाद जिल्ह्यामध्ये २८५ सिमेंट नाला बांधाच्या निविदा स्वीकृत करण्यात आल्या होत्या. उपलब्ध निधी विचारात घेता २८५ योजनांपैकी ४३ कामांना स्थगिती दिली असून १४ कामे रद्द करण्यात आली आहेत.

(२) हे खरे नाही.

जिल्हा वार्षिक योजना सन २०१५-१६ अंतर्गत औरंगाबाद जिल्ह्यासाठी जलयुक्त शिवार अभियानांतर्गत घ्यावयाच्या कामासाठीच्या ३७ कोटी १९ लक्ष इतका नियतव्यय आहे. जलयुक्त शिवार अभियानाच्या जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार सदर निधीचे वितरण कृषि विभागाला रु.१४.२७ कोटी, उप वनसंरक्षक, वन विभाग ०.३९ लक्ष कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद सिंचन १.५८ कोटी व कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) रु.२०.९५ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

तथापि, जलयुक्त शिवार अभियानांतर्गत कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) या विभागास वितरित केलेल्या निधी व्यतिरिक्त आवश्यक असणाऱ्या निधीसाठी जिल्हा नियोजन समितीकडून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या दिनांक २९/१०/२०१५ च्या पत्रान्वये जिल्हा नियोजन अधिकारी यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोलापूर जिल्हयात मुलींसाठी सुरु केलेल्या शासकीय योजनेचा लाभच मिळाला नसल्याबाबत**

**(५७) * २९२९०  श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने मुलींसाठी सुरु केलेल्या शासकीय योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नसल्याने तिला अत्यल्प प्रतिसाद मिळत असून सोलापूर जिल्हयात १८६ हून अधिक लाभार्थ्यांची प्रकरणे शासनाकडे पाठविण्यात आली परंतु याबाबत लाभार्थ्यांना अद्याप शासकीय योजनेचा लाभच मिळाला नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच अनेकांच्या मुलींच्या नावाने काढलेल्या सुकन्या योजनेचे पैसेच शासनाकडून टाकण्यात आले नसल्याचेही आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली वा करणार आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या गावांमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राबविण्याबाबत

**(५८) * २९२२२ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २० ऑक्टोबर, २०१५ च्या शासन निर्णयाप्रमाणे राज्यातील सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील पिकांची हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या १४७०८ गावांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करण्यात येऊन विविध उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी किती गावात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कामे चालू आहेत,

(३) असल्यास, उस्मानाबाद सारख्या दुष्काळग्रस्त जिल्हयातील ३०% गावात देखील रोजगार हमी योजनेची कामे सुरु नसल्याची प्रमुख कारणे काय आहेत,

(४) असल्यास, राज्यातील अधिक गावांमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना प्रभावीपणे राबविण्याच्या हेतूने शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ५६४८ ग्रामपंचायतीमध्ये काम चालू आहेत.

(३) उस्मानाबाद जिल्हयात सद्य:स्थितीत ४३% गावामध्ये कामे सुरु आहेत. जिल्हयात एकूण ६२१ ग्रामपंचायती असून ग्रामपंचायत व यंत्रणास्तरावरुन प्रत्येक ग्रामपंचायत मध्ये पुरेसा सेल्फही उपलब्ध नाही.

(४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना जिल्हयामध्ये प्रभावीपणे राबविण्याचे हेतूने दि. ३० एप्रिल, २०१५ व दि.१ ऑक्टोबर, २०१५ रोजी एक दिवस मजुरासोबत हा कार्यक्रम पूर्ण जिल्हयामध्ये यशस्वीपणे राबविण्यात आला. त्याचप्रमाणे उस्मानाबाद जिल्हयामध्ये कामावर या अभियान, सुवर्ण जयंती राजस्व अभियान, बळीराजा चेतना अभियान तसेच जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत

२१७ गावांची निवड झाली असून त्या गावात जलयुक्त शिवार अभियान व मग्रारोहयो जनजागृती अभियान यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी दोन तालुक्यासाठी एक रथाचे आयोजन करुन गावोगावी प्रचार यंत्रणा राबविण्यात आली. इत्यादी कार्यक्रम राबवून जास्तीत जास्त मजुरांना कामावर येण्यासाठी आवाहन करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सुमारे २ लाख अंगणवाडी सेविका, मदतनीस, मिनी अंगणवाडी सेविकांना मागील ६ महिन्यापासून वेतनच मिळाले नसल्याबाबत

**(५९) * २९६८४ श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे २ लाख अंगणवाडी सेविका, मदतनीस, मिनी अंगणवाडी सेविकांना मागील ६ महिन्यापासून वेतनच मिळाले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी अनेक जिल्हयात माहे सप्टेंबर, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात मोर्च्याचे आयोजन केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

काही ठिकाणी काही महिन्याचे मानधन देणे थकित होते.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्या या थकित मानधन देणे, वेतनश्रेणी लागू करणे, महागाई भत्ता देणे, इत्यादी स्वरुपाच्या आहेत. या मागण्यांबाबत शासनाने पुढीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे.

(अ) राज्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांना माहे ऑक्टोंबर, २०१५ पर्यंत मानधन अदा करण्यात आलेले आहे. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना नियमितपणे मानधन अदा करण्याबाबत शासनस्तरावरुन सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(ब) एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र शासनाची योजना असून ती राज्य शासनामार्फत राबविण्यात येत आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या मॅन्युलप्रमाणे अंगणवाडी सेविका, मदतनीस ही पदे मानधनी स्वरुपाची असून त्यांच्या अंगणवाडीची कामकाजाची वेळ ही फक्त चार तास आहे. त्यामुळे त्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देणे संयुक्तिक होणार नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाने Civil appeal Nos. ४९५३-४९५७ of १९९८ state of Karnataka Vs. Ameerabi & others याप्रकरणी दिनांक ७/१२/२००६ रोजी अंगणवाडी सेविका / मदतनीस ही मानधनी पदे असून त्यांची पदे ही Civil Posts नाहीत असा निर्णय दिलेला आहे.

अंगणवाडी सेविका / मदतनीस ही मानधनी पदे असल्यामुळे त्यांना शासकीय कर्मचा-यांचा दर्जा नाही. त्यामुळे त्यांना शासकीय कर्मचा-यांप्रमाणे वेतनश्रेणी, महागाई भत्ता वार्षिक वेतनवाढ देता येणे शक्य नाही. तथापि, अंगणवाडी सेविकेला ५ वर्ष अनुभवानंतर रु.३१/- इतकी वाढ मानधनामध्ये करण्यात येते.

(क) अंगणवाडी सेविका, मदतनीसांना प्रतिवर्षी रु.१०००/- प्रमाणे भाऊबीज भेट देण्यात येते. तसेच सन २०१४-१५ या आर्थिक वर्षातील प्रलंबित भाऊबीज भेट माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये अदा करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २२ सप्टेंबर, २०१५ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे.

(ड) अंगणवाडी सेविकांना प्रतिवर्षी रु.१०००/- प्रमाणे परिवर्तनीय निधी (Flexi Fund) वितरीत करण्यात येतो. त्यामधून अंगणवाडीचे साहित्य वाहतूकीचा खर्च भागविण्यात येतो व तसा खर्च करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे.

-----------------

**अकोला जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाअंतर्गत**
**मोठया प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याबाबत**

**(६०) * ३३८७० श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाअंतर्गत मोठया प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याच्या अनेक तक्रारी नागरिकांनी, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मागील २ वर्षात सतत शासनाचे ग्रामविकास मंत्रालयाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) उपरोक्त, जिल्हा परिषद मध्ये कार्यरत उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.इनामदार यांना दिनांक १९ ऑक्टोबर, २०१५ रोजी लाचलुचपत खात्याचे अधिकाऱ्यांनी लाच स्विकारताना पकडले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारी प्रकरणी विभागीय आयुक्त, अमरावती यांचेमार्फत चौकशी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त चौकशीत काय आढळून आले,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) चौकशी सुरु असून अद्याप चौकशी पूर्ण झालेली नाही. चौकशी अंतिम टप्प्यात आहे.

(५) चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषी अधिकाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हापुर जिल्हयातील दुधगंगा प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(६१) * २८६६९ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापुर जिल्हयातील दुधगंगा प्रकल्पास मंजूरी मिळून ५० वर्षे लोटली तरी अद्यापही प्रकल्प अपूर्ण असून दिवसेंदिवस प्रकल्पाच्या खर्चात वाढ होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डाव्या व उजव्या या दोन्ही कालव्याचे काम प्रत्येकी ५० टक्केहून अधिक अपूर्ण असून मूळचा २६.२५ कोटी रूपयांचा प्रकल्प खर्च आता १७१२.८० कोटी रूपयांवर पोहचला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, ७५ टक्के काम पुर्ण असणाऱ्या प्रकल्पानांच निधी देण्याच्या शासनाच्या धोरणामुळे निधी उपलब्ध होवू शकला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकल्पास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय,
(२) दूधगंगा प्रकल्पाच्या डाव्या व उजव्या कालव्यांचे काम (मुख्य व शाखा कालव्यासह) भौतिकदृष्टया अनुक्रमे ६० टक्के व ९० टक्के पूर्ण आहे, प्रकल्पास रु.१६.२५ कोटी रकमेस मूळ प्रशासकीय मान्यता व रु.१७१२.८० कोटी रकमेस तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे,
(३) व (४) सन २०१५-२०१६ करिता प्रकल्पास रु. १८.०० कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यांत आलेली आहे प्रकल्पावर आतापर्यंत रु. ८१९.२० कोटी खर्च झाला असून तो अद्यावत मान्यता प्राप्त किंमतीच्या ४७.८३ टक्के आहे, अर्थोपायांची स्थिती व मा. राज्यपाल यांच्या निर्देशानुसार निधीची तरतुद करण्यात येते,
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोप्रोली खोपटा (ता.उरण, जि.रायगड) येथील ठेकेदारांच्या निकृष्ट कामामुळे शेती नापिक होत असल्याबाबत

**(६२) * २८७०२ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण तालुक्यात (जि.रायगड) येथील गेल्या कित्येक वर्षापासून दुरुस्ती न झालेली खार बंदिस्ती आणि खारजमीन विभागाच्या ठेकेदारांच्या निकृष्ट कामामुळे कोप्रोली खोपटा परिसरातील लक्ष्मी खार, चिखलीखार, धसाखोशी येथील शेती नापिक होत असल्याने या दर्जाहीन कामाचे मूल्यमापन करुन अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची मागणी येथील शेतक-यांनी दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास झालेल्या आमसभेत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निकृष्ट कामाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच, चौकशीनुसार संबंधित ठेकेदारांवर व अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

आमसभेची बैठक झाली हे खरे आहे. सदर बैठक दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी झाली नसुन ती दि.१३.८.२०१५ रोजी झाली. सदर सभेत योजनेच्या किंमत वाढी बाबत प्रश्न उपस्थित झाले होते.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

सदर खारभूमी योजनेस शासन निर्णय दिनांक ४.१०.२००७ अन्वये रु. ४५२.८४ लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीस मान्यता प्रदान करण्यात आली होती. आता दरसूचीतील फरकामुळे, जादा दराच्या निविदा स्विकारल्यामुळे, परिमाणातील बदलामुळे व वाढीव वहन अंतरामुळे योजनेच्या किंमतीत वाढ झाली असल्यामुळे रु.८०१.४५ लक्ष किंमतीच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकास दि.०४.०२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर जिल्हापरिषद मुख्य इमारत, कागलकर हाऊस, पदाधिकारी निवासस्थाने, लॉन या कामांची देखभाल दुरुस्तीच्या कामात कोट्यवधी रुपयांचा झालेला अपहार**

**(६३) * ३४१८४ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हापरिषद मुख्य इमारत, कागलकर हाऊस, पदाधिकारी निवासस्थाने, लॉन या कामांची देखभाल दुरुस्ती इमारत उपविभागामार्फत करण्यात येत असून गेल्या तीन वर्षात या विभागाने अनेक कामे न करता कोट्यवधी रुपयांचा अपहार केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) चौकशीनुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दुर्धर आजारग्रस्त गोरगरीब रुग्णांच्या उपचारासाठी आर्थिक मदत देण्यासाठी सुरु केलेल्या राजीव गांधी जीवनदायी योजनेबाबत**

**(६४) * २९६५४ श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दुर्धर आजारग्रस्त गोरगरीब रुग्णांच्या उपचारासाठी आर्थिक मदत देण्यासाठी शासनाने राजीव गांधी जीवनदायी योजना सुरु करुन सदरहू योजना अत्यंत चांगली असली तरी या योजनेबाबतची माहिती प्रत्यक्ष लाभार्थ्यापर्यंत पोहोचलीच नसल्याने बुलढाणा जिल्ह्यात हृदयरोग, कर्करोग आणि किडनी यासारख्या दुर्धर आजाराचे गोरगरीब रुग्ण उपचाराच्या प्रतिक्षेत असल्याचे दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ कसा मिळतो, कोणती कागदपत्रे कुठे दाखल करावी लागतात याबाबतची स्पष्ट माहिती संबंधित अधिकारी वा कर्मचारी पुरवित नसल्याने गरजू लाभार्थी वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) नाही, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची जाहिरात विविध दूरदर्शन वाहिन्या/रेडियो/पोस्टर्स/पॅम्प्लेट/वर्तमानपत्रे/होर्डिंग्ज/बसस्थानकांवर उद्घोषणा इ.माध्यमाद्वारे केली जाते. तसेच आरोग्य शिबिरामधून लाभार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधण्यात येतो.

योजनेंतर्गत आतापर्यंत बुलढाणा जिल्ह्यात ३०७७ उपचार/शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

(२) योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयांमध्ये आरोग्य मित्रांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्यामार्फत रुग्णांना मार्गदर्शन केले जाते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पावसाच्या अनियमिततेमुळे जमिन आद्रतेमध्ये घट झाल्याने शेतपिकांवर होत असलेला विपरीत परिणाम

**(६५) * ३०७४६ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पावसाच्या अनियमिततेमुळे जमिन आद्रतेमध्ये घट झाल्याने शेतपिकांवर होत असलेला विपरीत परिणाम टाळण्यासाठी राज्य शासनाने जलयुक्त शिवार योजना दिनांक १५ ऑगस्ट, २०१५ पासून सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत किती जिल्ह्यात वा तालुक्यात जलयुक्त शिवार योजना राबविण्यात आली आहे,

(३) तसेच या योजनेवर आतापर्यंत शासनाने किती खर्च केला आहे,

(४) असल्यास, जलयुक्त शिवार योजनेमुळे किती प्रमाणात सिंचन उपलब्ध झाले आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून राज्यात दि. ५ डिसेंबर, २०१४ च्या शासन निर्णयान्वये जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे.

(२) सदर योजना राज्यात ३४ जिल्ह्यामधील सुमारे ३०२ तालुक्यांमध्ये राबविण्यात येत आहे.

(३) विविध यंत्रणा/विभाग सी.एस.आर. व लोकसहभाग यामधून सुमारे रु. १५७७.०० कोटी निधीची कामे झालेली आहेत.

(४) जलयुक्त शिवार अभियानातून ऑक्टोबर अखेर पूर्ण झालेल्या कामामधून एक सरंक्षित सिंचन दिल्यास सुमारे ६१०८४० हेक्टर संरक्षित सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे.

-----------------

**बीड जिल्हयात ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असलेल्या शेकडो संगणक परिचालकांच्या मानधनात महाऑनलाईन कंपनीने केलेला गैरव्यवहार**

**(६६) * ३३०२३ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असलेल्या शेकडो संगणक परिचालकांच्या मानधनात सुमारे कोट्यवधी रुपयांचे महाऑनलाईन कंपनीने गैरव्यवहार केल्याची गंभीर बाब माहे ऑक्टोबर, २०१५ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी शासनाकडून करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच उक्त प्रकरणी गैरव्यवहार करणाऱ्या कंपनीच्या दोषी पदाधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) या आशयाची तक्रार दिनांक १८ सप्टेंबर, २०१५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड जिल्हा पोलीस अधिक्षक, जिल्हा बीड यांचेकडे प्राप्त झालेली आहे.

(२) व (३) पोलीस स्टेशन शिवाजीनगर, बीड यांचेमार्फत चौकशी सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**राज्य एड्स नियंत्रण संस्थेला निधी मिळण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(६७) * २८६४७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य एड्स नियंत्रण संस्थेला दरवर्षी केंद्र शासनाकडून माहे मे महिन्यात संपूर्ण निधी थेट संस्थेला मिळत होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा निधी गेल्या वर्षापासून राज्य शासनामार्फत देण्यास सुरुवात करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे संस्थेला निधी मिळण्यास विलंब होत असून, सन २०१४-१५ या वर्षी केंद्र शासनाकडून आलेल्या १३० कोटी निधीमध्ये राज्य शासनाने २० टक्के कपात केली असून केवळ १०८ कोटी रुपये संस्थेला दिले असून, सदरचा निधीही राज्य शासनाकडून दोन टप्प्यात देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यामुळे संस्थेचे अनेक उपक्रम निधीअभावी बंद करावे लागत असून, यासंदर्भात दर महिना होणाऱ्या बैठकही बंद करण्यात आली असून, अपूऱ्या निधीअभावी संस्थेच्या कामकाजावर विपरित परिणाम झाला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी राज्य शासनाने या उपक्रमासाठी ८० टक्के निधीला पावसाळी अधिवेशनात मंजूरी दिलेली असून, सदरचा निधी अद्यापही संस्थेला मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार एड्स नियंत्रण संस्थेला नियमित व पुरेसा निधी पुरविण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था (नॅको, नवी दिल्ली) यांचे कडून सन २०१३-१४ पर्यंत या संस्थेस निधीचा पहिला हप्ता मे-जुन महिन्यात वितरित केला जात होता. तसेच उर्वरित निधी दोन ते तीन हप्त्यांत नॅको, नवी दिल्ली यांचेकढून वितरित होत होता.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

केंद्र शासनाचे सन २०१४-१५ मध्ये सदर संस्थेस रु. १३०.९१ कोटी इतका वार्षिक कृती आरखडा मंजुर केला होता. त्यापैकी केंद्र शासनाकडुन दोन हप्त्यामध्ये वितरित केलेला रु.१०८.०० कोटी इतका निधी राज्य शासनाने संस्थेस अदा केला आहे.

(४) हे खरे नाही.

केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या प्राध्यान्यक्रम ठरवून योजनेची अंमलबजावणी केली जात आहे. संस्थेमार्फत मासिक आढावा बैठका आवश्यकतेनुसार व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे घेतल्या जात आहेत.

(५) हे खरे नाही.

सन २०१५-१६ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये पुरवणी मागणी द्वारे मंजूर झालेला रु ११.९० कोटी इतका निधी संस्थेला उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील १५ हून अधिक प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर नसल्याबाबत**

**(६८) * ३४४२८ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील १५ हून अधिक प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर नसल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१५ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वाईन फ्यु, डेंग्यू, टायफाईड यासारखे साथींच्या आजारांची साथ असल्याने ग्रामीण भागातील रुग्णांचे हाल होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, निम्याहून अधिक आरोग्य केंद्रे डोंगराळ तालुक्यात असल्याने राधानगरी, भुदरगड, आजरा, चंदगड, गगनबावडा आणि शाहुवाडी येथे डॉक्टरांची रिक्त पदे भरणेबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील आरोग्य विभागांतर्गत एकुण ७३ प्राथमिक आरोग्य केंद्रांकरीता १४६ पदे मंजूर असून त्यापैकी ९२ स्थायी, १२ बंधपत्रित आणि ८ अस्थायी अशी एकूण ११२ पदे भरलेली आहेत. ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये दोन वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत अशा वैद्यकीय अधिकाऱ्यांना ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रात एकही वैद्यकीय अधिकारी कार्यरत नाही अशा ठिकाणी १५-१५ दिवसांच्या रोटेशन पध्दतीने तात्पुरते कामकाज पाहण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत व त्यांच्यामार्फत त्या-त्या भागातील रुग्णांना रुग्णसेवा दिली आत आहे.

(३) आरोग्य विभागांतर्गत आरोग्य केंद्राकरीता डॉक्टर उपलब्ध करुन देण्याकरिता माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची भरती करण्यात आली असून त्यांची समुपदेशनाद्वारे शाहुवाडी तालुक्यासाठी २ आणि हातकणंगले, पन्हाळा, भुदरगड या तालुक्यांसाठी प्रत्येकी १ वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली आहे. उर्वरित रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्हा परिषदेमार्फत कोट्यवधी रुपयांची औषधे खरेदी करण्यात येऊनही प्राथमिक आरोग्य व उपकेंद्रात औषधांचा तुटवडा असल्याबाबत

**(६९) * ३३१०० श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत २०१५-१६ या वर्षासाठी कोटयवधी रुपयाची औषधे खरेदी करण्यात येऊन सुध्दा जिल्ह्यातील २४ प्राथमिक आरोग्य केंद्र व १३२ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात रुग्णांना शासकीय औषधे न देता औषधे उपलब्ध नसल्याचे सांगून बाहेरुन बाजारातील औषधे खरेदी करण्यास सांगण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत मोठया प्रमाणावर औषधे खरेदी होऊन सुध्दा प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामध्ये पुरेशी औषधे उपलब्ध न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाकडून तात्काळ चौकशी करण्यात येऊन संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामध्ये पुरेसा औषधी पुरवठा करण्यासंदर्भात शासनाकडून काय कार्यवाही केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

आरोग्य केंद्र संचालनालयामार्फत केंद्रीय पध्दतीने करण्यात आलेल्या औषध खरेदीमधून दिनांक ३१ मे, २०१५ ते दिनांक ३० ऑगस्ट, २०१५ या कालावधीत एकूण ६७ अत्यावश्यक औषधांचा पुरवठा जिल्हा आरोग्य अधिकारी, हिंगोली यांना करण्यात आला आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी, हिंगोली यांच्याकडे असलेला शिल्लक औषधीसाठा व वेळोवेळी राज्य स्तरावरुन प्राप्त होत असलेला औषधी साठा यामधून हिंगोली जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र यांना मागणीप्रमाणे औषध पुरवठा

करण्यात येत आहे. तसेच आवश्यकतेनुसार आर.के.एस.मधून किंवा अन्य उपलब्ध निधीमधून स्थानिक स्तरावर औषध खरेदी करुन रुग्णांना वाटप करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील लहान मुलांच्या लसीकरणासाठी वापरण्यात येणारी औषधे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत

**(७०) * ३०६१० श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लहान मुलांच्या लसीकरणासाठी वापरण्यात येणारी औषधे निकृष्ट दर्जाची असल्याचे आरोग्य विभागाने केलेल्या चौकशीमध्ये आढळून आल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर प्रकरणी संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

लसीकरण कार्यक्रम अंमलबजावणीसाठी आवश्यक लसी व ए.डी.सिरींज यांचा पुरवठा केंद्र शासनाकडून केला जातो. राज्याला एप्रिल, २०१५ ते ऑक्टोबर, २०१५ या कालवधीत पुरवठा झालेल्या सर्व लसींची गुणवत्ता चाचणी सेंट्रल रिसर्च इस्न्टीट्युट, कसौली यांच्यामार्फत करण्यात आली असून त्यानुसार सर्व लसी गुणवत्ता निकष पुर्ण करत आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयातील अति दुर्गम भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टरांची पदे रिक्त असल्याबाबत

**(७१) * ३०२२१ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील अति दुर्गम भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टरांची ३९ पदे रिक्त असल्यामुळे संपूर्ण जिल्हाभर आरोग्य सेवेचा पुरता बोजवारा उडाल्याचे विदारक वास्तव्य माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांचे अनुशेषामुळे सध्या कार्यरत असलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त ताण पडत असून नागरिकांना आरोग्य सेवा मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चंद्रपूर जिल्हयातील रिक्त असलेल्या डॉक्टरांची पदे भरण्याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) नाही.

ऑगस्ट, २०१५ मध्ये चंद्रपूर जिल्हयातील ५८ प्राथमिक आरोग्य केंद्राकरिता वैद्यकीय अधिकारी या संवर्गाची एकूण् १०८ पदे मंजूर असून ८५ पदे भरलेली होती. अतिदुर्गम भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी मांडवा आणि चिंचोली ही ठिकाणे वगळता इतर सर्व ठिकाणी वैद्यकीय अधिकारी कार्यरत होते. रिक्त पदांच्या ठिकाणी दुसऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची पर्यायी व्यवस्था करण्यात येऊन त्या-त्या भागातील रुग्णांना रुग्णसेवा देण्यात आली.

(३) दि. १८ नोव्हेंबर, २०१५ अन्वये २२ वैद्यकीय अधिकाऱ्यांनी चंद्रपूर जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये रिक्त असलेल्या पदांवर नियुक्तीचे आदेश देण्यात आलेले आहेत. वैद्यकीय अधिकाऱ्यांची उर्वरित रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई उमरखाडीतील बाल सुधारगृहांची अपुऱ्या सोयी सुविधांमुळे झालेली दयनीय अवस्था

**(७२) * ३२१९० श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उमरखाडीतील बाल सुधारगृहांमध्ये अपुऱ्या सोयी सुविधांमुळे दयनीय अवस्था झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बालसुधारगृहांची परिस्थिती दयनीय झाल्याची नोंद उच्च न्यायालयानेही घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बालसुधारगृहांची प्रशासनाने तपासणी केली आहे काय,

(४) असल्यास, तपासणीनुसार शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय,

दि चिल्ड्रेन्स एड सोसायटी संचलित निरिक्षणगृह, उमरखाडी या स्वयंसेवी संस्थेत अपु-या सोयी-सुविधा असल्याचे माहे सप्टेंबर २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) मा.प्रधान सचिव, महिला व बाल विकास यांनी स्वत: सदर संस्थेस भेट देवून मुख्य अधिकारी, चिल्ड्रेन्स एड सोसायटी, उप अभियंता बांधकाम, अभियंता विद्युत तसेच, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई शहर यांना एकत्रित समन्वयाने आवश्यक सुधारणेबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. तसेच, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई-शहर यांचेमार्फत सदर संस्थेस नियमित भेटी देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्ह्यातील २०० गावांची जलयुक्त शिवार योजनेसाठी निवड करण्यात आल्याबाबत**

**(७३) * ३०२१५ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील २०० गावांची जलयुक्त शिवार योजनेसाठी निवड करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जलयुक्त शिवार योजनेची माहे ऑक्टोबर, २०१५ पर्यंतची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, योजनेवर आतापर्यंत किती खर्च करण्यात आला आहे,

(४) असल्यास, ही जलयुक्त शिवार योजना केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे,

(२) पुणे जिल्ह्यातील २०० गावांमध्ये एकूण ४४३३ कामे विविध यंत्रणेमार्फत हाती घेण्यात आला असून त्यापैकी ३०१० कामे पूर्ण झाली असून १४२३ कामे प्रगतिपथावर आहेत,

(३) विविध शासकिय यंत्रणा/विभाग व सी.एस.आर. व लोकसहभाग मधून उपलब्ध झालेल्या निधीमधून ऑक्टोबर, २०१५ अखेर रु. ६२.२७ कोटी खर्च झालेला आहे,

(४) पुणे जिल्ह्यात सन २०१५-१६ करिता जलयुक्त शिवार योजनाअंतर्गत निवडण्यात आलेल्या २०० गावांमधील जलयुक्त शिवार योजनेची कामे मार्च २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

**नगर जिल्ह्यातील मुळा, भंडारदरा व निळवंडे या धरणामधील पाणी मराठवाडयातील जायकवाडी धरणात सोडण्यात आल्याबाबत**

**(७४) * ३४६८० श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगर जिल्ह्यातील मुळा, भंडारदरा व निळवंडे या धरणामधील पाणी मराठवाडयातील जायकवाडी धरणात सोडण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडा व नगर जिल्ह्यात संघर्ष सुरु झाले, हे खरे आहे काय,
(३) त्याचबरोबर ज्या नगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी या धरणात गेल्या, शेतकऱ्यांनी कोट्यवधी रुपये खर्च करुन बारामाही शेती उभी केली, कारखाने उभे केले त्यांना आता पिण्यासाठी पुरेसे पाणी मिळत नाही, हा नगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, नगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पुरेसे पाणी उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२), (३) व (४) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ मधील तरतूदीनुसार समन्यायी पध्दतीने पाणी वाटप करण्याचे घोरण राज्य शासनाने स्विकारलेले आहे. दरवर्षी पावसाळ्यामध्ये गोदावरी खोऱ्यात उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे सिंचन व बिगर सिंचन प्रयोजनार्थ समन्यायी पध्दतीने वापर व्हावा याकरिता उर्ध्व भागातील धरणांमधून निम्न भागातील घरणांकरिता पाणी सोडण्याची कार्यवाही करण्यात येते. अशी कार्यवाही करताना नाशिक व अहमदनगर जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याच्या गरजेनुसार पाणी पुढील वर्षाच्या पावसाळ्यापर्यंत उपलब्ध राहील, याची दक्षता घेण्यात येते, तसेच पाण्याच्या उपलब्धतेनुसार शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात एकात्मिक बालविकास सेवा योजनेतून पुरविण्यात येणारा पोषक आहार निकृष्ट दर्जाचा असल्याबाबत

**(७५) * २८७९६ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील अंगणवाडी , बालवाड्यांमधील विध्यार्थ्यांना व किशोरवयीन मुली, कुपोषित बालक, गरोदर महिला यांना शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतून पुरविण्यात येणारा पोषक आहार हा निकृष्ट दर्जाचा व जनावरांच्या खाद्यासारखा

पुरविला जातो अशा लेखी तक्रारी महिला व बाल विकास विभागाकडे आरोग्य सेविका, अंगणवाडी सेविका व डॉक्टर यांनी माहे सप्टेबर, २०१५ व त्यापूर्वी अनेक वेळा केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निकृष्ट पोषण आहार पुरवठा करणाऱ्या जबाबदार असलेल्या कंत्राटदार व महिला व बाल विकास विभागाचे अधिकारी यांच्या विरुद्ध आतापर्यंत चौकशी करून काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, पोषण आहार सकस पुरविण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) सद्य:स्थितीत राज्यातील ५५३ प्रकल्पांपैकी ३१४ प्रकल्पांमध्ये स्थानिक महिला बचत गट / महिला मंडळ / ग्राम समुदाय यांची जिल्हास्तरीय आहार समितीमार्फत निवड करुन त्यांचेमार्फत THR आहार पुरवठा सुरु आहे. उर्वरित प्रकल्पांमध्ये सक्षम बचत गटांची जिल्हास्तरीय आहार समितीमार्फत निवड न झाल्याने व सदर प्रकल्पामध्ये पोषण आहारात खंड पडून लाभार्थी पोषण आहारापासून वंचित राहू नये म्हणून पूर्वीच्या ३ महिला संस्थामार्फत THR आहार पुरवठा सुरु आहे.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) तालुक्यामधील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(७६) * ३६७८६ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यामध्ये सन २०१२-२०१३ ते २०१३-२०१४ या आर्थिक वर्षातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामांच्या सामाजिक अंकेक्षण प्रक्रियेदरम्यान झालेल्या जनसुनावणीमध्ये रुपये ३५,९३,९२१/- इतक्या रकमेच्या कामांबाबत गैरव्यवहार झाल्याचा अहवाल सामाजिक अंकेक्षण पथकाने जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदरहू गैरव्यवहारप्रकरणी दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय

जव्हार (जि.पालघर) येथे मनरेगा अंतर्गत सन २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे सामाजिक अंकेक्षण प्रक्रिया दरम्यान झालेल्या दि.१५.४.२०१५ चे जनसुनावणीचे वेळी रु.३५,९३,९२१/- इतक्या रकमेच्या कामाबाबत अपहार झाल्याचा अहवाल सामाजिक अंकेक्षण पथकाने सादर केला आहे.

(२) (१) सदर प्रकरणी तीन ग्रामरोजगारसेवक प्रथमदर्शनी दोषी आढळून आल्याने त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत.

(२) साकूर गावचे पोस्टमन यांनी मजूरांचे पैसे अदा केले नसल्यामुळे त्यांचे विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केला आहे.

(३) सा.बां. विभागाचे एक शाखा अभियंता सकृतदर्शनी जबाबदार असल्यामुळे, त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी आदेशित केली असून त्यांना निलंबीत करण्यात आले आहे.

(४) कृषी विभाग, जव्हार येथील कृषी सहायक यांचेविरुध्द विभागीय चौकशी करण्याचे आदेश विभागीय आयुक्तांनी दिले आहेत.

(५) साकूर ते रामखिंड साईडपट्टी कामामध्ये जबाबदार असलेल्या व्यक्तीची माहिती दिली नसल्यामुळे गट विकास अधिकारी, जव्हार यांना कारणे दाखवा नोटीस दिली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**श्रीगोंदा तालुक्यात काही दांपत्यांना शेजारच्या कर्नाटक, गुजरात राज्यात नेवून गर्भलिंग निदान व नंतर स्त्रीभ्रुणहत्येचे प्रकार होत असल्याबाबत**

**(७७) * ३४४६६ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गर्भलिंग चाचण्या व स्त्रीभ्रुणहत्या बंदी असल्याने श्रीगोंदा तालुक्यातील काही दांपत्यांना काही स्थानिक डॉक्टर व मध्यस्थांच्या मदतीने शेजारच्या कर्नाटक, गुजरात राज्यात नेवून गर्भलिंग निदान व नंतर स्त्रीभ्रुणहत्येचे प्रकार होत असल्याची बाब दिनांक १० जुलै, २०१५ रोजी व त्यासुमारास शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गर्भलिंग निदान प्रवृत्त करणा-या डॉक्टर व मध्यस्थांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे,

(३) असल्यास, आतापर्यंत किती जणांवर शासनाने कारवाई केली आहे,
(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**डॉ. दीपक सांवत :** (१) असे निदर्शनास आले नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रायपूर (ता.ब्रम्हपुरी, जि.चंद्रपूर) येथील पैनगंगेच्या पात्रात मोरांची सर्रास हत्या होत असल्याबाबत**

**(७८) * ३१९८६ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायपूर (ता.ब्रम्हपुरी, जि.चंद्रपूर) येथील पैनगंगेच्या पात्रात मोरांची सर्रास हत्या होत असून त्याकडे वन विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिनांक २० सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, आतापर्यंत किती जणांना कोणत्या कलमान्वये अटक करण्यात आले आहे काय,
(४) तसेच, त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे म्हारळ (ता.उल्हासनगर, जि.ठाणे) या ग्रामपंचायतीमध्ये गेल्या तीन वर्षापासून मिळणाऱ्या शासनाच्या मुद्रांक शुल्क अनुदानात झालेला गैरव्यवहार**

**(७९) * ३०७४९ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे म्हारळ (ता.उल्हासनगर, जि.ठाणे) या ग्रामपंचायतीमध्ये गेल्या तीन वर्षापासून मिळणाऱ्या शासनाच्या मुद्रांक शुल्क अनुदानात १ कोटी ७ लाख रुपयांचा

घोटाळा झाल्याची लेखी तक्रार समाजसेवक महेश देशमुख व ग्रामपंचायत सदस्य महेश खोत यांनी कोकण भवन, नवी मुंबई येथे केल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१५ अखेर निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, म्हारळच्या सरपंच व ग्रामसेवकाविरुध्द गुन्हे दाखल करुन या सर्व प्रकरणाचा तपास तातडीने करण्यात यावा अशीही मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या सर्व प्रकरणाचा तपास पूर्ण झाला आहे काय तपासाचे निष्कर्ष काय आहेत त्यामध्ये दोषी आढळलेल्या व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) होय.
(३) सदर प्रकरणी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पावस्व) जिल्हा परिषद,ठाणे यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत प्राथमिक चौकशी करण्यात आलेली असून सकृत दर्शनी ग्रामसेवक दोषी आढळल्याने ग्रामसेवक श्री.एम.ए.शेख यांना निलंबित करण्यात आलेले असून सदर प्रकरणाबाबत सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या तत्कालीन अध्यक्षांनी न झालेल्या कामांची देयके घेतल्याबाबत

**(८०) * २८९३९ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या तत्कालीन अध्यक्षानी सन २०१२ च्या माहे एप्रिल महिन्यात कोल्हापूरी बंधारे व पुलाच्या न झालेल्या कामाचे ४ कोटी ३२ लाख ४० हजार ७२ रुपये बनावट देयके घेतल्या प्रकरणी अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सहा अधिका-याविरुद्ध माहे ऑगस्ट २०१५ मध्ये फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूरी बंधारे व पुलाच्या न झालेल्या कामाची बनावट देयके याप्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीअंती दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, ९ वे न्यायालय, औरंगाबाद यांचे कडील एम.ए.नं.७७१/१५ च्या निर्णयानुसार सि.आर.पी.सी. चे कलम १५६(३) अन्वये चौकशी करण्याचे आदेशित केले आहे.
(२) सदर गुन्हा हा जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने दिलेल्या मंजुरीच्या बाबतीत आहे, काम न झाल्याबाबत तक्रार नाही, त्यामुळे अशी चौकशी करण्यात आलेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे कर्ले (ता.सिंदखेडा, जि.धुळे) गावात लांडग्याच्या हल्ल्यात १७ मेंढ्या ठार झाल्याची घटना

**(८१) * ३०६४५ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कर्ले (ता.सिंदखेडा, जि.धुळे) गावात लांडग्याच्या हल्ल्यात १७ मेंढ्या ठार झाल्या असल्याची घटना माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन विभागाच्या निर्णयानुसार वन्य प्राण्यांच्या हल्ल्यामध्ये नुकसान झालेल्या कुटुंबाना अर्थसहाय्य देण्यात आले आहे काय,
(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) मौजे कर्ले ता. शिंदखेडा, जि. धुळे या गावात दिनांक १५.०८.२०१५ रोजी रात्रीच्या सुमारास लांडग्याने श्री. भगवान गजमल भिल यांच्या १६ मेंढ्या व १ बकरी ठार केल्या आहेत. प्रचलित शासन निर्णयान्वये वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत झालेल्या पशुधनाच्या नुकसान भरपाईपोटी संबंधित नुकसानग्रस्तास रु. ५०,२५० अदा करण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**सिकलसेलग्रस्त रुग्ण विदर्भात असतांनाही मुंबईच्या तुलनेत सर्वात कमी निधी उपलब्ध करुन देण्यात आल्याबाबत**

**(८२) * ३६२२६ श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१३ ते सन २०१५ दरम्यान सर्वाधिक सिकलसेलग्रस्त रुग्ण विदर्भात असतांनाही मुंबईच्या तुलनेत सर्वात कमी निधी वितरीत करण्यात आल्याबाबतची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरातील एका सिकलसेलग्रस्त रुग्णांवर सन २०१३ ते सन २०१५ या वर्षात १.७३ लक्ष रुपयाचा निधी वितरीत करण्यात आला तर नागपूरच्या वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडीकल) मध्ये सन २०१३ ते २०१५ या दरम्यान २२३६ रुग्ण भरती झाले असून त्यांचा प्रतिरुग्ण खर्च मात्र २७९५/- रुपये देण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाकडून शहरातील रुग्णांच्या संख्येनुसार निधी न देता शहरानुसार निधी वितरीत करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई शहराच्या तुलनेत नागपूरात निधी वितरणामध्ये झालेला अन्याय दूर करण्याकरीता ठोस निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे काय,

(५) नसल्यास, न करण्याची कारणे काय ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

ग्रान्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई या महाविद्यालयास सन २०१३ ते २०१५ दरम्यान सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रमासाठी प्रत्येक वर्षी रु. ८.०० लक्ष अनुदान देण्यात आले आहे. विदर्भातील शा.वै.म.अकोला, श्री.व.ना.शा.वै.म., यवतमाळ, इं.गां.शा.वै.म., नागपूर या महाविद्यालयांस सन २०१३ ते २०१५ या कालावधीत प्रत्येकी प्रतिवर्ष रु.८.०० लक्ष असे एकूण ६४ लक्ष अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. सदर अनुदान उपचारासाठी देण्यात येत नसून तपासणी सुविधांसाठी देण्यात येते. यास्तव विदर्भात सिकलसेल ग्रस्त रुग्णांची संख्या मुंबईच्या तुलनेत जास्त असली तरी तपासणी सुविधांसाठी रुग्ण संख्येच्या आधारे अनुदान देणे अपेक्षित नसल्याने वरील रुग्णालयांना सम प्रमाणात अनुदान देण्यात आले आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

सन २०१३-१५ दरम्यान सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रमांतर्गत ग्रान्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांना प्रत्येकी रु. ८.०० लक्ष प्रतिवर्ष या प्रमाणे प्रत्येकी रु. १६.०० लक्ष अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे. सदर अनुदान तपासणी सुविधांसाठी असल्याने त्यावरील खर्च प्रतिरुग्ण काढणे अपेक्षित नाही. सदर अनुदान रुग्ण संख्येवर न देता दोन्ही रुग्णालयांना सम प्रमाणात देण्यात आले आहे.

(४) मुंबईच्या तुलनेत नागपूरला निधी वितरणामध्ये अन्याय झालेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रात व पुणे जिल्हयामध्ये सहा महिन्यांत क्षयरोगाचे पाच हजार रुग्ण आढळल्याबाबत

**(८३) * २८८६७ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रात व पुणे जिल्हयामध्ये क्षयरोगाचे सहा महिन्यांत पाच हजार रुग्ण आढळल्याचे माहे ऑगस्ट,२०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) पुणे येथील क्षयरोगांसाठी असलेल्या औंध उरो रुग्णालयातील रुग्णांना इतर आजारांवरील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयामध्ये प्रवेश नाकारण्यात येत असल्याचे माहे, ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यातील २२२ क्षयरुग्णांचा मृत्यू होऊन क्षयरोगाविषयी शासनाच्या अहवालानुसार पिंपरी-चिंचवडमध्ये क्षयरोगाच्या मृत्युमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अहवालानुसार साधारणपणे नवीन क्षयरुग्णांच्या संख्येत ५% रुग्णांचा मृत्यू होऊ शकतो, परंतु मध्यावर उपचार सोडून दिलेल्या रुग्णांमध्ये मृत्यूचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे,

पुणे म.न.पा. पिंपरी-चिंचवड म.न.पा. व पुणे जिल्हयामध्ये क्षयरोगाची माहे जानेवारी, २०१५ ते जुलै, २०१५ अखेर ५,९८१ क्षय रुग्ण आढळून आहे,

(२) पुणे येथील क्षय रोगासाठी असलेल्या औध उरो रुग्णालयातील रुग्णांना इतर आजरावरील उपचारासाठी प्रवेश नाकारण्यात येत नसून जानेवारी, २०१५ ते जुलै, २०१५ अखेर १४५ क्षयरुग्णांनासुध्दा औषधोपचार करण्यात आला आहे,

(३) पुणे म.न.पा. पिंपरी-चिंचवड म.न.पा. व पुणे जिल्हयामध्ये माहे जानेवारी, २०१५ ते जुलै, २०१५ अखेर २५९ क्षयरुग्णांचा मृत्यू झाला, हे खरे आहे,

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये जानेवारी, २०१४ ते जुलै, २०१४ या कालावधीत ७३ क्षयरुग्णांचा मृत्यू झाला असून चालू वर्षी याच कालावधीत ६६ क्षयरुग्ण मृत्यू झाले आहेत,

त्यानुसार क्षयरुग्णांच्या मृत्युंची संख्या मागील वर्षाच्या तुलनेत कमी झालेली आहे, हे खरे आहे,

(४) नवीन क्षयरुग्णांमध्ये मृत्यूदर ५% पर्यत असतो, हे खरे आहे, पंरतु राज्यात मध्यावर उपचार सोडून दिलेल्या रुग्णांमध्ये मृत्यूचे प्रमाण जानेवारी, २०१४ ते जुलै, २०१४ मध्ये ५.७% होते, हेच प्रमाण चालू वर्षी याच कालावधीत ५.८% आहे, हे खरे आहे,

(५) मध्यावर उपचार सोडून दिलेल्या क्षयरुग्णांमध्ये मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी या रुग्णांना प्रत्यक्ष देखरेखीखाली उपचार देण्याकरिता पुणे मनपा, पिंपरी चिंचवड मनपा व पुणे जिल्हयामध्ये १,२८५ डॉट प्रोव्हायडर्स उपलब्ध केले आहेत, तसेच मध्यावर उपचार सोडून दिलेल्या रुग्णांना पाठपुरावा पुणे मनपा, पिंपरी चिंचवड मनपा व व पुणे जिल्हयात १२८५ डॉट प्रोव्हायडर्स तसेच १७ एस.टी.एस. व ४० टीबी.एच.व्ही. यांचेमार्फत केला जातो व क्षयरुग्णांना पुन्हा उपचारासाठी प्रवृत्त करण्यात येते,

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### केळापूर (जि यवतमाळ) येथील पिपंळखुटी वन उपज नाक्यावरुन तेलंगणा प्रदेशात वाहतूक करणाऱ्या सागवान मालाचा ट्रक पकडल्याबाबत

**(८४) * ३५३३३ प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केळापूर (जि यवतमाळ) येथील पिंपळखुटी वन उपज नाक्यावरुन तेलंगणा प्रदेशात जात असलेला वाहतूक पास पाच घनमीटर असतांना १५ घनमीटर

सागवान मालाची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या एम.एच. २९ टी. १४०९ क्रमांकाचा ट्रक पकडला गेल्याचे दिनांक १७ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सागवान मालाची किमंत ५ लक्ष पर्यंत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास वाहतूक पास पाच घनमीटर असतांना पंधरा घनमीटर सागवान मालाची वाहतूक करण्यात आली या मागे संबंधित वन विभाग अधिकाऱ्याचा अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या अभय असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलबंनाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे आहे.

दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ रोजी पांढरकवडा ते आदिलाबाद रस्त्यावरील आदिलाबादकडे जाणारा ट्रक क्र.एमएच-२९ टी-१४०९ पकडला असून तपासणीअंती ५.००८ घ.मी. (साग नग ७२) मालाची वाहतुक करणेसाठी परवाना देण्यात आलेला असताना, १५.९९८ घ.मी. (साग नग २७२) सागाची अवैध वाहतूक करणारा ट्रक ताब्यात घेण्यात आलेला आहे.

(२) प्रचलित शासकीय दरानुसार जप्त केलेल्या सागवान मालाची किंमत ३,२९,३७८/- आहे

(३) हे खरे नाही.

(४) व (५) सदर प्रकरणात सखोल चौकशी करण्यात येत आहे.

----------------

## मराठवाड्यात दुष्काळाची परिस्थिती गंभीर असल्याबाबत

**(८५) * ३३३७७ श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.बसवराज पाटील (औसा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा सतत तीन वर्षे दुष्काळाचा सामना करीत आहे यावेळीही येथील परिस्थिती गंभीर आहे या विभागातील धरणामधील पाणीसाठा अवघा ५ ते ७ टक्के असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील गंभीर दुष्काळाचा सामना करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

मराठवाडा प्रदेशांतर्गत पाटबंधारे प्रकल्पांमध्ये दिनांक १४ ऑगस्ट, २०१५ रोजी प्रकल्पीय पाणीसाठ्याच्या ११.३८% इतका उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध होता.
(२) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार समन्यायी पध्दतीने पाणी वाटप करण्याचे धोरण राज्य शासनाने स्विकारलेले आहे. दरवर्षी पावसाळ्यामध्ये गोदावरी खोऱ्यात उपलब्ध होणाऱ्या पाण्याचे सिंचन व बिगर सिंचन प्रयोजनार्थ समन्यायी पध्दतीने वापर व्हावा याकरिता उर्ध्व भागातील धरणांमधून निम्न भागातील धरणांकरिता पाणी सोडण्याची कार्यवाही आवश्यकतेनुसार करण्यात येते. संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री हे जिल्हा पाणी आरक्षण समितीचे पदसिध्द अध्यक्ष असून सदर समितीमार्फत जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठयाचा आढावा घेऊन आवश्यकतेनुसार पिण्याकरिता पाणीसाठा आरक्षित करण्यात येतो. तसेच महसूल विभागामार्फत अन्य जलस्त्रोतातून पर्यायी व्यवस्थेद्वार विहिर अधिग्रहण, टॅकरद्वारे पाणीपुरवठा इ. आवश्यकतेनुसार पाणी पुरवण्याच्या उपाययोजना करण्यात येतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाच्या क्षेत्रीय कामांच्या त्रिसदस्यीय समितीच्या अहवालाबाबत

**(८६) * ३२४६६ श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळामार्फत दिनांक १ एप्रिल, २०१४ नंतर तसेच दिनांक १ एप्रिल, २०१४ पूर्वी (विदर्भ वगळून) प्रशासकीय मान्यता दिलेल्या परंतु प्रत्यक्षात क्षेत्रिय कामे सुरु झाली नाहीत अशा सर्व योजनांची (० ते २५० हेक्टर) तांत्रिक व्यवहार्यता तपासण्यासाठी मुख्य अभियंता लघुसिंचन (जलसंधारण) पुणे यांचेसह त्रिसदस्यीय समिती गठित करण्याबाबत शासनाने शासन निर्णय क्र. मजम-

२०१५/प्र.क्र.६६/जल-३, दिनांक ८ मे, २०१५ रोजी एक शासकीय निर्णय निर्गमित केला असून अभिप्राय व शिफारशीसह सदरहू समितीने आपला अहवाल महाराष्ट्र जलसंधारण मंडळास १५ दिवसात सादर करावे, असे आदेशित करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सदरहू समितीच्या अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) सदरहू समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशीनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(५) अद्यापी सदरहू समितीने आपला अहवाल शासनास सादर केला नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) समितीने अहवाल महाराष्ट्र जलसंधारण महामंडळास सादर केला आहे.

(३) जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निश्चित केलेले निकष, राज्यातील दुष्काळग्रस्त भाग, पाणी टंचाई, योजनांची त्या भागातील आवश्यकता, योजनेची सद्य:स्थिती इत्यादि बाबींचा सर्वकष विचार करुन योजनेची प्राथमिकता निश्चित करणे.

(४) समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशीनुषंगाने सदर अहवाल दिनांक २४/०९/२०१५ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या ४९ व्या बैठकीत निर्णयास्तव ठेवण्यात आलेला होता. महामंडळा स्तरावर पुढील उचित निर्णय घेण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय रूग्णालयांमधील डॉक्टरांची पदे भरण्याबाबत

**(८७) * २८८२६ अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.मोनिका राजळे (शेवगांव-पाथर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय, अनुदानित व खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस, एमडी, एमएस होणाऱ्या डॉक्टरांची संख्या दोन हजाराच्या आसपास असूनही शासकीय रुग्णांलयांमध्ये डॉक्टरांची कमतरता जाणवत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रापासून ते जिल्हा रुग्णालयापर्यंत डॉक्टरांची तसेच विशेष तज्ञ यांची कमतरता भासू लागल्याने राज्य शासनाने दिनांक ४ ऑगस्ट, २०१५ रोजी शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांचे निवृत्तीचे वय ५८ ते ६० वर्षे केले तरीही राज्यात सध्या विशेषत: वैद्यकीय अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, अशा अंदाजे ३००० जागा रिक्त असल्याने राज्याच्या आरोग्यसेवेवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रिक्त पदे त्वरीत भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

राज्यात सद्यस्थितीत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वरिष्ठ संवर्गाची एकूण १४८९ मंजूर असून त्यापैकी ६१८ पदे भरलेली आहेत. तर वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची एकूण ७२०० पदे मंजूर असून ५५७१ पदे भरलेली आहेत. त्याव्यतिरिक्त २९३ अस्थायी आणि ३५१ बंधपत्रित असे एकूण ६४४ वैद्यकीय अधिकारीही कार्यरत आहेत.

याशिवाय राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत ६८१ विशेषज्ञ करारपध्दतीने कार्यरत असून सदर विशेषज्ञांच्या सेवा रुग्णांना उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. त्यामुळे आरोग्य सेवेवर विपरीत परिणाम झाल्याचे दिसून आलेले नाही.

(३) महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा गट-अ (वरिष्ठ) संवर्गातील रिक्त पदांपैकी ३१३ पदे पदोन्नतीने आणि २६७ पदे नामनिर्देशनाने भरण्याची प्रक्रिया शासन स्तरावर सुरु आहे. ११ पदे भरण्याबाबत न्यायालयीन प्रकरण प्रलंबित आहे.

वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गातील विशेषज्ञांची २३६ पदे एमबीबीएस अर्हताधारकांची एकूण ४६६ रिक्त पदांवर माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये नियुक्तीचे आदेश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात विशेषत: मोखाडा (जि.ठाणे), किनवट (जि.नांदेड) इ. ठिकाणी कुपोषित व तीव्र कुपोषित बालकांचे प्रमाण वाढत असल्याबाबत**

**(८८) * २९६५६ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बसवराज पाटील (औसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.रणजित कांबळे (देवळी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.मनोहर भोईर (उरण), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मोखाडा (जि.ठाणे), किनवट (जि.नांदेड) इ. ठिकाणी कुपोषित व तीव्र कुपोषित बालकांचे प्रमाण वाढत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकात्मिक बालविकास सेवा योजनेचे उद्दीष्ट पूर्ण करण्यास अनेक अडचणी निर्माण होऊन अंगणवाडीतून ज्या सेवा मिळाल्या पाहिजेत त्या सेवा आजही पुरेशा प्रमाणात मिळत नसल्याने कुपोषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच दिवसेंदिवस वाढत असलेले बालकांचे कुपोषण रोखण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

माहे सप्टेंबर, २०१४ व माहे सप्टेंबर, २०१५ या मासिक प्रगती अहवालानुसार मोखाडा (जि.ठाणे) व किनवट (जि.नांदेड) या प्रकल्पातील कुपोषणाची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| प्रकल्प | कालावधी | एकूण वजन घेतलेल्या बालकांची संख्या | सर्वसाधारण बालके | मध्यम कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची बालके |
|---|---|---|---|---|---|
| मोखाडा | सप्टेंबर, २०१४ | १०६१० | ६०४२ | ३८०८ | ७६० (७%) |
| | सप्टेंबर, २०१५ | ९२५२ | ५४२८ | ३२८९ | ५३५ (६%) |
| किनवट | सप्टेंबर, २०१४ | २२०३५ | २०६२७ | १२५१ | २८७ (१.३०%) |
| | सप्टेंबर, २०१५ | २२६८३ | २११७५ | १२२८ | २८० (१.२३%) |

वरील तपशिलावरुन मध्यम कमी वजनाच्या व तीव्र कमी वजनाच्या बालकांच्या संख्येत घट झाल्याचे दिसून येते.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) कुपोषणाला आळा घालण्याकरिता राज्यात राजमाता जिजाऊ कुपोषण मिशनची स्थापना करण्यात आलेली असून याद्वारे कुपोषणाला आळा घालण्यासंबंधी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत नियमित आहाराव्यतिरिक्त अतिरिक्त पौष्टीक मुल्य असलेले खाद्य पदार्थ, अंडी/केळी तसेच विविध प्रकारची आरोग्यदायी औषधे इ. चा पुरवठा अंगणवाडीतील लाभार्थींना निधीच्या उपलब्धतेनुसार केला जातो. आदिवासी क्षेत्रातील नवसंजीवन क्षेत्रांतर्गत येणाऱ्या प्रकल्पातील लाभार्थ्यांना अतिरिक्त पोषणमुल्य असणारा आहार पुरविण्यात येतो. अंगणवाडीतील बालकांना आरोग्य सेवा पुरविण्याकरिता आरोग्य विभागाशी योग्य तो समन्वय साधण्यात येतो.

-----------------

**अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यातील एकरुख**
**उपसा सिंचन योजना प्रलंबित असल्याबाबत**

**(८९) * २८९५८ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यातील आठमाही पध्दतीने १७ हजार ३१० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणण्यासाठी १९९६ साली मंजूर झालेली एकरुख उपसा सिंचन योजना दोन दशकातही पूर्णत्वास गेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर योजना रखडल्यामुळे ८८ कोटींची योजना २८० कोटीपर्यंत गेली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकरुख उपसा सिंचन योजना पूर्णत्वास नेण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय,
(२) होय.एकरुख उपसा सिंचन योजनेची मूळ प्रमा किंमत रु.८७.४८ कोटी (दरसूची १९९५-९६) असून, प्रस्तावित प्रथम सुप्रमा किंमत रु.३५२.६४ कोटी (दरसूची २०१४-१५) आहे.
(३) या योजनेस सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात रू.११ कोटीची तरतूद आहे.निधीच्या उपलब्धतेनुसार कामांचे नियोजन करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद येथील जिल्हा परिषद विभागामार्फत कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या केलेल्या कामांच्या निविदा संचिका गहाळ झाल्याबाबत**

**(९०) * ३३५९१ श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथील जिल्हा परिषद सिंचन विभागामार्फत गेल्या दोन वर्षामध्ये झालेल्या कोल्हापूरी बंधारे, लघुपाटबंधाऱ्यांच्या कामांमध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच माहे सप्टेबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषदेने केलेल्या तपासणीत सन २०१३-१४ मध्ये कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या ७७ कामांपैकी ३९ निविदांच्या नस्ती तर सन २०१४-१५ मध्ये ९५ पैकी ४१ कामांच्या नस्ती तसेच लघुपाटबंधाऱ्यांच्या २०१३-१४ मधील ११७ पैकी ३४, तर २०१४-१५ मध्ये २५ पैकी ९ संचिका गायब झाल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सिंचन विभागाने वित्त विभागाची सहमती न घेता ७३ लाख २५ हजार रुपयांची ५ कामे परस्पर केली आहेत तर उपकरामधून सन २०१३-१४ या वर्षात १ कोटी ५० लाख ५६ हजारांच्या ३३ कामांमध्ये कार्यारंभ आदेश वित्त विभागाची मंजूरी न घेता देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) तदनुसार सदर गैरव्यवहारातील दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेने दिलेल्या निर्देशानुसार जिल्हा परिषदेच्या चौकशी समितीने केलेल्या तपासणी दरम्यान, प्रश्नात नमूद असलेल्या एकूण १२३ कामांच्या निविदा संचिका उपलब्ध झाल्या नाहीत असे चौकशी अहवालात नमूद केले आहे. परंतु १२३ कामांपैकी २९ कामांची निविदाप्रक्रिया झाली नाही. त्यामुळे संचिका निर्माण झाल्या नाहीत. उर्वरित ९४ कामापैकी ५४ कामांच्या निविदा संचिका जिल्हा परिषदेकडे उपलब्ध आहेत. तर ४० कामांच्या निविदा संचिकांचा शोध घेण्यात येत असल्याचे जिल्हा परिषदेने कळविले आहे.

(३) हे खरे नाही. सदरहू ५ कामांना वित्त विभागाची सहमती घेतल्याचे जिल्हा परिषदेने कळविले आहे.

(४) याबाबत जिल्हा परिषदेने सर्वसाधारण सभेतील निर्णयानुसार चौकशी समिती गठीत करुन चौकशी केली आहे. त्यामध्ये उपलब्ध तरतूदीपेक्षा जास्तीचे दायीत्व निर्माण झाल्याचे दिसून आले असले तरी उपलब्ध निधीपेक्षा जास्त खर्च झाला आढळला नाही अथवा गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले नाही.

(५) व (६) आर्थिक गैरव्यवहार झालेला नाही. तथापि, चौकशी अहवालानुसार तत्कालीन संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना जिल्हा परिषदेने नोटीस देऊन खुलासे मागीतलेले आहेत. खुलासे प्राप्त होताच जिल्हा परिषदेद्वारा पुढील कार्यवाही करण्यात येत असल्याचे जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी कळविले आहे.

-----------------

### मौजे सावरगाव काळेवाडी (ता.पारनेर, जि.अहमदनगर) डोंगरावर २०० एकर जमिनीवरील मिनी लवासाप्रकरणी उद्योजकावर गुन्हा दाखल केल्याबाबत

**(९१) * २९७६४ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सावरगाव काळेवाडी (ता.पारनेर, जि.अहमदनगर) येथील डोंगरावर २०० एकर जमिनीवर मिनी लवासाप्रकरणी वन विभागाने उद्योजकांवर गुन्हा दाखल केल्याचे दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू उद्योजकांने डोंगरावरील मुरुम व मातीचे उत्खन्न केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) मौजे सावरगाव काळेवाडी येथे उद्योजकाने खाजगी मालकीच्या जमिनीत जाण्यासाठी वन विभागाच्या हददीमध्ये ०.०९ हे.आर क्षेत्रात जुन्या वहिवाटीच्या रस्त्याची विनापरवाना दुरुस्ती केल्याने वन विभागाने सदर उद्योजकार भारतीय अधिनियम, १९२७ चे कलम २६ (१) (ड) व (ह) अन्वये दिनांक ३०.७.२०१५ रोजी गुन्हा दाखल केला आहे.
(२), (३) व (४) महाराष्ट्र गौणखनिज उत्खनन (नियम व विनियमन) (सुधारणा) नियमम, २०१५ मधील अधिसूचना मधील अ.न. ३ मुख्य नियमांच्या नियम ४६ मधील ३ (क) अनुसार ज्यावेळी जमिनीच्या एखादया भूखंडाचा विकास करतांना मातीचे उत्खनन करुन ती माती त्याच भूखंडाचा सपाटीकरणाकरिता वापरली जाईल, त्यावेळी अशा मातीवर स्वामित्वधन भरले जाणार नसल्याचे नमूद असल्याने संबंधिताविरुध्द कारवाई करण्यात आलेली नाही.

-----------------

**इंडियन कॅन्सर रजिस्ट्रीने नुकत्याच जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार पुण्यासारख्या शहरांमध्ये रक्ताच्या कर्करोगाचे प्रमाण वाढत असल्याबाबत**

**(९२) * ३१०६३ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इंडियन कॅन्सर रजिस्ट्रीने नुकत्याच जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार वेगाने विकसित होणा-या पुण्यासारख्या शहरांमध्ये रक्ताच्या कर्करोगाचे प्रमाण वाढण्याचा वेग जास्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विकसित शहरांमध्ये कर्करोगाचे प्रमाण वाढत असून आवश्यक प्रमाणात कर्करोगाची रुग्णालये नाहीत तसेच या रोगासंबंधी जनमानसात जनजागृती करणेही आवश्यक आहे हे लक्षात घेता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, या मागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही, इंडियन कॅन्सर रजिस्ट्रीने ऑक्टोबर, २०१५ मध्ये रक्ताच्या कर्करोगासंबंधी माहिती जाहीर / प्रकाशित केलेली नाही.

(२) २० जिल्हा रुग्णालयामध्ये टाटा कॅन्सर रुग्णालय येथील प्रशिक्षित तज्ञांमार्फत महिन्यापासून अथवा १५ दिवसांतून एकादा कर्करोगासाठी बाह्यरुग्ण विभाग स्थापन करण्यात आला आहे.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत राज्यामध्ये कर्करोगावर उपचारासाठी शासकीय ७२, खाजगी ३११ रुग्णालये संलग्नीत करण्यात आली आहेत. या योजनेंतर्गत आतापर्यंत २२७७ रक्ताचे कर्करोग रुग्णांवर औषधोपचार / शस्त्रक्रियेद्वारे उपचार करण्यात आले आहेत.

त्याचप्रमाणे वैद्यकीय महाविद्यालये येथे सुध्दा कर्कराग निदान व उपचार करण्यात येतात. वैद्यकीय अधिक्षक, समुपदेशक महिला आरोग्य सेविका यांचे मदतीने कर्करोगाची प्राथमिक लक्षणे आणि उपचारासाठी माहिती देऊन, विशेष आरोग्य शिबिरे आयोजित करुन जनजागृती करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर विक्रीकर विभागातील विक्रीकरातील अनियमिततेबाबत**

**(९३) * २८४३४ श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००९ मध्ये विक्रीकर उपायुक्त,कोल्हापूर यांनी विक्रीकरात अनियमितता करून काही बडया कंपन्यांना सुमारे २०० कोटी रुपयांचे बनावट परतावे दिल्याप्रकरणाचा मुंबईच्या विशेष विक्रीकर आयुक्तांनी दिनांक १९ मे २०१४ रोजी दिलेला चौकशी अहवाल शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदरच्या चौकशी अहवालात कोणकोणत्या शिफारशी केल्या आहेत व त्याचे स्वरुप काय आहे,

(३) तसेच राज्याच्या नागपूर, औरंगाबाद व नाशिक विभागामध्ये बनावट कंपन्या स्थापन करून त्यांच्या माध्यमातून सुमारे रुपये ४०० कोटींची कर चोरी केल्याचे माहे ऑगस्ट २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणांची चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई करुन, बेकायदेशीर विक्रीकर परतावा व कर चोरी वसुलीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) कोल्हापूर विक्रीकर विभागामध्ये बोगस परतावा देऊन २५० कोटीच्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी होणेबाबत श्री.अ.र.शेख उर्फ बाबा शेख, मानव अधिकारी संघटना यांनी दि.२६.१२.२०१३ च्या पत्रान्वये तक्रार केली होती. तथापि, या प्रकरणी पारीत केलेल्या परतावा प्रकरणांमध्ये कोणतीही महसूल हानी झालेली नाही. तसेच, या प्रकरणी प्रशासकीय कार्यपद्धतीतील त्रुटी संबंधित अधिकारी सेवानिवृत्त झाल्यानंतर आणि घटनेस ४ वर्षे उलटून गेल्यावर निदर्शनास आल्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम २७(२)(ब)(दोन) नुसार या प्रकरणी आता विभागीय चौकशीची कार्यवाही करता येणार नाही.तथापि,कोणती कार्यवाही करणे शक्य आहे याबाबत विधी व न्याय विभागाचा सल्ला घेण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**राज्यातील शासकीय व निमशासकीय रुग्णालयातील डॉक्टर व अन्य कर्मचाऱ्यांना स्वाईन फ्ल्यूची लागण होऊ नये याकरिता मास्कचा पुरवठा करण्याबाबत**

**(९४) * २८६११ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध शासकीय व निमशासकीय रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका व अन्य कर्मचारांना स्वाईन फ्ल्यूची लागण होऊ नये याकरिता एन-९५ मास्कचा पुरवठा सर्व रुग्णालयात करण्यात आला आहे तरीही रुग्णांच्या संपर्कात राहणाऱ्या डॉक्टराना स्वाईन फ्लुची लागण होत असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, २४ तास स्वाईन फ्लुच्या रुग्णांसोबत राहणाऱ्या डॉक्टरांना या रोगाची लागण होऊ नये यासाठी शासनाने विशेष खबरदारी घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) असल्यास, कार्यवाहीचे स्वरूप काय आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

राज्यात काही डॉक्टर तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांना स्वाईन फ्ल्यूची लागण झाली, हे खरे आहे.

(२) व (३) स्वाईन फ्ल्यू रुग्णांवर उपचार करणाऱ्या डॉक्टर आणि इतर आरोग्य कर्मचाऱ्यांना स्वाईन फ्ल्यूची लागण होऊ नये, याकरिता खालील उपाययोजना करण्यात येत आहेत.

- दरवर्षी डॉक्टर व इतर आरोग्य कर्मचाऱ्यांकरीता ऐच्छिक इन्पल्युएझा लसीकरण मोफत पुरविले जाते.
- २०१५ मध्ये डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना फ्ल्यू विरोधी लसीकरण करण्यात आले आहे.
- रुग्णालये तसेच प्रयोगशाळांमध्ये काम करणाऱ्या डॉक्टर व इतर आरोग्य कर्मचाऱ्यांना वैद्यकीय संरक्षण कीट (पी.पी.ई) व सर्जिकल मास्क, एन ९५ मास्क या पुरेसा पुरवठा.
- रुग्णालयातील जैव वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट मार्गदर्शक सूचनांनूसार करण्यात येते.
- संसर्ग प्रतिबंध व नियंत्रणासाठी मार्गदर्शक सूचना तसेच प्रशिक्षण कार्यशाळचे आयोजन.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हयातील पेंच प्रकल्प आणि निम्न वेणा प्रकल्पावरील परिक्षण व दुरुस्तीसाठी निधी मिळण्याबाबत

**(९५) * ३४५४७ श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील पेंच प्रकल्प आणि निम्न वेणा प्रकल्पाची परिक्षण व दुरुस्ती अंतर्गत निधी मिळण्याचा प्रस्ताव जलसंपदा विभागाकडे प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पेंच प्रकल्पाचे सन १९७६ साली बांधकाम पूर्ण झाले व निम्न वेणा प्रकल्पाचे सन १९९० साली बांधकाम पूर्ण झाले, सदर दोन्ही प्रकल्प फार जुने असल्यामुळे प्रकल्पाचे लाभक्षेत्रातील कालवे वितरण प्रणाली विस्कळीत झाल्यामुळे दरवर्षी सिंचना करिता या कालव्यातून पाणी सोडण्याआधी मोठया प्रमाणात कालवा दुरुस्तीची कामे घ्यावी लागतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पेंच प्रकल्पाला रुपये ९०४.०० लक्ष व निम्न वेणा प्रकल्पास रुपये ५९६.९० लक्ष पुरक अनुदान लेखाशिर्ष २७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे परिक्षण व दुरुस्ती अंतर्गत निधी मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, निधी मिळणेबाबतचा प्रस्ताव प्रलंबित ठेवण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

नागपूर जिल्हयातील पेंच प्रकल्प आणि निम्न वेणाप्रकल्पावरील परिक्षण व दुरूस्तीसाठी निधी मागणीचा प्रस्ताव क्षेत्रिय कार्यालयाकडून शासनास ऑक्टोबर २०१५ मध्ये प्राप्त झाला आहे.

(२) होय.

(३) व (४) होय.

प्रतिवर्षी सिंचन प्रकल्पाच्या देखभाल दुरूस्तीसाठी निश्चित केलेल्या मापदंडानुसार प्रत्येक प्रकल्पास निधी उपलब्ध करून दिला जातो. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) टेंबरे ग्रामपंचायतीमधील जामरुंग गावामध्ये जलयुक्त शिवार अंतर्गत करण्यात आलेली कामे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत**

**(९६) * ३०६११ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) टेंबरे ग्रामपंचायतीमधील जामरुंग गावामध्ये जलयुक्त शिवार अंतर्गत करण्यात आलेली कामे निकृष्ट दर्जाची झाल्याने मातीच्या बंधाऱ्यांत पावसाळ्यात पाणी साठत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तेथील जामरुंग ग्रामपंचायतीने जिल्हाधिकारी रायगड तसेच कृषी विभाग कर्जत यांच्याकडे दिनांक १० ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यासुमारास लेखी तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशी अंती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
तथापि, यासंदर्भात स्थानिक वर्तमान पत्रामध्ये बातमी प्रसिध्द झाली होती.
(२) व (३) वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने उपविभागीय कृषि अधिकारी खोपोली यांनी पहाणी केली असून कामे सुस्थितीत असल्याचे नमूद केलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### गडहिंग्लज, आजरा व चंदगड (जि.कोल्हापूर) येथील जनतेला शेतीसाठी पाच टीएमसी पाणी मिळण्याबाबत

**(९७) * ३२५४६ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडहिंग्लज, आजरा व चंदगड तालुक्यातील (जि.कोल्हापूर) जनतेला पिण्यासाठी तसेच शेतीसाठी कृष्णा पाणी वाटप लवादातील सुधारित पाणी वाटपातील कोट्यातून घटप्रभा खोऱ्याला आणखी पाच टीएमसी पाणी मिळावे अशी मागणी मा.मुख्यमंत्री, जलसंपदा मंत्री आदिकडे चंदगड येथील लोकप्रतिनिधींनी माहे जुलै, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात केली, आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.
(२) पहिल्या कृष्णा पाणी तंटा लवादाने (१९७६) दिलेल्या निर्णयामध्ये घटप्रभा खोऱ्यातील महत्तम पाणी वापरावर बंधन घातले असून तो ७ अघफूला सिमित केलेला आहे.

दुसऱ्या कृष्णा पाणी तंटा लवादानेही (२०१० व २०१३) घटप्रभा खोऱ्यातील पाणी वापरामध्ये काहीही बदल केलेला नाही. घटप्रभा खोऱ्यातील पाणी वापर ७ अघफू पेक्षा अधिक नसावा असे नमूद केलेले आहे. दुसऱ्या कृष्णा पाणी तंटा लवादाचा निर्णय, अद्याप अधिसूचित व्हायचा आहे. परंतु या लवादाच्या निर्णयानुसार एका उपखोऱ्यात पाणी वळविण्यास मनाई करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कुडाळ (जि.सिंधुदूर्ग) येथील पावशी धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्यांना ठिकठिकाणी मोठया प्रमाणात गळती होत असल्याबाबत**

**(९८) * २९९२२ श्री.अजित पवार (बारामती), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ (जि.सिंधुदूर्ग) येथील पावशी धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्यांना ठिकठिकाणी मोठया प्रमाणात गळती लागल्याची बाब माहे ऑक्टोबर,२०१५ मध्ये शासनाच्या निदर्शनास आली आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास,धरणाच्या बंधा-याला मोठी गळती सुरू असल्याने अनेक ठिकाणी जमीन दलदलीची व नापीक झाली आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत धरणाच्या पाणी साठयावर परिणाम होणार असून आगामी काळात रब्बी व उन्हाळी शेतीसाठी शेतक-यांना पाण्याचा तुटवडा भासणार आहे,हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास,याबाबत शासनाने कोणती तातडीची उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

या योजनेचा कालवा हा बंद पाईपलाईन पध्दतीचा असून सुस्थितीत आहे.

(२) हे खरे नाही.

धरण सुस्थितीत आहे. दलदल व नापीकी आढळलेली नाही.

(३) हे खरे नाही.

धरणाची एकूण पाणी साठवण क्षमता ३.२५६ द.ल.घ.मी. असून दिनांक २४.११.२०१५ रोजी धरणात २.९९६ द.ल.घ.मी. (९२.००%) इतका पाणीसाठा उपलब्ध आहे. सन २०१५-१६ च्या कोकण हंगामात शेतीसाठी शेतकऱ्यांना पाण्याचा तुटवडा भासणार नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चौदाव्या केंद्रीय वित्त आयोगाच्या प्राप्त झालेल्या निधीबाबत**

**(९९) * २९५२२ श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चौदाव्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील ग्रामीण स्थानिक संस्थांना सन २०१५-१६ च्या जनरल बेसिक ग्रँटच्या पहिल्या हप्त्यापोटी ८११ कोटी ६६ लाख इतका राज्याला मिळालेला निधी राज्य शासनाने जिल्हा परिषदांना वितरीत केला आहे, तथापि मार्गदर्शक तत्वांअभावी सदर निधी ग्रामपंचायतीपर्यंत पोहचू शकलेला नसल्याची बाब दिनांक २६ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच नागपूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतीसाठी राज्यशासनाने चौदाव्या वित्त आयोगातून २० कोटीचा निधी पाठविली आहे परंतू शासनाकडून मार्गदर्शक सूचना मिळाल्याशिवाय हा निधी खर्च करु नये अशा स्वरुपाचे ग्रामविकास विभागाचे निर्देश असल्याने दिनांक १६ जुलै, २०१५ पासून जिल्हा परिषदेकडे हा निधी पडून असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, निधीची रक्कम खर्च करण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे याबाबतच्या सविस्तर मार्गदर्शन सूचनाबाबतचा शासन निर्णय दिनांक १५ जुलै, २०१५ अखेरपर्यंत न काढल्यामुळे निधीचा वितरण व विनियोग होवू शकला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अखर्चित निधी वापरासाठी शासनाने मार्गदर्शक सूचना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) चौदाव्या कैंद्रिय वित्त आयोगांतर्गत ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता जनरल बेसिक ग्रँटचा सन २०१५-२०१६ चा पहिला हप्ता रु.८११.६६ कोटी राज्यास जुलै, २०१५ मध्ये प्राप्त झाला आहे. प्रस्तुत निधी शासन निर्णय क्र. चौविआ- २०१५/ प्र.क्र.६५/ वित्त-४, दि.१६/७/२०१५ अन्वये सर्व जिल्हा परिषदांकडे (ग्रामपंचायत स्तरासाठी) वितरीत करण्यात आला आहे.
(२) (३), (४) व (५) चौदाव्या कैंद्रिय वित्त आयोगांतर्गत कैंद्रिय वित्त मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचना दि.८/१०/२०१५ च्या पत्रान्वये प्राप्त झाल्या आहेत.

चौदाव्या कैंद्रिय वित्त आयोगाचे हे पहिलेच वर्ष असून चौदाव्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त झालेला निधी ग्रामपंचायत स्तरावर खर्च करताना त्याचा विनियोग व नियंत्रण अधिक प्रभावी व परिणामकारकरित्या होणे गरजेचे आहे. त्याकरिता केंद्र शासनाच्या दि.८/१०/२०१५ च्या पत्रान्वये प्राप्त झालेल्या सविस्तर मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन निधीच्या विनियोगासंबंधी एकरूपता रहावी म्हणून धोरणात्मक निर्णय घेऊन सविस्तर सूचना देणे आवश्यक आहे. याअनुषंगाने शासनाकडून याबद्दल स्वतंत्रपणे निर्णय लवकरच घेण्यात येत आहे.

-----------------

**नातूवाडी (ता.खेड, जि.रत्नागिरी) मध्यम पाटबंधारे प्रकल्पाच्या धरणामध्ये कमी पावसामुळे पाणीसाठा न झाल्याने पर्यायी व्यवस्था करण्याबाबत**

**(१००) * ३४७८९ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नातूवाडी (ता.खेड, जि.रत्नागिरी) मध्यम पाटबंधारे प्रकल्पाच्या नातूनगर येथील धरणामध्ये यावर्षी कमी प्रमाणात पाऊस पडल्याने पाणीसाठा अत्यंत कमी म्हणजे १८.४८७ द.ल.घ.मी. इतकाच पाणीसाठा आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास उक्त धरणामध्ये पाणीसाठा कमी असल्याने शेतकरी, मजूर, ग्रामस्थ, गुरे व वन्यप्राणी इ. साठी पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास सदरहू धरणातील अल्प पाणीसाठा विचारात घेता सदर धरणांवर अवलंबून असणाऱ्या शेतकरी, ग्रामस्थ, वन्यप्राणी यांना पाण्याचा पुरवठा करण्याबाबत शासन स्तरावर कार्य पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही,

दि. २३ नोव्हेंबर, २०१५ रोजी धरणामध्ये २६,१२६ द.ल.घ.मी (९६%) इतका उपयुक्त पाणीसाठा आहे,

(२) नाही, धरणामध्ये पाणीसाठा पुरेसा आहे,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नांदेड येथील बाभळी बंधाऱ्यामुळे निर्माण झालेल्या जलसाठ्याचे नियोजन करण्याबाबत**

**(१०१) * ३३९८८ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथील बाभळी बंधाऱ्यामुळे जलसाठा निर्माण झाला परंतु त्याचा वापर करण्यासाठी शासनाने कोणतेही नियोजन केले नाही, त्यामुळे दरवर्षी तेलंगणामध्ये पाणी सोडून द्यावे लागत आहे असे माहे जुलै, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाभळी बंधाऱ्याच्या लाभक्षेत्रात गोदावरीच्या दोन्ही बाजूंवर उपसा सिंचन योजना कार्यिन्वित करावी अशी मागणी येथील सर्वपक्षीय कृती समितीने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

तथापि, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार १ जुलै ते २८ ऑक्टोबर या कालावधीत बंधाऱ्याचे दरवाजे उघडे ठेवणे बंधनकारक आहे.

तसेच बंधाऱ्याच्या बाधीत क्षेत्रातील रस्त्यावरील पुलाचे व बाधीत क्षेत्रातील जमिनीचे भूसंपादन करुन प्रकल्प जून, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(२) हे खरे आहे.

(३) बाभळी बंधाऱ्याच्या मूळ व्याप्तीनुसार लाभार्थींनी स्वखर्चाने पाणी उपसा करणे प्रस्तावित आहे. शासकीय खर्चाने उपसा सिंचन योजना घेणे अंतर्भूत नाही. त्यामुळे निवेदनात नमूद उपसा सिंचन योजना शासकीय खर्चाने कार्यान्वित करता येणार नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भंडारा जिल्ह्यात "जलयुक्त शिवार अभियान" योजनेतील कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(१०२) * ३६१०० श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) "जलयुक्त शिवार अभियान" योजनेत भंडारा जिल्ह्यातील टंचाईग्रस्त ८६ गावांची निवड करण्यात आली असून जिल्हा परिषदेच्या लघु पाटबंधारे विभागाअंतर्गत असलेल्या ११५४ मामा तलावापैकी १२ तलावांची दुरुस्ती व गाळ काढण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून त्या अनुषंगाने लघु पाटबंधारे विभागाला जलयुक्त शिवार योजनेतून ७.३४ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलावांच्या पुनरुज्जीवनासाठी शासनाकडून निधी प्राप्त होऊनही जिल्ह्यातील फक्त सिर्सी, करडी व साकोली या तीन तलावांचेच पुनरुज्जीवन करण्यात आले असल्याचे माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासन चौकशी करुन कायदेशीर कार्यवाही करणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

तथापि, जलयुक्त शिवार अभियानामध्ये भंडारा जिल्ह्यातील ८६ गावांची निवड करण्यात आलेली असून जलयुक्त शिवार अभियानाच्या विशेष निधीमधून सिमेंट नाला बांध करिता रु. ७.३४ कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच जिल्हा निधीमधून सन २०१५-१६ मध्ये १० मा.मा. तलावाचे खोलीकरणासाठी रु.६५.०० लक्ष ची प्रायोगिक तत्वावर तरतूद करण्यात आली होती.

(२) जिल्हा निधी मधून निधी उपलब्ध झाल्यानुसार व जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेने सुचविल्यानुसार मा.मा.तलाव सिर्सी, करडी व साकोली तलावाच्या खोलीकरणाची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील सर्व महापालिका क्षेत्रातील एलबीटी रद्द केल्याबाबत**

**(१०३) * ३३२३४ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व महापालिका क्षेत्रातील एलबीटी रद्द केल्यामुळे तसेच गारपीठ, दुष्काळ आदि नैसर्गिक आपत्ती निवारण्यासाठी झालेला खर्च डिझेल-पेट्रोलच्या कमी झालेल्या किंमतीमुळे राज्य शासनाच्या तिजोरीत महसूलातील झालेली घट भरुन काढण्यासाठी पेट्रोल आणि डिझेलवर प्रतिलिटर दोन रुपये तसेच विदेशी दारु, सिगारेट आणि शीतपेयांवरील विक्रीकरात पाच टक्के वाढ करण्याचा निर्णय दिनांक १ ऑक्टोबर, २०१५ रोजी मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या दरवाढ आणि करवाढीच्या निषेधार्थ मुंबईतील आझाद मैदानात भव्य मोर्चा काढण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाच्या घेतलेल्या निर्णयामुळे सर्वसामान्य नागरीकांच्या जीवनावश्यक वस्तूची भाववाढ होत असल्याने आर्थिक परिस्थिती अधिक अडचणीत येणार असल्याने राज्य शासनाने इंधन दरवाढ मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक ३०.०९.२०१५ रोजी मंत्रीमंडळाच्या बैठकीत, प्रश्नात दर्शविलेल्या वस्तूवर कराच्या दरामध्ये वाढ करण्याचा निणर्य घेण्यात आला. मात्र सिगारेटवरील कराच्या दरामध्ये दहा टक्के करवाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच सोने, हिरे व त्यापासूनचे दागिने यावर ०.२% कराचा दर वाढविण्यात आला.

(२) होय.

(३) सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनावश्यक वस्तूंना करमाफी आहे. तसेच मागील वर्षाच्या तुलनेत इंधनाचे दर कमी झाले आहेत.

(४) लागू नाही.

-----------------

**झरी जामणी तालुक्यातील (जि.यवतमाळ) उप वनसंरक्षक कार्यालय पांढरकवडा अंतर्गत कामात वन अधिकाऱ्यांनी केलेला गैरप्रकार**

**(१०४) * ३६७५४ श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झरी जामणी तालुक्यातील (जि. यवतमाळ) उप वनसंरक्षक कार्यालय पांढरकवडा अंतर्गत पाटणबोरी वन परिक्षेत्राला वृक्ष लागवडीसाठी यावर्षी लाखोचा निधी उपलब्ध झाला असून ही कामे करताना शासनाच्या नियमांना बाजूला सारुन लाखो रुपयाचा गैरप्रकार वन अधिकाऱ्यांनी केल्याची बाब माहे ऑक्टोंबर, २०१५ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार शासनाच्या निधीचा अपहार करणाऱ्या वन अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातून क्षयरोगाचे निर्मूलन करण्यासाठी गडचिरोली, चंद्रपूर व भंडारा या जिल्ह्यामधील जिल्हा रुग्णालयांसाठी मंजूर झालेली अत्याधुनिक यंत्रे अद्यापही प्राप्त झाली नसल्याबाबत**

**(१०५) * ३२४७७ श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातून क्षयरोगाचे निर्मूलन करण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने गडचिरोली, चंद्रपूर व भंडारा या आदिवासीबहुल जिल्ह्यामधील जिल्हा रुग्णालयांसाठी

क्षयरोगाची चाचणी करणारे अत्याधुनिक यंत्रे मंजूर केले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गडचिरोली, चंद्रपूर व भंडारा या जिल्हयांमधील जिल्हा रुग्णालयांत चाचणी करणारे अत्याधुनिक यंत्रे अद्यापही प्राप्त झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, क्षयरोग निर्मूलनासाठी अत्यंत उपयुक्त असलेले यंत्र आदिवासी बहुल जिल्हयांमधील जिल्हा रुग्णालयांना प्राप्त होण्यास साधारणत: किती कालावधी लागणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय,

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने गडचिरोली, चंद्रपूर व गोंदिया या आदिवासीबहुल जिल्हयातील जिल्हा रुग्णालयांसाठी क्षयरोगाची चाचणी करणारे CBNAAT हे अत्याधुनिक यंत्र दि. ८ जुलै, २०१५ च्या पत्रान्वये मंजूर केले आहे,
(२) व (३) गडचिरोली, चंद्रपूर व गोंदिया या जिल्हयांमधील जिल्हा रुग्णालयासाठी सदरचे यंत्र केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडून माहे डिसेंबर, २०१५ अखरेपर्यत प्राप्त होणार आहे.

-----------------

**चंद्रपुर व गडचिरोली जिल्हयातील शेती सिंचनाचे पाणी प्रस्तावीत प्रकल्पासाठी वळविल्याबाबत**

**(१०६) * ३६६६३ ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपुर जिल्हयातील गोंडपिपरी व गडचिरोली जिल्हयातील सिरोंचा तालुक्यालगत प्राणहिता व गोदावरी नदीच्या तिरावर तेलंगणा राज्याकडून नवा सिंचन प्रकल्प सुरु करण्याच्या हालचाली वेगाने सुरु झाल्या आहेत यासाठी तेलंगणा राज्याकडून महाराष्ट्रातील बाधीत गावांची हवाई पाहणी संबंधीत विभागाकडून करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चंद्रपुर व गडचिरोली जिल्हयातील ०६ ते ०७ तालुक्यांचे शेती सिंचनाचे पाणी या प्रस्तावीत प्रकल्पासाठी वळविले जाणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पामुळे चंद्रपुर जिल्हयातील गोंडपिपरी तालुक्यामधील जवळपास २५ गावे पाण्याखाली येणार असून त्यांचे पुनर्वसन करावे लागणार असल्याने सदर प्रकल्प महाराष्ट्रातील गावांसाठी अन्यायकारक ठरणार आहे , हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यावर शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येते आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अधिकृतरित्या शासनास अवघत नाही. तथापि लोकमत वृत्तपत्रातील दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ मधील बातमी मध्ये तेलंगणा राज्यातील कालेश्वर भागातील गोदावरी तिरावर कोटापल्ली महादेवपूर, कालेश्वर या भागात हवाई सर्वेक्षण तेलंगणा सरकारकडून करण्यात आल्याचे नमूद आहे. यात महाराष्ट्रातील भागात हवाई सर्वेक्षण झाल्याचे नमूद नाही.

(२) नाही,

गोदावरी पाणी तंटा लवादाच्या अंतीम निर्णयाप्रमाणे प्राणहिता चेवेल्ला या प्रकल्पासाठी १६० अ.घ.फू. पाणी हे तेलंगणा (आंध्र) च्या वाटयाचे आहे. ते कळविलं जाणार आहे.

(३) नाही.

प्राणहिता - चेवेल्ला प्रकलप अहवालाप्रमाणे चंद्रपूर जिलह्यातील गोंडपिंपरी तालुक्यातील २२ व गडचिरोली जिल्ह्यातील चार्मोशी तालुक्यातील ८ गावांमधील नदी काठची जमीन बाधीत होणार आहे. मात्र एकही गावठाण बाधीत होणार नाही. मात्र एकही गांवठाण बाधीत होणार नाही. मात्र या प्रकल्प अहवालास महाराष्ट्राने अद्यापि सहमती दिलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे व पालघर जिल्ह्यात २७ हजार एचआयव्ही बाधीत रुग्ण आढळून आल्याबाबत**

**(१०७) * ३०३५७ ॲड.के. पाडवी (अक्कलकुवा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व पालघर जिल्ह्यात २७ हजार एचआयव्ही बाधीत रुग्ण आढळून आल्याचे आयईसीचे सहसंचालकांनी दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ रोजी एड्स नियंत्रण सोसायटीच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यशाळेचे उद्घाटन प्रसंगी माहिती दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबतची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, एड्स नियंत्रणासाठी शासनाने कोणकोणती उपाययोजना केली आहे व त्याची फलनिष्पती काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय,

परंतू सदर आकडेवारी ही एका वर्षातील एचआयव्ही बाधीत रुग्णाची नसून, ठाणे जिल्ह्यात (सध्याचा ठाणे व पालघर जिल्हा) एचआयव्ही/एड्स कार्यक्रम राबविणे सुरु झाल्यापासून म्हणजेच सन २००७ ते ऑगस्ट, २०१५ या कालावधीतील आढळून आलेल्या एचआयव्ही बाधीत रुग्णांची एकत्रित सर्वसाधारण संख्या आहे,

(२) एचआयव्ही संसर्ग होण्याचे प्रमुख ४ कारणे असून असुरक्षित लैगिक संबंध हे प्रमुख कारण आहे, तसेच, नवजात बालकास मातेकडून, रक्त संक्रमण व शिरेवाटे नशा करणे यामुळेही एचआयव्ही संसर्ग होण्याची शक्यता असते,

या व्यतिरिक्त ठाणे जिल्हा हा लोकसंख्येच्या दृष्टीने महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा असून या जिल्ह्यातील औद्योगिकरणामुळे जिल्ह्यात स्थलांतरीत कामगारांची संख्या देखील फार मोठी आहे, त्याचबरोबर देह विक्री करणाऱ्या स्त्रिया, शिरेवाटे नशा करणारे युवक, तृतीयपंथी व ट्रकर्स इत्यादी अतिजोखीम गटातील व्यक्तीची संख्या देखील जास्त आहे, त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील एकुण एचआयव्ही संसर्ग झालेल्या व्यक्तिंची संख्या जास्त दिसून येते,

(३) शासन स्तरावर एचआयव्ही/एड्स कार्यक्रमांतर्गत एचआयव्ही/एड्सवर नियंत्रण आणण्यासाठी नॅकोच्या मार्गदर्शक सुचनांनुसार मराएनिसंद्वारे प्रत्येक जिल्हा पातळीवर जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक यांच्याअंतर्गत आयसीटीसी, एआरटी,एसटीआय केंद्रे व रक्तपेढया तसेच अशासकीय संस्था यांच्यामार्फत सर्वसामान्य जनता, गर्भवती महिला व पौगंडावस्था असलेल्या तरुणांना एचआयव्ही रक्तचाचणी, एआरटी उपचार व निरोध पुरवठा, इ. सुविधा मोफत पुरविण्यात येतात,

उक्त उपाययोजनांमुळे ठाणे (सध्याचा ठाणे व पालघर जिल्हा) जिल्ह्यातील नव्याने एचआयव्ही संसर्ग होण्याचे प्रमाण ३.७९ टक्क्यांवरुन ०.७६ टक्क्यांपर्यत कमी झालेले आहे.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील जव्हार व मोखाडा तालुक्यातील अंगणवाड्याना अद्याप वीज जोडणी नसल्याबाबत

**(१०८) * ३२३६४ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयाच्या अंतर्गत येणारे जव्हार तालुक्यातील ३०५ व मोखाडा तालुक्यतील २२९ अंगणवाड्यांना अद्याप वीज जोडणी माहे ऑगस्ट, २०१५ पर्यंत न झाल्याने अंधारातच अंगणवाड्यांचे कामकाज चालू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंगणवाड्यांना सन २००८ व २००९ मध्ये जलशुध्दीकरण यंत्रे देण्यात आली ती देखभाल अभावी नादुरुस्त असल्याने बालकांना दूषित पाणी प्यावे लागत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बाब भाग १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बाब भाग १ व २ मधील समस्या तातडीने सोडविण्याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे वा केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

अंगणवाडी भरण्याची वेळ सकाळी ९.०० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत असल्याने अंगणवाडी कामकाज अंधारात चालू असण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच शासन निर्णय क्र.झेडपीए-२०१३/ प्र.क्र.७६/परा-१, दिनांक २४ जानेवारी, २०१४ नुसार अंगणवाडयांना वीज कनेक्शन ग्रामपंचायती मार्फत पुरविण्यात यावे अशी तरतूद आहे.

(२) हे खरे नाही.

सन २००८-०९ या कालावधीत अंगणवाडी केंद्रांना जलशुध्दीकरण यंत्र पुरविण्यात आलेले नाहीत. अंगणवाडी केंद्रांना ग्रामपंचायत मार्फत मेडिक्लोअर देण्यात आले आहे. सदर मेडिक्लोअरचा वापर अंगणवाडीत पाणी शुध्दीकरणासाठी करण्यात येतो. त्यामुळे बालकांना दूषित पाणी पिण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**राज्यात असलेल्या कृष्णा खोऱ्याच्या एकूण भूभागापैकी मराठवाड्याच्या वाट्याचे पाणी मिळण्याबाबत**

**(१०९) * २९२२५ श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात असलेल्या कृष्णा खोऱ्याच्या एकूण भूभागापैकी अंदाजे १०.७% भूभाग हा मराठवाड्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्या कृष्णा खोऱ्यात किती टी.एम.सी. पाणी अडविण्यात आले आहे व त्यापैकी मराठवाड्यात किती टी.एम.सी. पाणी अडविण्यात आलेले आहे,

(३) असल्यास, मराठवाड्यात हे पाणी अडविण्याचे प्रमाण भूभागाच्या १०.७% पेक्षा कमी असल्यास, मराठवाड्यावर झालेला अन्याय दूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) या प्रदेशांतर्गतच्या मराठवाडा प्रदेशातील उस्मानाबाद व बीड जिल्हयातील कृष्णा खोऱ्यातील भूभाग हा राज्यातील कृष्णा खोऱ्याच्या ८.३९ टक्के इतका आहे.

(२) जून २०१५ अखेर या महामंडळा अंतर्गत कृष्णा खोऱ्यातील पूर्ण व बांधकामाधीन प्रकल्पात एकुण ५४६.४९ टीएमसी पाणी अडविण्यांत आले आहे त्यापैकी मराठवाडयातील उस्मानाबाद व बीड जिल्हयात २१६ पूर्ण व बांधकामाधीन प्रकल्पात २०.२७३ टीएमसी पाणी साठविण्यांत आले आहे.

(३) प्रथम कृष्णा पाणी तंटा लवादानुसार महाराष्ट्र राज्याच्या ५९४ अ.घ.फु पाणी वापराच्या नियोजनानुसार कृष्णा खोऱ्यातील मराठवाडा प्रदेशातील उस्मानाबाद व बीड जिल्हयाच्या २१६ प्रकल्पांचा पाणी वापराचा हिस्सा २०.५२६ अ.घ.फु. इतका असुन त्यापैकी २०.२७३ अ.घ.फु पाणी वापराची कामे पुर्ण झालेली आहेत. उर्वरीत कृष्णा मराठवाडा उपसा सिंचन योजना वगळून ०.२५३ अ.घ.फु पाणी वापराची कामे शिल्लक आहेत.

कृष्णा खो-यातील  मराठवाडा प्रदेशाची राज्यातील कृष्णा खो-याच्या तुलनेत टक्केवारी ८.३९ असुन महाराष्ट्राच्या एकुण कृष्णा खोऱ्यातील ५९४ अ.घ.फु पाणी वापराच्या तुलनेत मराठवाडा प्रदेशातील कृष्णा मराठवाडा उपसा सिंचन योजना वगळून २०.५२६ पाणी वापराची टक्केवारी ३.४५ येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात कुष्ठरोग वेगाने वाढत असून या रोगाने शरीरात विकृती आलेले सर्वाधिक रुग्ण पुण्यात असल्याबाबत

**(११०) * २९६९३ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कुष्ठरोग वेगाने वाढत असून या रोगाने शरीरात विकृती आलेले सर्वाधिक रुग्ण पुण्यात असल्याची माहिती राज्याच्या आरोग्य खात्याने दिली असल्याचे दिनांक २७ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुष्ठरोग निदान आणि त्याचे निवारण करणारी यंत्रणा गेल्या काही वर्षापासून मोडीत निघाली असल्यामुळे कुष्ठरोगाचा धोका पुन्हा वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची रितसर चौकशी केली असता कुष्ठरोग नियंत्रण आणण्याबाबत वा निर्मुलन करण्याबाबत शासनाने काय उपाययोजना वा कार्यवाही केली आहे,

(४) अद्याप कोणतीच उपाययोजना वा कार्यवाही केली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात कुष्ठरोग वेगाने वाढत असल्याची बाब खरी नाही. तथापि, सदर कालावधीत राज्यामध्ये माहे जुलै मध्ये एकूण नवीन शोधलेले कुष्ठरुग्णांमधील विकृती दर्जा-२ असलेले रुग्णांनुसार पुणे जिल्हा राज्यात ६ व्या क्रमांकावर होता.

माहे ऑगस्टमध्ये एकूण नवीन शोधलेले कुष्ठरुग्णांमधील विकृती दर्जा-२ असलेले रुग्णांनुसार पुणे जिल्हा राज्यात ३ ऱ्या क्रमांकावर होता व माहे सप्टेंबर, मध्ये एकूण नवीन शोधलेले कुष्ठरुग्णांमधील विकृती दर्जा-२ असलेले रुग्णांनुसार पुणे जिल्हा राज्यात प्रथम क्रमांकावर होता.

(२) हे खरे नाही.

राज्यात या कार्यक्रमाचे सन २००१ मध्ये सर्वसाधारण आरोग्य सेवेमध्ये एकत्रिकरण झाले असून प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर नियमित सर्वेक्षण, जनजागृती व रुग्णांवर तात्काळ उपचार करण्यात येत आहे. कुष्ठरोग तंत्रज्ञामार्फत पडताळणी व पाठपुरावा करण्यात येतो. केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे महाराष्ट्र राज्याचे कुष्ठरुग्ण प्रमाण दर दहा हजारी लोकसंख्येमध्ये १ पेक्षा कमी झालेले आहे.

(३) याबाबत चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

कुष्ठरोगाचे निर्मुलन करण्याकरीता राज्या दरवर्षी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार विशेष कुष्ठरुग्ण शोध मोहिम राबविण्यात येते. तसेच आरोग्य शिक्षण व जनजागृती कार्यक्रमांतर्गत रॅली, प्रश्नमंजुषा, वैद्‌यकीय अधिकारी, खाजगी वैद्‌यकीय व्यावसायिक यांची कार्यशाळा, आरोग्य कर्मचारी यांची कार्यशाळा, महिला मंडळ सभा, तसेच दर्शनिय भागात बॅनर, पोस्टर, प्रदर्शने, होर्डींग्ज, हस्तपत्रिका वाटप, मेगाफोनद्‌वारे प्रचार, शालेय आरोग्य तपासणी, वेळोवेळी सार्वजनिक आरोग्य सेवेतील अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण घेऊन, आरोग्य कर्मचारी व अशा वर्करमार्फत सर्वेक्षणाद्‌वारे नवीन संशयित कुष्ठरुग्ण शोधून वैद्‌यकीय अधिकाऱ्यामार्फत रोगनिदान करण्यात येऊन बहुविध औषधोपचार मोफत देण्यात येतो. लवकर निदान व लवकर उपचार हा एकमेव प्रतिबंधात्मक उपाय आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्ह्यातील सफाळे, दहिसर वनविभागात वन अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने वृक्षांची मोठया प्रमाणात वृक्षतोड होत असल्याबाबत**

**(१११) * ३१४७१ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील सफाळे, दहिसर वनविभागात वन अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने मूल्यवान असलेल्या सागवान, खैर,शिसव आदि वृक्षाच्या

मोठया प्रमाणात वृक्षतोड होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वनविभागात झाडाची मोठया प्रमाणात वृक्षतोड झाल्याने डोंगरात पावसामुळे भूस्खलन होवून अनेक सागवान वृक्ष उन्मळून पडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती दोषी अधिकारी/कर्मचारी व अन्य जणांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) सफाळे वनक्षेत्राच्या हद्दीत तांदुळवाडी घाटात जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवडयात जास्त पावसामुळे भुस्खलन होवून तेथे साग-१ झाड (वेढी-५० सें.मी) व कळम-२ झाडे (वेढी-८० सें.मी व १०० सें.मी) उन्मळुन पडली आहेत.

(३) वनक्षेत्रपाल यांनी जागेची पहाणी करुन मालाचा पंचनामा करुन तो वन आगारावर ठेवण्यात आलेला आहे.

(४) सदर भुस्खलन होवून झाडे उन्मळून पडण्याची घटना ही नैसर्गिकरित्या घडलेली आहे. त्यामुळे सदर प्रकरणी कर्मचा-यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्याच्या महसूली तूटीत होणाऱ्या वाढीबाबत

**(११२) * २८६४९ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याने आपला सन २०१५-२०१६ चा अर्थसंकल्प दिनांक १८ मार्च, २०१५ रोजी विधानमंडळास सादर करताना रु.३७५७ कोटीची असलेली महसूली तूट ७ हजार कोटीवर गेल्याची बाब माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्थिक डोलारा सांभाळण्यासाठी एमएमआरडीए, म्हाडा, सिडको व अन्य महामंडळाकडून सुमारे ४० हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्याची बाब शासनाच्या विचारधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याची महसूली तुट इतक्या मोठ्या प्रमाणावर वाढण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) सदरची महसूली तूट भरुन काढण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**कोयना धरणातून वीजनिर्मिती केल्यानंतर वाया जाणारे पाणी मुंबईला पुरविण्याबाबत**

**(११३) * ३०६५० श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोयना धरणातून वीजनिर्मिती केल्यानंतर वाया जाणारे पाणी मुंबईला पुरविण्यासाठी कोयना ते मुंबई नदीजोड प्रकल्पास माहे सप्टेंबर, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात मंजूरी देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील पाणी टंचाईवर मात करण्यासाठी हा प्रकल्प तयार करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता निर्णय घेतला व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

कोयना अवजलाच्या ६७.५ टीएमसी पाणी मुंबईला आणण्यासाठी राष्ट्रीय जलअभिकरणाने पूर्व अर्हता अहवाल सादर केला आहे. दिनांक १५ सप्टेंबर २०१५ च्या बैठकीत राज्याचे राज्यमंत्री जलसंपदा उपस्थित होते. योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम हाती घेण्याची विनंती राज्याच्या वतीने करण्यात आली.
(२) या योजनेबाबतचा अभ्यास अद्यापी प्राथमिक अवस्थेत आहे. राष्ट्रीय जल अभिकरणाने पुर्व व्यवहार्यता अभ्यास तयार केला आहे. त्यानुसार सन २००८-०९ चे दरसुचिचे आधारे प्रकल्पाची किंमत रु. २२३८.५१ कोटी इतकी आहे. लाभव्यय गुणोत्तर १.८९ असून आर्थिक गुंतवणूकीवरील परताव्याचा दर १८.८९ आहे. सदर

आकडेवरुन योजना व्यवहार्य दिसत असली तरीही हे निष्कर्ष आत्यंत ढोबळ अभ्यासावर आधारित आहेत. राष्ट्रीय जल विकास अभिकरणाचे पुर्व व्यवहार्यता अहवालावरील वस्तुस्थितीदर्शक राज्याचे अभिप्राय कळवून राष्ट्रीय जल विकास अभिकरणास सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची विनंती दिनांक २६/१०/२०१५ चे पत्राने केली आहे.

(३) ही योजना राष्ट्रीय योजना म्हणून घोषित व्हावी असा शासनाचा प्रयत्न आहे. प्रकल्प पूर्णतेचा कालावधी निश्चित सांगता येणार नाही.

-----------------

**मुंबईमध्ये रुग्णांना उपचाराकरिता उपयुक्त रक्तातील प्लेटलेटसच्या मुळ किंमतीपेक्षा जादा किंमत आकारुन विक्री केली जात असल्याबाबत**

**(११४) * ३२१९५ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये रुग्णांना उपचाराकरिता उपयुक्त रक्तातील प्लेटलेटसच्या मुळ किंमतीपेक्षा १० ते १५ टक्के जादा किंमत आकारुन विक्री केली जात असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य प्रशासनाने सदर बाबींवर आळा घालण्यासाठी काय उपाययोजना केल्या आहेत,

(३) तसेच सर्वसामान्य नागरिकांना ते परवडणारे नसल्याने शासन, रुग्णांसाठी प्लेटलेटसची उपलब्धता करुन देणार आहे काय,

(४) असल्यास, त्याबाबतची माहिती सर्वसामान्य रुग्णांपर्यंत पोहचविण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केल्या आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही,

अशा प्रकारची कोणतीही बाब माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आलेली नाही,

(२) प्रश्न उद्भवत नाही,

(३) मुंबई मध्ये सरकारी, महानगरपालिकेच्या व ट्रस्ट संचालित ४१ रक्तपेढयांमधून शासनाने विहित केलेल्या प्रक्रिया शुल्काच्या दराने प्लेटलेट्स उपलब्ध करुन देण्यात येतात,

(४) सर्वसामान्यांना प्रक्रिया शुल्काबाबत माहिती उपलब्ध व्हावी याकरीता सर्व रक्तपेढयांना रक्त व रक्तघटकांच्या प्रक्रिया शुल्कांची माहिती रक्तपेढयांच्या दर्शनी भागात लावण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत,

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील विविध शासकीय रुग्णालयात निर्माण झालेला जीवरक्षक औषधांचा तुटवडा**

**(११५) * ३०२३८ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध शासकीय रुग्णालयातील जीवरक्षक औषधांचा काही दिवसापासून तुटवडा भासत असून हिमोफिलियाच्या रुग्णासाठी जे औषध सरकारी रुग्णालयात मिळत होते, ते सध्या मिळत नाही असे दिनांक २० ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिमोफिलिया सारख्या आजारामुळे गरीब रुग्ण हैराण झाले असून त्यांना रक्तस्त्राव नियंत्रित करण्यासाठी १५ हजार रुपये खर्च करावे लागत आहेत असेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील सर्व रुग्णालयात जीवरक्षक औषधे रुग्णांना वेळेत मिळावीत, यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

हिमोफिलिया रुग्णांसाठी आवश्यक असणाऱ्या औषधांची संबंधीत रुग्णालयांची मागणी लक्षात घेऊन उपलब्ध निधीनुसार पुरवठा आदेश देण्यात येतात. परंतु इतर राज्यातून उपचारासाठी रुग्ण येत असल्याने काही वेळा सदर औषधांची कमतरता भासते. अशावेळी सदर औषधे Emergency Stock मधून आवश्यकतेनुसार रुग्णांना पुरविण्यात येतात. जिल्हा रुग्णालय, ठाणे व अमरावती येथे Emergency Stock मध्ये हिमोफिलियाच्या औषधांचा साठा उपलब्ध आहे.

(३) राज्य स्तरावरुन सर्व रुग्णालयांना जैनेरिक औषधांचा पुरवठा करण्यात येतो. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अनुदानातुन जीवरक्षक औषधे पुरविण्यात येतात. तसेच, आवश्यकतेनुसार संबंधीत रुग्णालयांच्या स्विय प्रपंजी खात्यातून स्थानिकरित्या औषधांची खरेदी करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य शासनांतर्गत राबविण्यात येत असलेल्या जल शिवार योजनेच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(११६) * २८८०० डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील काही भागात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असताना गावागावात पाणी पोहेचविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या जलयुक्त शिवार योजनेत गैरव्यवहार होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनातर्फे राबविण्यात आलेल्या वरील योजनेंतर्गत लाखो रुपयांची कामे लातूर जिल्हयात ई-निविदा न काढताच करण्यात येत असून यामध्ये कोटयवधीचा गैरव्यवहार झाला असूनही संबंधित दोषी व्यक्ती विरुध्द आवश्यक कारवाई करण्यात येत नसल्याने शेतकऱ्यांच्या पाणी समस्येत वाढ होऊन शेतकरी आत्महत्येला प्रवृत्त होत आहेत हे पाहता शासनाने त्वरीत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
तथापि, दैनिक लोकसत्ता वर्तमानपत्रात लातूर जिल्ह्यामध्ये “जलसंधारणाच्या कामात कोट्यवधींचा गैरव्यवहार” या मथळ्यात बातमी प्रकाशित झाली होती.
(२) जलयुक्त शिवार अभियानातील कामे विहित प्रक्रीयेप्रमाणेच करण्यात येत आहेत. तथापि, कृषी विभागामार्फत प्रचलित प्रध्दतीप्रमाणे पाणलोटाची कामे मुख्य कंपार्टमेंट बंडिंग, सलग समतल चर, इ. करण्यासाठी मशिनचे निविदा पध्दतीने दर, दि. २५.७.२०१४ च्या परिपत्रकाप्रमाणे १ वर्षासाठी ठरविण्यात आले होते. त्यानुसार

कृषी  विभागामार्फत कामे चालू होती. दरम्यानच्या काळात दि. २६.११.२०१४ च्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयाप्रमाणे रु.३.०० लाखावरील कामे,  ही ई-निविदाद्वारे करण्याचे आदेशित करण्यात आले. अंतिमत: दि. २५.५.२०१५ च्या आदेशाद्वारे रु. ३.०० लाखावरील पाणलोटाची सर्व कामे ई.निविदा पध्दतीने करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्या नुसारच कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्हयातील पारसिकच्या डोंगर परिसरातील १६ गावांमधील वन खात्याच्या जमिनीवर उभारण्यात आलेली बेकायदा बांधकामे जमिनदोस्त करण्याचे आदेशाबाबत**

**(११७) * ३६७८८ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील पारसिकच्या डोंगर परिसरातील १६ गावांमधील वन खात्याच्या जमिनीवर उभारण्यात आलेली बेकायदा बांधकामे जमिनदोस्त करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिनांक १२ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बेकायदा बांधकामाचे सर्वेक्षण करण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे काय,

(३) असल्यास, या सर्वेक्षणात किती बांधकामे बेकायदा असल्याने आढळून आले व त्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) शासकीय जमिनीवरील अतिक्रमणांबाबत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयात दि.१२.१०.२०१५ रोजी आयोजित केलेल्या सभेमध्ये पारसिक डोंगर परिसरातील मौजे कळवा, पारसिक, मुंब्रा, कौसा, शिळ, गोठेघर, डायघर, दहिसर, पिंपरी, भंडार्ली, टेटवली, चिंचवली, अडीवली भुतावली, महापे, इलठाण, दिघा इत्यादी गावांमधील अतिक्रमण निष्कासनाचे निर्देश दिले आहेत.

(२) होय.

(३) या सर्वेक्षणात वनक्षेत्रावर १६३७८ अतिक्रमणे असल्याचे दिनर्शनास आले आहे. सदर क्षेत्रावर दिनांक १२.१०.२०१५ नंतर  नव्याने झालेले २०१ अतिक्रमणे (क्षेत्र ३७६० चौ.मी.) हटविण्यात आले आहे.

-----------------

**सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) स्थानिक सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेंतर्गत महिला बचत गट प्रदर्शनी व विक्री केंद्राच्या इमारतींच्या बांधकामामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(११८) * ३१९९३ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) स्थानिक सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजनेंतर्गत कायमस्वरुपी महिला बचत गट प्रदर्शनी व विक्री केंद्राच्या इमारतींच्या बांधकामामध्ये प्रत्यक्षात कामे न करता अंदाजे ४ लक्ष रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, तसेच चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**म्हैसमाळ (जि.औरंगाबाद) येथील सामाजिक वन परिक्षेत्र कार्यालयांतर्गत वन विभागाने बनावट मजूर दाखवून केलेला गैरव्यवहार**

**(११९) * २८९५४ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडजी व धामणगाव (ता.खुलताबाद जि.औरंगाबाद) येथील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतील कामात झालेल्या गैरव्यवहाराचे प्रकरण गाजत असतानाच म्हैसमाळ येथील सामाजिक वन परिक्षेत्र कार्यालयांतर्गत वन विभागाने अंतर्गत बनावट मजूर दाखवून मजूरांची रक्कम परस्पर हडप केल्याची तक्रार सामजिक कार्यकर्त्याने मा.अर्थ व वन मंत्री यांचेकडे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीतील निष्कषानुसार गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द आतापर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) अशा प्रकारची तक्रार प्राप्त नाही. सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिनस्त लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, खुलताबाद यांनी मौजे भडजी, धामणगांव व म्हैसमाळ येथे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत सन २०१४-१५, २०१५-१६ या वर्षीय गट लागवड किंवा रस्ता दुर्तफा व इतर कोणतेही कामे केलेली नाहीत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सुधारित पूररेषा निश्चित करण्याच्या निर्णयाबाबत

**(१२०) * २८९७४ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटबंधारे विभागाने सन १९८९ साली पूररेषा संबंधित परिपत्रक काढून आखणी करण्याचा निर्णय घेतला होता या अनुषंगाने पुररेषेची प्रतिबंधित क्षेत्र, पुररेषा नियंत्रित कक्ष या विषयी कार्यवाही सुचना दिल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुळा व मुठा नदीच्या संदर्भात पूररेषा निश्चित करण्यासंदर्भात सन १९८९ सालच्या परिपत्रकानुसार काय निकष लावले होते,

(३) असल्यास, मुठा नदीचे पात्र व खडकवासला धरण क्षेत्र अतिक्रमणाच्या विळख्यात सापडले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने स्थानिक मनपा प्रशासनाला कार्यवाहीचे कोणते आदेश दिले आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

पूराचा संभाव्य धोका टाळण्यासाठी पूररेषेच्या आत कोणतेही बांधकाम न होण्याच्या दृष्टीने पूररेषेची आखणी करण्याबाबत शासनाने दिनांक २१.०९.१९८९ रोजी परिपत्रक काढलेले आहे. सदर परिपत्रकानुसार संबंधित जिल्हाधिकाऱ्याकडून पाटबंधारे विभागाकडे संबंधित शहरात/ गावात पूररेषा आखणी करण्याची मागणी आल्यास संबंधित शहरात/गावात पूररेषा आखून देण्याबाबत पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी कशाप्रकारे कार्यवाही करावी याबाबतच्या सुचना दिलेल्या आहेत.

(२) मुळा व मुठा नदीच्या संदर्भात पूररेषा निश्चित करण्यासंदर्भात सन १९८९ मधील परिपत्रकानुसार पुढीलप्रमाणे निकष लावण्यात आले-

(१) निषेधक पूररेषा (Blue Line)-निषिध्द क्षेत्राची हद्द ठरविण्याकरिता सरासरीने २५ वर्षांतून एकदा या वारंवारितेने येणारा पूर विसर्ग किंवा प्रस्थापित नदी पात्राच्या विसर्गक्षमतेच्या दीडपट विसर्ग यातील जास्तीचा विसर्ग धरण्यात यावा.

(२) नियंत्रक पूररेषा (Red Line)- नियंत्रित क्षेत्राची हद्द ठरविण्याकरिता धरणाच्या संकल्पनातील सांडव्यावरुन वाहणारा संकल्पित महत्तम पूर विसर्ग व धरणाखालील स्वतंत्र पाणलोट क्षेत्रातून येणारा पूर विसर्ग यांचेमुळे येणारा एकत्रित पूर विसर्ग धरण्यात यावा. ज्या भागात धरण नसेल, त्या भागात १०० वर्षातून एकदा या वारंवारितेचा पूर विसर्ग धरण्यात यावा.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) अतिक्रमणे न होऊ देण्याची वा काढण्याची कार्यवाही महसूल विभाग व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांचे मार्फत करण्यात येते. क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आलेली अतिक्रमणे काढण्याबाबत पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांना वेळोवेळी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात कवडगाव पाझर तलावासाठी संपादित केलेल्या जमिनीचा शेतकऱ्यांना मोबदला मिळण्याबाबत

**(१२१) * ३३३८२ श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात कवडगाव पाझर तलाव क्र. ६ यासाठी संपादीत जमिनीचा वाढीव मोबदला न्यायालयाच्या आदेशानंतरही भुसंपादन विभागाने १५ वर्षानंतरही शेतकऱ्यांनी दिला नसल्याने शेतकऱ्यांनी सामूहिक आत्महत्येचा इशारा दिला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांना संपादित जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

उप विभागीय अधिकारी, बीड या कार्यालयाकडे कवडगाव पाझर तलाव क्र. ६ बाबत कोणतीही भुसंपादन प्रस्ताव आढळून येत नाही. तसेच कवडगाव येथील शेतकऱ्यांनी वाढीव मोबदला दिला नसल्याने सामुहिक आत्महत्येचा इशारा दिल्याबाबतचा कोणताही अर्ज वा निवेदन अभिलेखावर दिसून येत नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**राज्यात माता व बालमृत्यूंच्या वाढत्या समस्येबाबत**

**(१२२) * २८८४७ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.बसवराज पाटील (औसा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय औटी (पारनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.राजु तोडसाम (आर्णी), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: गडचिरोली, मेळघाट, मुंबई इत्यादी ठिकाणी गेल्या ८ वर्षात रक्तस्त्राव, रक्तक्षय, रक्तदाब या कारणामुळे सुमारे ९३५५ मातांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच गडचिरोली जिल्हयात ६५६ मेळघाटात ४०० हून जास्त मुंबईमध्ये १६ बालकांचा उपचाराअभावी मृत्यू झाला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्रीय आरोग्य सर्वेक्षणाप्रमाणे राज्यातील मेळघाट, गडचिरोली, नंदूरबार, धुळे आणि धारणी येथील ० ते ५ वर्षातील ४८ टक्के बालके कुपोषित तर सहा टक्के बालके अतिकुपोषित असल्याचे अहवालात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार मातामृत्यु व बालमृत्यु रोखण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

राज्यात १ एप्रिल, २००८ ते ३० सप्टेंबर, २०१५ अखेर एकूण ९९०५ मातामृत्यू झालेले आहेत. त्यापैकी गडचिरोलीमध्ये ७५, अमरावती जिल्ह्यातील मेळघाट भागात ४२ व मुंबई मध्ये ४४० इतके मातामृत्यू हे रक्तस्त्राव, रक्तक्षय व रक्तदाब या कारणांमुळे झालेले आहेत.

(२) १ एप्रिल ते ३१ जुलै, २०१५ अखेर गडचिरोली जिल्ह्यात ४९, अमरावती जिल्ह्यातील मेळघाट भागात ७२ व मुंबईमध्ये १६७७ बालकांचे मृत्यू हे उपचारा अभावी झाल्याचे आढळून आलेले नाही. हे मृत्यू विविध आजारांनी झालेले आहेत.

(३) व (४) केंद्रीय आरोग्य सर्वेक्षणाचा अहवाल आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालयास अद्याप प्राप्त झालेला नाही. तथापि एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत असलेल्या जुलै २०१५ चा मासिक प्रगती अहवालावरून कुपोषणाबाबतची श्रेणीनिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | जिल्हा/प्रकल्पाचे नाव | एकुण वजन घेतलेली बालके | सर्वसाधारण बालके | मध्यम कमी वजनाची बालके (मॅम) (टक्केवारी) | तीव्र कमी वजनाची बालके (सॅम) (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|---|
| १ | चिखलदरा, जि.अमरावती | १०६८५ | ६३९८ | ३३६७ (३१.५१) | ९२० (८.६१) |
| २ | धारणी, जि.अमरावती | १७०३८ | १०३०४ | ५२६४ (३०.९०) | १४७० (८.६३) |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | धुळे जिल्हा | १६९६०६ | १५०००२ | १५६११ (९.२०) | ३९९३ (२.३५) |
| ४ | गडचिरोली जिल्हा | ८२६०९ | ६६१०५ | १३४३४ (१६.२६) | ३०७० (३.७२) |
| ५ | नंदुरबार जिल्हा | १३५५३४ | ९३४५१ | ३३५४१ (२४.७५) | ८५४२ (६.३०) |

(५) मातामृत्यू कमी करण्यासाठी शासनामार्फत पुढील उपाय योजना करण्यात येतात.

• गरोदर मातांची १२ आठवडयांच्या आत नोंदणी केली जाते. नोंदणीनंतर मोफ़त संदर्भ सेवा, मोफ़त प्रयोगशाळा तपासण्या व औषधोपचार, प्रसुती व सिझेरीयन शस्त्रक्रिया सेवा, मोफ़त आहार, जोखमीच्या अवस्थेबाबत तपासणी व समुपदेशन तज्ञांकडून तपासणी तीव्र रक्त क्षयासाठी शिरेतून इंजेक्शन आयर्न सुकरोज इत्यादी सेवा पुरविल्या जातात.

• जननी सुरक्षा योजनेंतर्गत दारिद्रय रेषेखाली अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील सर्व गर्भवती मातांना शासकीय अथवा शासन मानांकित संस्थेत प्रसूती झाल्यास आर्थिक लाभ दिला जातो.

• गरोदर मातेस गरोदरपणाच्या कालावधीत नोंदणीसह किंमान ५ वेळा तपासणीसह धनुर्वात लसीकरण, रक्तक्षयासाठी लोहयुक्त गोळया, जंतनाशक गोळया दिल्या जातात.

• मातृत्व अनुदान योजनेंतर्गत १६ आदिवासी जिल्हयांमध्ये मातांची नियमित आरोग्य तपासणी व्हावी व त्यांना सुयोग्य आहार वेळेत उपलब्ध व्हावा याकरिता गरोदरपणामध्ये रु. ४०० रोखीने व ४०० रुपयांची औषधे याप्रमाणे प्रत्येक लाभार्थीला एकूण ८०० रुपयांचा लाभ देण्यात येतो.

• मानव विकास कार्यक्रमांतर्गत तज्ञ डॉक्टरांकडून गर्भवती महिलांची आरोग्य तपासणी, ० ते ६ महिने बालक असलेल्या स्तनदामाता तसेच २ वर्ष वयाच्या बालकांची तपासणी करणे, औषधोपचार करणे इ. उपाययोजना करण्यात येतात. तसेच अनुसूचित जाती/जमाती व दारिद्रय रेषेखालील गरोदर महिलेला बुडीत मजुरीपोटी रु. ४,००० इतकी रक्कम ७ ते ९ व्या महिन्यात देण्यात येते.

• जिल्हास्तर जिल्हा शल्य चिकित्सक व महानगरपालिका स्तरावर वैद्यकिय अधिकारी (मनपा) यांच्या मार्फ़त माता मृत्यूचे अन्वेषण केले जाते.

तसेच बालमृत्यू कमी करण्यासाठी पुढील उपाय योजना करण्यात येतात.

• आजारी व नवजात बालकांच्या उपचारासाठी विशेष कक्ष

• राज्यातील १६ आदिवासी जिल्ह्यांमध्ये ग्राम बाल विकास केंद्र, बाल विकास केंद्र येथे कुपोषित बालकास संदर्भित करुन पोषक आहार पुरविण्यात येतो.

• जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत गरोदर व प्रसुत मातांना घरापासून ते आरोग्य संस्थेपर्यंत ये जा करण्याकरीता मोफत वाहतुक सेवा उपलब्ध करुन दिली जाते.

• नियमित लसीकरण.

• पोषण पुर्नवसन केंद्रामध्ये आजारी बालकांवर औषधोपचार करुन पोषण आहार दिला जातो.

• नवजात बालकांसाठी स्थिर कक्ष

• राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत ० ते ६ वयोगटातील अंगणवाडी बालकांची व ६ ते १८ शालेय विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी

• ०-६ वर्ष वयोगटातील बालकासाठी जंतनाशक व जीवनसत्व अ मोहिम राबविली जाते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिल्हा परिषद सोलापूरच्या मालकीच्या मालमत्तेच्या ठिकाणी झालेल्या अतिक्रमणाबाबत

**(१२३) * ३४७४० श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हा परिषदेच्या मालकीच्या ४५६६ मालमत्तापैकी २००९ मालमत्तांचे सात बारा उतारे जिल्हा परिषदेकडे नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर प्रकरणी ११८ मालमत्तेच्या ठिकाणी झालेले अतिक्रमण हटविण्यातही अपयश आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषदेच्या मालकीच्या मालमत्तांचे सात बारा उतारे मिळवण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात येत आहे,

(४) तसेच अतिक्रमण हटवण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेच्या मालकीच्या ४५६६ मालमत्तांपैकी २५६३ मालमत्तांचे सात बारा उतारे उपलब्ध आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

११६ मालमत्तेच्या ठिकाणी अतिक्रमणे झालेली आहेत.

(३) जिल्हा परिषदेच्या मालकीच्या सर्व मालमत्तांचे सात बारा उतारे मिळवण्यासाठी सर्व खातेप्रमख यांना वारंवार लेखी व तोंडीसूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) जिल्हा परिषद/पंचायत समितीच्या व ग्राम पंचायतीच्या ताब्यातील खुल्या जागा/इमारती यांचे अतिक्रमणापासून रक्षण करणेबाबत ग्राम विकास विभागाकडून शासन परिपत्रक दि.२५/१/१९९०, दि.१७/६/१९९३ व दि.४/१२/२०१० अन्वये राज्यातील सर्व जिल्हा परिषदांना कळविण्यात आले आहे व त्यानुसार आतापर्यंत जिल्हा परिषदे मार्फत एकूण २२ मालमत्तांवरील अतिक्रमे हटविली असून उर्वरित सर्व अतिक्रमण हटविण्यासाठी सर्व गट विकास अधिकारी यांना व पोलीस अधिक्षक (ग्रामीण) यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच अतिक्रमणे हटविण्यासाठी तालुकास्तरावर नोडल ऑफिसरची नेमणूक करण्यात आलेल असून सर्व अतिक्रमणे हटविणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना येथील एकात्मिक पाणलोट कार्यक्रमांतर्गत पाणलोट समिती अध्यक्ष व सचिवांनी बँक खात्यातून परस्पर रक्कम काढल्याबाबत

**(१२४) * ३३५९६ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना येथील एकात्मिक पाणलोट कार्यक्रमांतर्गत मृद व जलसंधारणाची कामे करण्यासाठी पाणलोट समितीला दिलेल्या रक्कमेपैकी पाणलोट समिती अध्यक्ष व सचिवांनी बँक खात्यातून पैसे काढण्याचा कुठलाही अधिकार नसताना तब्बल १६ लाख रुपयांची रक्कम परस्पर काढल्याचा प्रकार माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार अध्यक्ष व सचिवांवर कोणती कायदेशीर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय.

चौकशीत वडगाव (पत्रातांडा) ता.जालना या गावाच्या पाणलोट समितीच्या सचिव आणि अध्यक्षांनी रु.१६.०० लक्ष इतकी रक्कम पाणलोट समितीच्या कॅनरा बँक, शाखा जालना येथील प्रकल्प निधी खात्यातुन जानेवारी २०१४ ते मार्च २०१४ या कालावधीत काढली. हे बँक खाते त्रीसदस्यीय आहे. त्यात पाणलोट समिती सचिव, अध्यक्ष या दोघांव्यतिरीक्त पाणलोट सहसचिव तथा कृषि पर्यवेक्षक यांचा समावेश आहे. सहसचिवांच्या स्वाक्षरीविना सदर रक्कम पाणलोट समिती सचिव आणि अध्यक्षांकडून काढण्यात आली. तद्नंतर संबंधीतांनी सदर रक्कम त्याच बँक खात्यात एप्रिल २०१४ आणि डिसेंबर २०१४ मध्ये भरली आहे.

(३) संबंधित पाणलोट समिती अध्यक्ष आणि सचिवांचे अधिकार गोठवण्यात आले आहेत. सचिव, पाणलोट समिती वडगाव (पत्रातांडा) ता.जालना प्रकल्प क्र. १०/२०१०-११ यांना दिनांक २१/११/२०१५ च्या आदेशान्वये बडतर्फ करण्यात आले. पाणलोट समिती अध्यक्षांची नियुक्ती ग्रामसभेने केल्याने त्यांच्या निष्कासनावर निर्णय घेणेसाठी ग्रामसभा बोलविण्याबाबत ग्रामसेवकास पत्र देण्यात आले आहे. तसेच या प्रकरणी सर्व संबंधीतांवर प्रशासकीय कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परराज्यातील लॉटरी कंपन्यांनी शासनाचा ९५० कोटीचा महसूल थकविल्याबाबत

**(१२५) * ३१०५१ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यात लॉटरी चालविणाऱ्या एकूण ६ कंपन्यानी सन २००७ ते २००९ या कालावधीत मिळून रु.९३३.१४ कोटी एवढ्या मोठ्या रकमेचा शासनाकडे जमा होणारा लॉटरी कर बुडविला आहे हे चौकशीत सिध्द झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त काळात स्थानिक जिल्हाधिकारी कार्यालयात मंत्रालयातील संबंधित अधिकारीवर्ग दलाल तसेच लॉटरी संचालनायातील वरिष्ठ अधिकारी यांचे संगनमतामुळे सदर कर वसुलीसाठी कोणतेही प्रयत्न केले गेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या कंपन्यांकडून शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविला गेला त्याच कंपन्यांनी संबंधित अधिकारी व दलालांच्या संगनमताने पुन्हा नव्या नावाने नोंदणी करुन पुन्हा शासनाची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय व या प्रकरणी शासनाचा महसूल बुडण्यास एकूण किती व कोणते अधिकारी जबाबदार आहेत,
(५) असल्यास, मागील काही महिन्यांमध्ये विनापरवाना लॉटऱ्यांवर होणाऱ्या कारवाया थंडावल्यामुळे संबंधित अधिकारी व दलाल याचा फायदा घेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, संबंधित दोषींविरुध्द व करबुडव्या कंपन्यांविरुध्द थकीत वसूलीसाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) सन २००७ ते २००९ या कालावधीतील पुढील कंपन्याकडे रु. ९३३.१४ कोटी इतकी लॉटरी कराची रक्कम थकीत आहे.

१) मे.स्वागत एजन्सी रु. ७६.२२५ कोटी,
२) मे.समर्पण ट्रेडिंग प्रा.लि. रु. १३४.४३ कोटी,
३) मे.केनलॉट गेमिंग सॉल्युशन प्रा.लि. रु.९.६८ कोटी व रु. २८.३० कोटी,
४) मे.ज्युपिटप गेमिंग प्रा.लि. रु. ३२३.०५५ कोटी,
५) मे.एस.एल. मार्केटिंग रु. १३३.१४५ कोटी,
६) मे.श्वेता एंटर-प्रायझेस रु. २२८.३०५ कोटी

(२), (३), (४) , (५), (६) व (७) अशी बाब नाही.

महाराष्ट्र राज्यात लॉटरी तिकीट विक्री करण्यात येणाऱ्या सर्व लॉटरी सोडतीवर आगाऊ लॉटरी कर भरणे महाराष्ट्र लॉटरऱ्यांवरील कर अधिनियम, २००६ अनुसार लॉटरी प्रवर्तकांना (प्रथम विक्रेत्यास) बंधनकारक करण्यात आलेले आहे. तथापि, इतर राज्यांच्या लॉटरी प्रवर्तकांनी महाराष्ट्र लॉटऱ्यांवरील कर अधिनियम, २००६ विरोधात उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका दाखल केल्या होत्या. उच्च न्यायालयाने कठोर कारवाई न करण्याबाबत अंतरिम आदेश दिले. सदर अंतरिम आदेशाचा फायदा घेऊन परराज्याच्या लॉटरी प्रवर्तकांनी लॉटरी कर भरणा केला नाही. उच्च न्यायालयाने दाखल याचिकांवर सन २००९ मध्ये अंतिम निर्णय दिला. त्यात राज्य शासन लॉटरी कर लावण्यास व वसूल करण्यात सक्षम असल्याचा निर्णय दिला. उच्च न्यायालच्या दि.१४/८/२००९ च्या अंतिम निर्णयानंतर सर्व प्रवर्तक दि. २६/१०/२००९ पासून नियमितपणे आगाऊ लॉटरी कर भरणा करीत आहेत. त्यामुळे सन २००९ नंतर लॉटरी कराची थकबाकी नाही.

सन २००७ ते २००९ या कालावधीतील रु. ९३३.१४ कोटी इतकी लॉटरी कराची थकबाकी वसूली करीता संबंधीत राज्यांकडून चालविण्यात आलेल्या लॉटरी योजनांची माहिती पत्रव्यवहार करुन घेण्यात आली. संबंधित राज्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे कर आकारणी आदेश व कर मागणी आदेश निर्गमित करण्यात आले. तथापि, संबंधित थकबाकीदार कंपन्यांनी लॉटरी कर भरणा केला नाही म्हणून महाराष्ट्र लॉटऱ्यांवरील कर अधिनियम, २००६ मधील कलम १८ नुसार जमीन महसूलाच्या वसूली प्रमाणे थकीत लॉटरी कर वसूली करण्याकरिता संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात आले होते.

तथापि, थकबाकीदार प्रवर्तक कंपन्या त्यांनी दिलेल्या पत्त्यावर आढळून येत नाही. असे जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे. आता पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे.

राज्यात तिकीट विक्री करण्यात येणाऱ्या अधिकृत लॉटरी योजनांची माहिती दर आठवड्यास परिपत्रकाद्वारे महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाते. त्या व्यतिरिक्त अन्य लॉटरी योजना राज्यात चालविण्यात येत असल्याचे आढळल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यासंदर्भात गृह विभाग व पोलीसांना कळविण्यात येते.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील कोरची तालुक्यात जलयुक्त शिवार अभियान कार्यक्रमात झालेला गैरव्यवहार

**(१२६) * २८४३८ श्री.छगन भुजबळ (येवला), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील कोरची तालुक्यात जलयुक्त शिवारच्या कामांसाठी शेतकऱ्यांवर ५५,८८१ रुपयांचे कर्ज दाखवणे तसेच मृत शेतकऱ्यांशी करार करुन गैरव्यवहार झाल्याचे माहे जुलै २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक १० जुलै, २०१० रोजी दैनिक लोकसत्तामध्ये यासंदर्भात बातमी प्रसिध्द झाली होती,

(२) होय, बातमीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, कुरखेडा यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन चौकशी करण्यात आली आहे,

(३) चौकशी अहवालानुसार मातीनालाबांध गट क्र. १/०५ परिशिष्ट १ मधील अनुसुची नुसार कृषी सहाय्यक श्री. बी.पी. मांदाळे यांनी अदयावत महसुली अभिलेखाशी ताळमेळ न घेता मयत खातेदार यांच्या नावाने करारानामा तयार केल्याचे व त्यावर खातेदाराच्या मुलाची स्वाक्षरी घेतल्याचे आढळून आले,

श्री. बी.पी. मांदाळे, कृषी सहाय्यक यांनी महसूली कागदपत्रे व विभागाच्या मार्गदर्शक सूचना न पाहता कराराणामा केल्याने त्यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) १९७९ नुसार पुढे देय होणारी वेतनवाढ एक वर्षासाठी तात्पुरत्या स्वरुपात पुढील पुढील वेतनवाढीवर परिणाम न होता रोखण्यात आलेली आहे,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हयातील रामटेक गड मंदीर परिसरातील दुकानात, स्वच्छता गृहात विषारी सर्पाचे प्रमाण वाढल्याबाबत

**(१२७) * ३४५५२ श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील रामटेक गड मंदीर परिसर आणि परिसरातील दुकानात, स्वच्छता गृहात विषारी सर्पाचे प्रमाण वाढल्याने माहे जून, जुलै २०१५ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या सर्पदंशामुळे दोघांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक खासगी हॉस्पीटलमध्ये अँटीस्नेक व्हेनम नसल्याने सर्पदंश झालेल्या पेशंटला उपजिल्हा रूग्णालयात भरती करावे लागते, हे ही खरे काय,

(३) असल्यास,रामटेक मंदिर परिसरातील रूग्णालयात सर्पदंशावरील सर्व औषधे व लस उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने काही उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे आहे.

जुन व जुलै, २०१५ मध्ये सर्पदंश झालेले अनुक्रमे ७ व १३ रुग्ण उपजिल्हा रुग्णालय, रामटेक येथे दाखल झाले होते. सदर सर्व रुग्णांना अॅटीस्नेक व्हेनम देण्यात आले होते. तथापि त्यापैकी २ रुग्णांचा मृत्यू झाला.

(३) रामटेक मंदीर ते उपजिल्हा रुग्णालय, रामटेक हे अंतर २.५ कि.मी. इतके आहे. उपजिल्हा रुग्णालय, रामटेक येथे अॅटीस्नेक व्हेनमचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. तसेच नागपूर जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालये व ग्रामीण रुग्णालये यांना जिल्हा औषध भांडारा मधून मागणीनुसार अँटीस्नेक व्हेनमचा पुरवठा करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पूर्व विदर्भातील गोसीखुर्द प्रमाणेच पश्चिम विदर्भातील सर्वात मोठा व महत्वाकांक्षी बेंबळा प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१२८) * २९५३१ श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.नसीम खान (चांदिवली), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्व विदर्भातील गोसीखुर्द प्रमाणेच पश्चिम विदर्भातील सर्वात मोठा व महत्वाकांक्षी बेंबळा प्रकल्प सन १९८३ पासून आजपर्यंत पूर्ण होऊ शकला नसल्याचे दिनांक २३ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ५३.९६८ हेक्टर सिंचन क्षमता असलेल्या या प्रकल्पाची मूळ किंमत ५०.७६ हेक्टरवरुन आज ३२०० कोटीवर पोहोचली असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जवळपास ८० टक्के अर्थात १८७६ कोटी रुपये खर्च होऊनही हा प्रकल्प ४५ टक्केच पूर्ण होऊ शकला असून अनेक ठिकाणी सदरील काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने शेतकऱ्यांच्या शेतात पाणी जाऊ लागले असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याबाबत तसेच येथील शेतकऱ्यांना सिंचन सोयीसुविधा उपलब्ध होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

बेंबळा प्रकल्पाचे प्रत्यक्ष कामास जानेवारी-१९९३ मध्ये सुरुवात करण्यात येऊन धरणाचे सांडव्यासह बांधकाम जून-२००७ मध्ये पूर्ण झालेले आहे. सद्य:स्थितीत मुख्य कालवा, वितरण प्रणाली डेहणी उपसा सिंचन योजनेची कामे अंदाजे ७५% पूर्ण झालेली आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

बेंबळा प्रकल्पास दि.२०.०१.१९८३ रोजी रु.५०.७६ कोटीस प्रशासकीय मान्यता दिली होती. तथापि प्रकल्प अर्थसंकल्पित न झाल्याने प्र.मा.व्यपगत झाली. यानंतर नव्याने दिनांक १६.१०.९२ रोजी रु.१९०.६२ कोटीस प्र.मा.देऊन प्रकल्प कामास १९९३ मध्ये सुरुवात करण्यात आली. दिनांक १४.८.२००९ रोजी दिलेल्या अद्यावत सु.प्र.मा. नुसार प्रकल्पाची किमंत रु.२१७६ .२८ कोटी असून प्रस्तावित  चतुर्थ सु.प्र.मा.नुसार प्रकल्पाची किमंत रु.३६३५ कोटी इतकी आहे.

(३) नाही. या प्रकल्पावर जून-२०१५ अखेर रु.१९०१.९१ कोटी खर्च झालेला आहे व प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम ८५ टक्के पुर्ण झालेले आहे. प्रकल्पाचे लाभ क्षेत्रात कालव्याद्वारे प्रत्यक्ष सिंचनास सन २०१०-११ पासून सुरुवात झालेली आहे.

बेंबळा मुख्य कालवा सा.क्र.३८५८० वरुन निघणा-या आष्टा वितरीकेच्या कि.मी.१ ते ३ मधील भरावातुन पाणी पाझरुन

शेतीचे नुकसान होत असल्याचे आढळून आले . उपरोक्त काम प्रगतीपथावर असल्याने संबंधित कंत्राटदारामार्फत आवश्यक दुरुस्ती करुन घेण्यात येत आहे.

(४) हा प्रकल्प तातडीने पूर्ण करण्यास्तव केंद्र शासनाचे ऐ.आय.बी.पी. कार्यक्रमामध्ये सन २००७-०८ मध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे. प्रकल्प जून, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. प्रकल्पाचे काम विहित कालावधीत पूर्ण होण्याच्या दृष्टीने मा.मुख्यमंत्री यांचे वाररुम  मधून प्रकल्पाचे संनियंत्रण करण्यात येते. सन २०१५-१६ मध्ये प्रकल्पास रु.१७० कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे.

(५) या प्रकल्पास प्रामुख्याने सुरुवातीचे काळात भूसंपादन विषयक अडचणी, शेतकऱ्यांचा विरोध व अपुरा निधी यामुळे विलंब झालेला आहे. तथापी वर नमूद केल्यानुसार अडचणींवर मात करुन जून, २०१८ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

----------------

## केंद्र, राज्य व ग्रामपंचायतीच्या स्वनिधीतून ग्रामपंचायातीच्या रस्त्यावर सौरपथदिप बसविण्याची योजना राबविण्याबाबत

**(१२९) * ३४७९५ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र, राज्य व ग्रामपंचायतीच्या स्वनिधीतून ग्रामपंचायातीच्या रस्त्यावर सौरपथदिप बसविणे ही योजना राबविण्याचे शासनाने निश्चित केले असून रत्नागिरी जिल्ह्यातील पात्र असलेल्या १७७ ग्रामपंचायतीमध्ये ५३१ सौरपथदिप बसविण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक ग्रामपंचायतीने आपल्या हिश्यापोटी रु.३४,५००/- अशी एकूण रु.६१ लाख ६५ हजार आणि शासनाने रु.४७ लाख ७९ हजार असे एकूण रु.१ कोटी ८ लाख ८५ हजार संबंधित विभागाकडे अडीच वर्षापूर्वी जमा करुनही अद्याप सौरपथदिप बसविण्यात आले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निधी जमा करुनही सौरपथदिप न बसविण्याची कारणे काय आहेत, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यातील पात्र ग्रामपंचायतीमध्ये सौरपथदिप तातडीने बसविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) अंशत: खर आहे. तथापि १७७ ग्रामपंचायती पैकी कृषी सोलर एजन्सी, पुणे यांनी ५१ ग्रामपंचायती मध्ये १५३ सौरपथदिप बसविलेले आहेत.

(३) व (४) १७७ ग्रामपंचायती पैकी कृषी सोलर एजन्सी, पुणे यांनी ५१ ग्रामपंचायती मध्ये १५३ सौरपथदिप बसविलेले आहेत. उर्वरित १२६ ग्रामपंचायतीमध्ये सौरपथ दिवे बसविण्यासाठी वारंवार पत्रव्यवहार करुन सदर संस्थेने कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

सौरपथदिप बसविण्याचे काम पूर्ण न केल्यामुळे कृषी सोलर एजन्सी, पुणे यांचेवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**राज्यातील बालगृहांच्या समस्या सोडविण्याबाबत**

**(१३०) * ३२३६९ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालविकास विभागाच्या नियंत्रणाखाली राज्यात अंदाजे हजारावर बालगृहे शासनाच्या मान्यतेने अधिनियमाच्या चौकटीत चालविली जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालगृहांचे ३ वर्षापासून १५६ कोटीचे भोजन अनुदान प्रलंबित असून सेवकांना पगारही देण्यात न आल्याची बाब माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, १३ जुलै २०१५ च्या शासन निर्णयानुसार उक्त बालगृहांची तपासणी करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बाब १, २ व ३ नूसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बालगृहांच्या समस्या सोडविण्याबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे वा करण्यात येत आहे,

(६) अद्यापी, कार्यवाही केली नसल्यास होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) प्रलंबित व चालू सन २०१५-१६ या अर्थिक वर्षासाठी भोजन अनुदान प्रलंबित आहे.

मात्र, बालगृहातील सेवकांना शासनामार्फत पगार देणे बाबतची कोणतीही तरतूद नाही.

(३) होय,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) विभागाने रू.१५६.४५ कोटीची पुरवणी मागणी सादर केलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्ह्यातील प्रादेशिक मनोरुग्णालयामध्ये**
**सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभारण्याबाबत**

**(१३१) * ३०६५४ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील प्रादेशिक मनोरुग्णालयामध्ये सुपर स्पेशलिटी रुग्णालय उभारण्यासंदर्भात मा.पालकमंत्री, ठाणे जिल्हा व सर्व संबंधितांसमवेत दिनांक २४ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास मनोरुग्णालयांच्या परिसराची पाहणी केलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी कोणता निर्णय घेतला व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर प्रकरणी लवकरात लवकर निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) ठाणे मनोरुग्ण परिसरात सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभारण्याची बाब शासनाचे विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.